इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष - ४१ ▸ अंक - ३३१ ▸ रविवार,ता. ५ एप्रिल २०२६ ▸ पाने १२+४=१६ इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026




राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव




www.emahasatta.com e-mail : mahasatta@gmail.com mahasattaadvt@gmail.com किंमत ₹ ५.००



संकष्ट चतुर्थी
चंद्रोदय-९:३८

## राष्ट्रवादीची धुरा सुनेत्रा पवारांकडेच

### कार्यकारिणीत पटेल,तटकरे, भुजबळांसह १४ जण ; पक्षाच्या नव्या ठरावांसह कार्यकारिणीला निवडणूक आयोगाची मान्यता

■ नवी दिल्ली,ता.४-

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत रचनेत गेल्या दोन महिन्यांत मोठे फेरबदल झाले असून, आता पक्षाची धुरा अधिकृतपणे सुनेत्रा पवार यांच्या हाती आली आहे. १६ फेब्रुवारी ते ११ मार्च २०२६ दरम्यान घडलेल्या वेगवान घडामोडींनंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने



पक्षाच्या नव्या ठरावांना आणि कार्यकारिणीला मान्यता दिली आहे. यामुळे सुनेत्रा पवार यांची अध्यक्ष म्हणून आणि पार्थ पवार यांची खासदारकी कायदेशीररित्या भक्कम झाली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १६ फेब्रुवारी २०२६ रोजी निवडणूक (पान २ वर)

## सातार्‍यात भाजपाचा करिश्मा

### जि.प. विषय समिती सभापती निवडीवर वर्चस्व ; राष्ट्रवादीचे तीन सदस्य फुटले

■ सातारा,ता.४ (प्रतिनिधी)-

सातारा जिल्हा परिषदेतील सभापती पदाच्या निवडीत सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आ. अतुल भोसले, आ. मनोज घोरपडे, जि. प. उपाध्यक्ष राजू भोसले यांनी पुन्हा करिश्मा घडविला. राष्ट्रवादीच्या फुटलेल्या सदस्या तेजस्विनी शिंदे यांना महिला व बालकल्याण, दोन विषय समितीच्या सभापती पदी लता कर्णे यांची वर्णी लावून शिवसेनेला सत्तेपासून




शिवसेना, राष्ट्रवादीचा निवडणुकीवर बहिष्कार ; काळ्या फिती लावून प्रवेशव्दारावरच घोषणाबाजी

वंचित ठेऊन दुसरा धक्का दिला. दरम्यान, उर्वरित राष्ट्रवादी आणि सेनेच्या सदस्यांनी जिल्हा परिषदेमध्ये काळ्या फिती लावून प्रवेश केला. प्रवेशव्दारावरच अचानक जिल्हाधिकारी आणि प्रशासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केल्याने तणावपूर्ण शांतता पसरली.

अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीनंतर विषय समिती सभापती निवडीसाठीही संघर्ष पेटणार हे अटळ होते. या निवडीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेवटच्या क्षणी लक्ष घातल्याने निवडीकडे राज्याचे लक्ष केंद्रित झाले. विषय समितीच्या सभापती पदाच्या निवडीत देखील तणाव वाढण्याची चिन्हे दिसू लागल्याने पोलिस प्रशासन अलर्ट मोडवरच होते. जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी जमावबंदी आदेश जारी करुन पहिले पाऊल उचलले. (पान २ वर)

पाच वर्षांचा कालावधी आहे. अजून सभापती निवडी म्हणजे सगळ झालं असं नसतं. आगे आगे देखो होता हे क्या असे पालकमंत्री शंभूराज देसाई म्हणाले तर रीतसर मुलाखती घेऊन पक्ष प्रवेश केलेल्या उमेदवारांनी पक्ष विरोधात काम केले आहे. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करणार असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

## होर्मुझ तूर्त खुली होणार नाही

■ वॉशिंग्टन,ता.४-

होर्मुझ सामुद्रधुनीवर इराणने आपला प्रभाव कायम ठेवला असून, ती लवकर उघडण्याची शक्यता कमी असल्याचे अमेरिकेच्या गुप्तचर अहवालात नमूद करण्यात आले आहे. या परिस्थितीमुळे अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव अधिक वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

अहवालानुसार, होर्मुझ सामुद्रधुनीवरील नियंत्रण हे इराणसाठी (पान २ वर)

## इराणमध्ये घुसून वैमानिकाची सुटका

■ तेहरान,ता.४-

इराणमध्ये पाडलेल्या अमेरिकन लढाऊ विमानानंतर अमेरिकेने अत्यंत धाडसी पाऊल उचलत थेट इराणी भूमीत प्रवेश करून बचाव मोहीम राबवली. अमेरिकन विशेष दलांनी शुक्रवारी रात्री ही गुप्त कारवाई केली.

इराणच्या भूमीला प्रथमच अमेरिकी सैनिकांचे त्यामुळे पाय लागले. दरम्यान, काही काळानंतर इराणने दुसरे विमान पाडले.त्याच्या दोन पायलटचा शोध अद्याप (पान २ वर)

## गरिबांचे रक्त पिणार्‍या बिल्डरांना सोडणार नाही

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे १५ दिवसांत एसआयटी अहवाल

■ मुंबई,ता.४ (प्रतिनिधी)-

नाशिकमधील म्हाडा गृहप्रकल्पात गरिबांच्या हक्काची घरे हडपण्याचे प्रकरण अत्यंत गंभीर असून, यात कितीही मोठा मासा असला तरी त्याला सोडले जाणार नाही. गरिबांचे हक्क हिरावून घेणार्‍या आणि त्यांचे रक्त पिणार्‍या बिल्डरांना आम्ही सोडणार नाही, प्रसंगी या प्रकरणाचा तपास ईडी कडे सोपवू, असा दम राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला.



नाशिक दौर्‍यात बावनकुळे म्हणाले की, गरिबांसाठी असलेली २० टक्के घरे बळकावली गेली आहेत. एकाच दिवसात जमिनीचे तुकडे पाडणे, नोंदी घेणे आणि नकाशे मंजूर करणे ही मोठी रिंग आहे. या प्रकरणासाठी एसआयटी स्थापन करण्यात आली असून यात एक आयपीएस आणि दोन आयएएस अधिकारी आहेत. १५ दिवसांत अहवाल येईल. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग आणि भूमी अभिलेख विभागातून या घोटाळ्याची सुरुवात झाली असून, नाशिक विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकार्‍यांना याप्रकरणी कडक कारवाईचे आदेश दिले आहेत. केवळ शिक्षा नाही,तर बिल्डरांकडून २० टक्के मालमत्ता रिकव्हर करून ती गरीबांना मिळवून देणार आहे.

बावनकुळे म्हणाले की, मी एवढंच म्हटले होते की ज्यांच्या फार्महाऊस आहेत. फार्महाऊससाठी कर्ज घेतले आहे. ज्यांनी मर्सिडीज गाड्या घेतल्या आहेत त्या शेतकर्‍यांनी कर्जमाफी मागू नये. नार्मल गाडी शेतकरी घेतो, ट्रॅक्टर घेतो, चार चाकी वाहन घेतो याला (पान २ वर)

## सर्व पक्षांनी सुनेत्रा पवार यांना पाठिंबा देवून बारामतीची निवडणूक बिनविरोध करावी

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ नागपूर,ता.४ -

बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध झाली तर महाराष्ट्राच्या संस्कृतीला साजेशी ही बाब ठरेल. यापूर्वीही अनेकदा बिनविरोध निवडणूक झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आर. आर. पाटील यांच्या निधनानंतर बिनविरोध निवडणुकीसाठी भाजपनेही पुढाकार घेतला होता. त्यामुळे बारामती येथे पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी, सर्वांनी सुनेत्रा पवार यांना पाठिंबा द्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

फडणवीस पुढे म्हणाले की, सर्वच पक्षांनी सुनेत्रा पवार यांना पाठिंबा दिला पाहिजे, माझी अशी सर्वांना विनंती असेल. यापूर्वीही महाराष्ट्राने बिनविरोध पोटनिवडणुका केल्या आहेत.

अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली. यापूर्वी त्या राज्यसभेच्या खासदार होत्या. मात्र उपमुख्यमंत्रिपद भूषवताना राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा देऊन विधानसभा किंवा विधान परिषदेचे सदस्यत्व घेणे बंधनकारक आहे. त्यामुळे त्या बारामतीतून निवडणुकीच्या (पान २ वर)



## बारामती,राहूरीची निवडणूक होणार?

■ पुणे,ता.४-

राहुरी व बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध होणार नाही, असे चित्र आहे. बारामती पोटनिवडणुकीसाठी आत्तापर्यंत १९ उमेदवारांनी अर्ज दाखल केला आहे. याशिवाय, ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनीही अर्ज दाखल करण्याचा निर्धार बोलून दाखवला.

अर्ज भरण्यासाठी एकच दिवस शिल्लक आहे. मी सोमवारी अर्ज भरणार असून राष्ट्रीय पक्ष माझ्या संपर्कात असल्याचे (पान २ वर)

## विहिरीत कार कोसळून एकाच कुटुंबातील ९ जणांचा मृत्यू

■ नाशिक,ता.४-

दिंडोरी तालुक्यात स्नेहसंमेलनाचा आनंद साजरा करून घरी परतणार्‍या एका कुटुंबावर काळाने भीषण घाला घातला. चालकाचा ताबा सुटल्याने कार थेट पाण्याने भरलेल्या विहिरीत कोसळून ९ जणांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण नाशिक जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे.

स्नेहसंमेलन कार्यक्रम आटोपून परतताना काळाचा घाला

मिळालेल्या माहितीनुसार, इंदोरे गावचे रहिवासी सुनील दरगुडे आणि त्यांचे कुटुंबीय एका खासगी क्लासचा स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम आटोपून आनंदाने घरी परतत होते. मात्र, वाटेत अचानक कारवरील नियंत्रण सुटले आणि वाहन रस्त्याशेजारील खोल विहिरीत कोसळले. विहीर पाण्याने तुडुंब भरलेली असल्याने आतील (पान २ वर)

## ४४ हजार टन एलपीजी घेऊन भारतीय जहाजाने केले होर्मुझ पार

■ नवी दिल्ली, ता.४ -

युद्धाच्या पार्श्वभूमीवर इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीवर अनेक निर्बंध लादले आहेत, ज्यामुळे जागतिक स्तरावर कच्च्या तेलाचे संकट निर्माण झाले आहे. भारतात एलपीजीच्या खेपांसाठी लांबच लांब रांगा लागत आहेत. दरम्यान, होर्मुझमधून भारतासाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे.४४ हजार मेट्रिक टनांहून अधिक एलपीजी घेऊन जहाज होर्मुझच्या सामुद्रधुनीतून बाहेर पडले असून भारताकडे रवाना झाले आहे.



अमेरिका आणि इस्रायलसोबत सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर इराणने अनेक भारतीय ध्वज असलेल्या जहाजांना सुरक्षितपणे जाण्याची परवानगी दिली आहे. आणखी एक भारतीय ध्वज असलेल्या जहाजाने होर्मुझची सामुद्रधुनी पार केली आहे.पश्चिम आशियामध्ये युद्ध सुरू झाल्यापासून भारतात एलपीजी घेऊन जाणारी सहा जहाजे दाखल झाली आहेत. एका महिन्याच्या आत होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणारे हे सातवे भारतीय जहाज आहे. हे जहाज (पान २ वर)

## मनी लॉंड्रिंगप्रकरणी रॉबर्ट वाड्रा यांच्यावरील निकाल १५ एप्रिलला

■ नवी दिल्ली,ता.४-

दिल्लीच्या राऊस अ‍ॅव्हेन्यू न्यायालयाने रॉबर्ट वाड्रा यांना मनी लॉंड्रिंग प्रकरणात आरोपी म्हणून समन्स बजावण्याच्या मुद्द्यावर आपला निर्णय राखून ठेवला आहे. विशेष न्यायाधीश सुशांत चांगोत्रा यांनी १५ एप्रिल रोजी निकाल देण्याचे आदेश दिले आहेत.

सुनावणीदरम्यान, रॉबर्ट वाड्रा यांनी सांगितले की, त्यांच्याविरुद्ध मनी लॉंड्रिंगचा कोणताही गुन्हा सिध्द होत नाही. रॉबर्ट वाड्रा यांचे प्रतिनिधीत्व करणार्‍या वकिलाने असा युक्तिवाद केला की, न्यायालयाने अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) दाखल केलेल्या आरोपपत्राची दखल घेऊ नये.२ ऑगस्ट, २०२५ रोजी, न्यायालयाने वाड्रा आणि या प्रकरणातील इतर १० आरोपींना समन्स बजावले होते. हरियाणातील शिकोहपूर जमिनीशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात रॉबर्ट वाड्रा यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल केले. त्यात वाड्रा आणि त्यांच्या कंपनी, मेसर्स स्काय लाइट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि. सह इतर १० जणांची नावे आहेत.

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १४९००० रु. | २३४००० रु. |

अंडी ४८० रुपये शेकडा

हास्यतुषार -सुरेंद्र दास





सध्या सकाळी स्वेटर , दुपारी पंखा , संध्याकाळी छत्री ! नेमका कोणता ऋतू चालू आहे तेच कळेना झालंय!

## समरजीतसिंह घाटगे पुन्हा भाजपवासी

### मुंबईत ८ एप्रिलला पक्षप्रवेश सोहळा

■ कागल,ता.४ -

विधानसभा निवडणुकीत भाजपातून शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेल्या समरजीतसिंह घाटगे यांचा पुन्हा भाजपप्रवेश निश्चित झाला आहे. विधानसभा निवडणुकीत तिकिट न मिळू शकल्याने शेवटच्या क्षणी त्यांनी राष्ट्रवादी कांग्रेस (शरद पवार)पक्षात प्रवेश करत विधानसभा निवडणूक लढवली होती. मात्र, आता पुन्हा समरजीतसिंह घाटगे भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थित भाजपात प्रवेश करणार आहेत. येत्या ८ एप्रिलला मुंबईतील भाजपा कार्यालयात पक्षप्रवेश होणार असल्याची माहिती समरजीतसिंह घाटगे यांनी दिली.



समरजीतसिंह घाटगे म्हणाले, बरेच दिवस माझा भाजपप्रवेश पेंडिंग होता. नगरपालिका आणि विशेषत: जिल्हा परिषद निवडणुकीत आमचे कार्यकर्ते भाजपच्या चिन्हावर निवडून आले आहेत. त्यामुळे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याशी चर्चा करून अधिवेशननंतर अधिकृत पक्षप्रवेश करण्यासंदर्भात प्राथमिक चर्चा झाली होती. येत्या आठ तारखेला माझा भाजप प्रवेश होत आहे. माझ्या मूळ पक्षात परत आलोय याचे मला समाधान आणि अभिमान आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे माझ्या थोरल्या भावासारखे आहेत, त्यांनी नेहमीच मला (पान २ वर)

## राज्यात ११, १५ व २२ एप्रिलला विद्यार्थ्यांची पटपडताळणी मोहीम

■ मुंबई,ता. ४ -

महाराष्ट्र राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांची अचूक उपस्थिती व नोंद सुनिश्चित करण्यासाठी शिक्षण विभागाने व्यापक पटपडताळणी मोहीम हाती घेतली आहे. ११, १५ आणि २२ एप्रिल या तीन दिवशी राज्यभर ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेदरम्यान विविध स्तरांवरील अधिकार्‍यांची पथके तयार करून त्यांच्यामार्फत प्रत्यक्ष शाळांना भेट देण्यात येणार आहे. तेथे विद्यार्थ्यांची उपस्थिती आणि नोंदींची पडताळणी केली जाईल.सूचनांनुसार, दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांची स्वतंत्र पटपडताळणी केली जाणार नाही. (पान २ वर)

अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी देखील याच पद्धतीने नियोजन करण्यात आले असून, मराठी, भौतिकशास्त्र व इंग्रजी या विषयांच्या परीक्षांच्या दिवशीच पटपडताळणी होणार आहे.

भावपूर्ण श्रध्दांजली



श्री. बाळासाहेब उर्फ सुकुमार पांडूरंग भोंगाळे

यांचे शुक्रवार दि. 03/04/2026 रोजी दुख:द निधन झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

शोकाकूल

सागर पांडूरंग भोंगाळे । प्रथमेश सुकुमार भोंगाळे

भोंगाळे परिवार, अर्जुनवाड (ता. कागल) इचलकरंजी

रक्षाविसर्जन : उद्या सोमवार दि. 06 एप्रिल 2026 रोजी सकाळी 8 वाजता पंचगंगा नदितिरी इचलकरंजी येथे

**(पान १ वरून)**

# बारामतीची निवडणूक बिनविरोध करावी

रिंगणात उतरत आहेत. बारामतीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून येत्या ६ एप्रिल रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सुनेत्रा पवार उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बारामती शहर व तालुक्यात बैठकांना सुरुवात झाली असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. गावागावात जाऊन मतदारांशी थेट संवाद साधत सुनेत्रा पवार यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्यासाठी रणनीती आखली जात आहे.

# ४४ हजार टन एलपीजी घेऊन भारतीय जहाजाने केले होर्मुझ पार

४४ हजार मेट्रिक टनांहून अधिक एलपीजी घेऊन जात आहे. या जहाजाच्या आगमनामुळे लोकांना एलपीजीचा दिलासा मिळेल, अशी आशा आहे.

जहाजाच्या ट्रॅकिंग डेटानुसार, पर्शियन आखातात नांगरलेला ग्रीन सान्वी हा एलपीजी टँकर, इराणी सागरी मार्गाचा वापर करून शुक्रवारी संध्याकाळी होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या पूर्व बाजूला पोहोचला. हा टँकर आता मुंबई बंदराच्या दिशेने जात आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या या जहाजाचे नाव ग्रीन सान्वी आहे. अनेक भारतीय तेल आणि वायू जहाजे सध्या इराणी परवानगीच्या प्रतीक्षेत होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये अडकली आहेत. होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या पश्चिमेला अडकलेल्या १७ भारतीय जहाजांपैकी, ग्रीन सान्वी आणि जग विक्रम ही दोन जहाजे एलपीजीने भरलेली आहेत.ही दोन जहाजेही लवकरच भारताच्या दिशेने रवाना होऊ शकतात. जर ही दोन एलपीजीने भरलेली जहाजे भारतात पोहोचली, तर एलपीजीच्या तुटवड्याचा सामना करणाऱ्या भारतीयांना मोठा दिलासा मिळेल.

# कुटुंबातील ९ जणांचा मृत्यू

कोणालाही बाहेर पडण्याची संधी मिळाली नाही.या अपघातात सुनील दरगुडे यांच्या कुटुंबातील आणि जवळच्या नातेवाईकांसह एकूण ९ जणांचा मृत्यू झाला. प्राथमिक अंदाजानुसार, चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने हा अनर्थ घडला असावा. घटनेची माहिती मिळताच दिंडोरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. हा अपघात अत्यंत भीषण होता. एका हसत्या-खेळत्या कुटुंबाचा असा अंत होणे चटका लावून जाणारे आहे. स्थानिकांच्या मदतीने बचावकार्य राबवण्यात आले, मात्र दुर्दैवाने कोणाचेही प्राण वाचवता आले नाहीत.या घटनेमुळे इंदोरे गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# घाटगे पुन्हा भाजपवासी

मार्गदर्शन केले आहे. मी पक्षातून बाहेर पडल्यानंतर सुद्धा अनेकदा त्यांच्या नावाचा उल्लेख केला आहे. पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत त्यांच्या नेतृत्वात काम करण्याची संधी मिळते, याचेही समाधान आहे. दरम्यान, महापालिका निवडणुकीनंतर डिसेंबर महिन्यातच मी शरद पवार यांना भेटून माझी भूमिका सांगितली होती. शरद पवार यांना सांगूनच मी ही पुढची पावले उचलली आहेत, असेही घाटगे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, नगरपालिका निवडणुकांच्या अनुषंगाने कोल्हापुरात मंत्री हसन मुश्रीफ आणि समरजीतसिंह घाटगे एकत्र आले होते. दोन्ही नेत्यांच्या एकत्र येण्याने कागल नगरपरिषदेमधील २३ पैकी २३ जागा घाटगे-मुश्रीफ यांच्या आघाडीने जिंकत व्हाईट वॉश दिला. इतकेच नव्हे तर नगराध्यक्षपदी सविता माने विजयी झाल्या. त्यामुळे, एकप्रकारे कागलच्या दोन्ही नेत्यांच्या आघाडीवर मतदारांनी शिक्कामोर्तब केल्याची चर्चा होती. तर, एकत्र आलोय एकत्र राहण्यासाठी असेही घाटगे यांनी यावेळी म्हटले होते. मात्र, मुरगूड नगरपालिकेमध्ये दोघांच्या आघाडीला मोठा झटका बसला. या ठिकाणी शिवसेना शिंदे गटाने यश मिळवताना सत्ता खेचली आहे.

# विद्यार्थ्यांची पटपडताळणी मोहीम

त्यांच्या बोर्ड परीक्षेतील उपस्थितीच ग्राह्य धरण्यात येणार असल्याने या विद्यार्थ्यांवरील अतिरिक्त ताण टाळण्यात आला आहे.

इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची पटपडताळणी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आयोजित नियतकालिक मूल्यांकन चाचणी परीक्षांच्या दिवशीच केली जाणार आहे. नववीच्या विद्यार्थ्यांसाठीही याच तारखा निश्चित करण्यात आल्या असून, मराठी, गणित व इंग्रजी या विषयांच्या वार्षिक परीक्षा अनुक्रमे ११, १५ आणि २२ एप्रिल रोजी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.शिक्षण विभागाने या मोहिमेद्वारे शाळांमधील विद्यार्थ्यांची अचूक संख्या व उपस्थिती नोंद सुनिश्चित करण्याचा उद्देश ठेवला असून, त्यासाठी प्रशासनाकडून व्यापक स्तरावर तयारी करण्यात आली आहे.

# होर्मुझ तूर्त खुली होणार नाही

अमेरिकेविरुद्धचे सर्वात प्रभावी अस्त्र आहे. त्यामुळे इराण या मार्गावर अडथळे निर्माण करून जागतिक ऊर्जा बाजारावर परिणाम करत आहे. तेलाच्या किमती वाढवून अमेरिकेवर दबाव आणण्याचा प्रयत्न ते करत असल्याचे दिसते.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सामुद्रधुनी पुन्हा सुरू करण्याचा दावा केला असला, तरी तज्ज्ञांच्या मते हा प्रयत्न अत्यंत खर्चिक आणि धोकादायक ठरू शकतो. इराणविरुद्ध लष्करी कारवाई केल्यास दीर्घकालीन युद्धाचा धोका वाढू शकतो.ऊर्जा दरवाढीमुळे अमेरिकेत महागाई वाढण्याची शक्यता आहे, ज्याचा राजकीय फटका ट्रम्प प्रशासनाला बसू शकतो.

# वैमानिकाची सुटका

लागला नाही. अमेरिकेचे एफ-१५ लढाऊ विमान पाडल्यानंतर दोन वैमानिकांनी इजेक्ट केले होते. त्यानंतर अमेरिकन विशेष दलांनी शत्रूच्या ताब्यातील प्रदेशात प्रवेश करत 'कॉम्बॅट सर्च अँड रेस्क्यू' मोहीम सुरू केली. या मोहिमेत हेलिकॉप्टर आणि कमी उंचीवर उड्डाण करणाऱ्या इंधनपुरवठा विमानांचा वापर करण्यात आला. विशेष दलांनी अत्यंत धोकादायक परिस्थितीत एका वैमानिकाला जिवंत शोधून सुरक्षित बाहेर काढले.

# साताऱ्यात भाजपाचा करिश्मा

**जिल्हा परिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच पोलीसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. सभागृहात जाण्यापूर्वीच सदस्यांचे मोबाईल काढून घेण्यात आले होते. गतवेळचा अनुभव लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेतली होती. जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी ठरलेल्या वेळेत सभापती निवडीचे सोपस्कार पार पाडले.**

**(पान १ वरून)**

वसंत मानकुमरे यांनी चार अर्ज घेतल्यानंतरच भाजपा पूर्ण ताकदीने उतरून या निवडणुकीत करिश्मा घडवणार हे स्पष्ट झाले होते. मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि जयकुमार गोरे, उपाध्यक्ष राजू भोसले यांनी व्युहरचना आखत राष्ट्रवादीलाच फुटीचा सुरूंग लावला. भाजपाने आपले सर्व सदस्य लक्झरीतून जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वारापर्यंत आणले. राष्ट्रवादीच्या लता कर्णे, ऋतुजा शिंदे यांना आपल्या गोटात सामील करून घेऊन राष्ट्रवादीला खिंडार पाडले. कर्णे यांना विषय समितीच्या सभापती तर सौ. शिंदे यांना महिला व बालकल्याण सभापती संधी देऊन जिल्हा परिषदेत सत्ता स्थापनेचा करिश्मा घडवला. मिळालेल्या माहितीनुसार राष्ट्रवादी सदस्य कामेश कांबळे हे निवडीपूर्वीच शिवेंद्रसिंहराजें यांच्या भेटीला गेल्याची चर्चा सुरू झाली.

पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील आणि पालकमंत्री शंभूराज देसाई यांना भाजपच्या गळाला कामेश कांबळे, ऋतुजा शिंदे, लता कर्णे हे सदस्य लागल्याचे लक्षात येताच खळबळ उडाली. या नाट्यमय घडामोडी नंतर या दोन्ही पक्ष नेतृत्वांनी निवडणुकीवर बहिष्कार घातला.

अनिल देसाई, संदिप मांडवे, स्वाभिमानीचे राजू शेळके यांच्यासह



सदस्यांनी जिल्हा परिषदेत येताना काळ्या फिती लावून प्रवेश करून निषेध नोंदवला. प्रवेशद्वारावरच सदस्यांनी प्रशासनाच्या विरोधात घोषणाबाजी केल्याने वातावरण अधिकच तापले. जिल्हाधिकारी संतोष पाटील यांच्यासह प्रशासन लोकशाही मार्गाने निवडी करत नसल्याचा आरोप सदस्य करत होते. ऋतुजा विराज शिंदे यांनी महिला व बाल कल्याण सभापती पदासाठी, ऋषीकेश धायगुडे-पाटील यांनी समाज कल्याण समिती सभापती पदासाठी, लता अविनाश कर्णे आणि तेजस्विनी विक्रमशिल कदम यांनी विषय समिती सभापदी पदासाठी नामनिर्देशनपत्र दाखल केले होते. चारही नामनिर्देशन पत्रे प्रत्येक पदासाठी प्रत्येकी एक आल्याने या चार जणांची निवड करण्यात आल्याचे जिल्हाधिकारी पाटील यांनी घोषित केले.यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, उपजिल्हाधिकारी (महसूल) विक्रांत चव्हाण, तहसीलदार समीर यादव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले आदी उपस्थित होते.

सभागृहात जाण्यापासून तसेच फॉर्म भरण्यापासून पोलिसांनी आम्हाला रोखले. मतदानापासून वंचित ठेवण्याचे मागे जसे कृत्य केले तसेच आज पण जाणीवपूर्वक बळाचा वापर करून प्रशासनाने तसेच पोलीस प्रशासनाने काम केले असल्याचा आरोप जि. प. सदस्य अनिल देसाई यांनी केला. विषय सभापती निवडीसाठी बहिष्कार टाकल्या नंतर पोवई नाका शिवतीर्थ येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केले.

## वादळी पावसाचा वीटभट्ट्यांना फटका

**कराड,ता.४(प्रतिनिधी)-**

**कराड तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या वादळी पावसाने शेतीसोबतच वीटभट्टी व्यवसायालाही मोठा फटका बसला आहे.**

रब्बी पिकांचे नुकसान, घरांची पडझड अशा घटनांबरोबरच वीटभट्टी मालकांनाही मोठ्या आर्थिक फटक्याला सामोरे जावे लागत आहे.

पुणे-बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गालगत गोटे गावच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर वीटभट्ट्या कार्यरत आहेत.

# गरिबांचे रक्त पिणाऱ्या बिल्डरांना सोडणार नाही

**(पान १ वरून)**

कुणी म्हणणार नाही; पण कर्जमाफी मागताना धनदांडगे लोक आहेत. त्यांच्याकडे ऐपत आहे. तेवढेच जर पैसे आपण गरीब शेतकऱ्याला दिले तर शेतकऱ्यांचा अधिक जास्त फायदा होऊ शकतो. गरीब शेतकऱ्याला कर्जमाफी मिळावी ही भावना होती. त्याचा आधार घेऊन अशा प्रकारचे खोटे व्हिडिओ तयार करणे आणि माझी समाजामध्ये प्रतिमा खराब करण्याचे काम सुरू आहे.

अशोक खरात प्रकरणात १२ गुन्हे दाखल झाले आहेत. यामध्ये एसआयटी तपास करत असून कोणीही सुटणार नाही. महसूल विभागातील अधिकारी दोषी आढळल्यास त्यांच्यावरही कारवाई केली जाईल. ज्यांच्याकडे पुरावे असतील त्यांनी ते एसआयटीला द्यावेत.दिंडोरी येथील अपघातात ६ मुलांसह ९ जणांचा मृत्यू झाल्यानंतर संबंधित विहीर कायमस्वरूपी बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मृतांच्या कुटुंबीयांना शासनाकडून मदत दिली जाणार असून अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी उपाययोजना केल्या जातील. राज्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान राबवले जात असून एप्रिलमध्ये १० तसेच १७ तारखेला तसेच पुढील महिन्यात शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. एनए अट रद्द करणे, तुकडेबंदी कायदा निरस्त करणे, मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना यांसारखे निर्णय जनतेपर्यंत पोहोचवले जात आहेत.

पुढील तीन महिन्यांत सर्व लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचवण्याचे नियोजन असून नाशिकमधील आडगाव येथे सुमारे १५ योजनांचा लाभ देण्यात येत आहे.अजित दादांचा काँग्रेस-राष्ट्रवादीच्या प्रत्येक परिवाराशी संबंध आहे. त्यांचे सहवास आठवून ही निवडणूक बिनविरोध व्हावी अशी माझी भावना आहे. याबाबत नाना पटोले आणि इतर नेत्यांशी बोललो आहे.

**माझ्याकडे ८० एकर शेती असल्याचे खोटे आरोप केले जात आहेत. प्रत्यक्षात माझ्याकडे २८ एकरच जमीन आहे. जाणीवपूर्वक बदनामी केली जात असून याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. संबंधितांविरोधात १० कोटी रुपयांचा अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार आहे.'**
**- चंद्रशेखर बावनकुळे,महसूल मंत्री**

## बारामती,राहूरीची निवडणूक होणार?

**(पान १ वरून)**

हाके यांनी सांगितले. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती विधानसभा पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून सुनेत्रा पवार या राष्ट्रवादीच्या उमेदवार असणार आहेत. ६ एप्रिल रोजी त्या आपला उमेदवारी अर्ज भरणार असून येथील निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी महायुतीचे सर्वच नेते प्रयत्न करत आहेत. त्याच अनुषंगाने सुनेत्रा पवार यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंशी फोनवरुन चर्चा करत पाठिंब्यासाठी विनंती केली.

# नेचर केअर सन्मान २०२६चे पुरस्कार जाहीर

## ११ महिला शेतकऱ्यांचा गौरव : १८ एप्रिलला पुरस्कार वितरण सोहळा

■ विटा,ता.४(प्रतिनिधी)-

**नेचर केअर फर्टिलायझर्स कंपनीतर्फे नेचर केअर सन्मान २०२६ पुरस्काराची घोषणा करण्यात आली असून यावर्षी महाराष्ट्र, गोवा आणि बेळगाव जिल्ह्यातील ११ महिला शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. यातील दोन पुरस्कार विभागून तर एक पुरस्कार उत्तेजनार्थ दिला जाईल.प्रत्येकी ५१००० रू.असे पुरस्काराचे स्वरूप असून उत्तेजनार्थ पुरस्कार २१००० रू. आणि सन्मान चिन्ह असे आहे. विटा येथे १८ एप्रिल रोजी पुरस्कार वितरण सोहळा होईल, अशी माहिती कार्यकारी संचालक जयदेव बर्वे यांनी दिली.**



**नेचर केअर सन्मान २०२६ च्या पुरस्कारांची घोषणा करताना कार्यकारी संचालक जयदेव बर्वे.**

बर्वे म्हणाले, नेचर केअर फर्टिलायझर्स ही सेंद्रिय खत निविष्ठा उत्पादित करणारी महाराष्ट्रातील अग्रगण्य कंपनी आहे. गेल्या २९ वर्षांपासून महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेश अशा अनेक राज्यात सेंद्रिय शेतीचा प्रचार व प्रसार करत नेचर केअरने अनेक शेतकऱ्यांचे नंदनवन फुलवण्यास हातभार लावला आहे. नेचर केअर फर्टिलायझर्सतर्फे सामाजिक कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी २०२३ पासून राज्यस्तरीय पुरस्कार 'नेचर केअर सन्मान' प्रदान करण्यात येतात. यापूर्वी देशी बीज संवर्धन, भरडधान्य उत्पादन आणि वृक्ष संवर्धन या क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यात आला आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाने यंदाचे वर्ष महिला शेतकरी वर्ष जाहीर केले. त्या अनुषंगाने यंदाचा राज्यस्तरीय 'नेचर केअर सन्मान' पुरस्कार महिला शेतकऱ्यांना देण्याचे निश्चित केले. कृषी क्षेत्रात स्वतःच्या कष्टाने आणि नाविन्यपूर्ण प्रयोगांनी समृद्धी फुलवणाऱ्या महिला शेतकऱ्यांचा गौरव करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्र, गोवा, व बेळगाव जिल्ह्यातून अर्ज मागवण्यात आले होते. या सर्व भागांतून एकूण ७७ अर्ज प्राप्त झाले, निवड प्रक्रियेतील पहिल्या फेरीमधून ३० अर्ज दुसऱ्या फेरीसाठी निवडण्यात आले. या ३० महिला शेतकऱ्यांच्या शेतीची प्रत्यक्ष पाहणी नेचर केअर फर्टिलायझर्सच्या प्रतिनिधींच्या मार्फत करण्यात आली. यातून २२ अर्ज प्रत्यक्ष मुलाखतीसाठी निवडण्यात आले.मुलाखतीनंतर एकूण ११ महिला शेतकऱ्यांची नेचर केअर सन्मानसाठी निवड करण्यात आली. यातील दोन पुरस्कार विभागून तर एक पुरस्कार उत्तेजनार्थ दिला जाईल. निवड समितीमध्ये डॉ. आशिष वेले, अरुण नाईक, कामाक्षी बर्वे यांनी कर्तव्य बजावले. पुरस्कार वितरण सोहळा १८ एप्रिल रोजी विटा येथे निमंत्रितांच्या उपस्थितीत होईल. या पुरस्कारांचे वितरण पद्मश्री सिंधुताई सपकाळ यांच्या सुकन्या ममता सपकाळ व आमदार सुहास बाबर यांच्या हस्ते होणार आहे. समारंभास डॉ. आशिष वेले, अरुण नाईक, कामाक्षी बर्वे तसेच नेचर केअर फर्टिलायझर्सचे अध्यक्ष जयंत बर्वे, कार्यकारी संचालक जयदेव बर्वे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

**या महिला ठरल्या शेतकरी सन्मानच्या मानकरी**

ललिता राहुल सोनवणे(रु. ५१०००,खेडगाव, ता. दिंडोरी,जि. नाशिक ),स्वाती नाना काळे(रु. ५१०००, पळशी ता.पंढरपूर, जि. सोलापूर , रसिका अनिल फाटक (रु. ५१०००, कोलथरे, पो. दहिगाव, ता. सुधागड, जि. रायगड), लता अनिल पोहेकर( रु. ५१०००, निंबी, ता. मोर्शी, जि. अमरावती), सीमा चंद्रकांत जाधव( रु. ५१०००, चिंबळी, ता. खेड, जि. पुणे),अश्विनी परशराम माळी( रु. ५१०००, आमणापुर, ता. पलूस, जि. सांगली), सविता संदीप तेली(रु. २५०००, पट्टणकोडोली, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर),नीलम वसंत रंदवे(रु. २५०००,. पालवण पो. सापटने ता. माढा, जि. सोलापूर),मनिषा भास्कर शिंदे(रु. २५०००, चिंचोली, ता. माढा, जि. सोलापूर),आदिती अशोक थिटे(रु. २५०००, बाहे पो.देवकाणे ता.रोहा जि. रायगड), श्रीया मुकुंद इनामदार ( रु.२१०००, बेडकीहाळ, ता. निपाणी, जि. बेळगाव)

# राष्ट्रवादीची धुरा सुनेत्रा पवारांकडेच

**(पान १ वरून)**

आयोगाला एक नवी पक्ष घटना सादर करण्यात आली होती. यामध्ये कार्याध्यक्ष (प्रफुल्ल पटेल) यांना राष्ट्रीय अध्यक्षांच्या समकक्ष अधिकार देण्याची तरतूद करण्यात आली होती. मात्र, निवडणूक आयोगाने ही नवी घटना स्वीकारली नाही किंवा तिला मान्यताही दिली नाही. त्यानंतर २६ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबईतील वरळी येथे पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन झाले. या अधिवेशनात अत्यंत महत्त्वाचे दोन निर्णय घेण्यात आले. सुनेत्रा पवार यांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली.पक्षाच्या मूळ घटनेत बदल करून कार्यकारिणीची मुदत तीन वर्षांवरून पाच वर्षांपर्यंत वाढवण्यात आली.

१ मार्च २०२६ रोजी प्रफुल्ल पटेल यांचे विश्वासू ब्रिजमोहन यांनी ईमेलद्वारे आयोगाला माहिती देण्याचा प्रयत्न केला. यात सुनेत्रा पवार अध्यक्ष आणि प्रफुल्ल पटेल कार्याध्यक्ष असल्याचा उल्लेख होता. मात्र, या पत्रासोबत अधिवेशनातील अधिकृत ठराव किंवा आमदार-खासदारांच्या सह्या नसल्याने आयोगाने त्याकडे दुर्लक्ष केले. विशेष म्हणजे, २६ फेब्रुवारीच्या नव्या कार्यकारिणीत ब्रिजमोहन यांचा समावेश नव्हता.शेवटी १० मार्च २०२६ रोजी वरळी अधिवेशनातील अधिकृत ठराव आयोगाकडे पाठवण्यात आले. यामध्ये सुनेत्रा पवार - राष्ट्रीय अध्यक्ष, शिवाजीराव गर्जे - खजिनदार तर कार्यकारिणीत पटेल, तटकरे, भुजबळ यांच्यासह १४ जणांचा समावेश करण्यात आला. (परंतु त्यांच्या विशिष्ट पदांचा उल्लेख करण्यात आलेला नाही).

**भविष्यात कोणताही बदल करायचा असल्यास, तो पुन्हा राष्ट्रीय अधिवेशनातच करावा लागेल आणि त्यानंतरच निवडणूक आयोगाला कळवावा लागेल.**

११ मार्च २०२६ रोजी पाच राज्यांच्या निवडणुकीत घड्याळ चिन्ह आरक्षित करण्याबाबत पुन्हा पत्रव्यवहार झाला. आयोगाच्या अभिलेखावर अधिकृत प्रतिनिधी म्हणून शिवाजीराव गर्जे यांचे नाव असल्याने, आयोगाने त्यांच्याशी संपर्क साधून अधिकृत पत्रव्यवहार पूर्ण केला. निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेसने पाठवलेल्या ठरावांची सखोल छाननी करून त्यांना मान्यता दिली आहे. त्यामुळे सुनेत्रा पवार यांची अध्यक्षपदी निवड आणि पार्थ पवार यांची खासदारकी यात कोणतीही कायदेशीर कमतरता नाही.

या निर्णयांना सहजासहजी आव्हान दिले जाऊ शकत नाही, कारण आयोगाकडे सादर केलेल्या पत्रात 'इन धीस रिगार्ड या शब्दांचा वापर करून स्पष्टता देण्यात आली आहे.

# जोतिबा डोंगरावर स्वच्छता अभियान

■ यवलूज, ता.४ (प्रतिनिधी)-

**जोतिबाची चैत्र यात्रा नुकतीच झाली. लाखो भाविकांनी जोतिबा देवाचे दर्शन घेतले. जोतिबाच्या चैत्र यात्रेनंतर जोतिबा मंदिर परिसरामध्ये, त्याचबरोबर आजूबाजूच्या डोंगरावर प्लास्टिक ,पत्रावळ्या, द्रोण, पाण्याचे रिकामे ग्लास, नारळाच्या शेंड्या असा बराच कचरा इतरत्र पडला होता. ज्ञानज्योती फौंडेशनने पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी सोनाली माडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता मोहीम राबवून कचरा उचलण्यात आला.**

या स्वच्छता मोहिमेमध्ये जोतिबा डोंगरावरील सेंटर प्लाझा, जोतिबा बस स्थानक, यमाई मंदिर पायऱ्या इत्यादी ठिकाणाची स्वच्छता करण्यात आली. सकाळी तीन तासाच्या श्रमदानानंतर डोंगरावरील अस्वच्छ ठिकाणाचे स्वच्छता केल्यामुळे परिसर चकाचक झाला. या स्वच्छता मोहिमेमध्ये दोन ट्रॉली प्लास्टिक कचरा जमा झाला. जमा झालेला कचरा ग्रामपंचायतच्या कर्मचाऱ्यांनी ट्रॉलीमधून एकत्र करत त्याची योग्य ती विल्हेवाट लावण्यात आली.अभियानामध्ये फौडेशनचे ५७ सदस्य, कोल्हापूर अर्थवॉरिअरचे सदस्य, वाडी रत्नागिरीचे ग्रामसेवक प्रवीण पवार ,खोतवाडीतील महिला सहभागी झाले होते.

|| चतुर्थ पुण्यस्मरण ||



स्व. तात्यासाहेब तुकाराम कोळी

असते समोर आमुच्या
निरंतर स्मित तुमचे
व्यक्तित्वाचा गंध तुमचा
जाणवतो पुन्हा पुन्हा
वाटावे खरे खरे, आकस्मिक
जाणे, तुमचे भासते अस्तित्व
तुमचे सारखे इथे तिथे!

श्रीमती जयश्री तात्यासो कोळी
विनायक तात्यासो कोळी
जवाहर कॅफे, इचलकरंजी.

मैत्रीच्या दुनियेतील सच्चा दोस्त



आमचे जीवलग मित्र
श्री. सुकुमार पांडुरंग भोंगाळे यांचे
शुक्रवार,दि. ३ एप्रिल २०२६
रोजी दु:खद निधन
झाले.त्यांच्या आत्म्यास
चिरशांती लाभो हिच
ईश्वरचरणी प्रार्थना!

कै. श्री. सुकुमार भोंगाळे

रमेश शंकर इंगवले
शिवाजी घोडके * गणेश इंगवले * संतोष शेटके
ओमकार इंगवले * स्वरुप इंगवले

रक्षाविसर्जन : सोमवार, दि. ६ एप्रिल २०२६ रोजी
सकाळी ८.३० वा. पंचगंगा नदीतिरी, इचलकरंजी.

|| विनम्र अभिवादन ||
१३ व्या पुण्यतिथीनिमित्त भावपूर्ण श्रद्धांजली!



कै. अजितकुमार बाळगोंडा पाटील, सदलगा

- शोकाकुल -

* श्रीमती लता अजितकुमार पाटील
* सौ. व श्री. अमरजीत अजितकुमार पाटील
(हॉटेल अमर, स्तवनिधी व सातारा)
* सौ. व श्री. रणजीत अजितकुमार पाटील
(माजी स्थायी समिती सभापती, सदलगा)
रणजीत इंजिनिअरींग इंडस्ट्रीज, इचलकरंजी.
चि. यशराज, कु. रीजुल, कु. परिणिता
समस्त पाटील परिवार, सदलगा,ता. चिक्कोडी, जि. बेळगांव.

# नाईकांनी मर्यादा ओळखाव्यात; अन्यथा शिवसैनिक उत्तर देतील

## उपमुख्यमंत्र्यांवरील टीकेवरून नाम. उदय सामंत यांचा इशारा

**कोल्हापूर ता. ४(प्रतिनिधी)**

**भाजप नेते गणेश नाईक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या वक्तव्यावरून उद्योगमंत्री उदय सामंत यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली. वरिष्ठ नेत्यांनी मर्यादा ओळखून बोलावे, अन्यथा शिवसैनिकही उत्तर देऊ शकतात, असा इशारा त्यांनी दिला. ते कोल्हापुरात शनिवारी माध्यमांशी बोलत होते.**



यावेळी बोलताना मंत्री सामंत म्हणाले, राज्याचे वनमंत्री असलेल्या गणेश नाईक यांनी वरिष्ठांविषयी बोलताना संयम ठेवला पाहिजे. अन्यथा ठाण्यातील शाखाप्रमुखही त्यांच्यावर बोलू शकतो. टीआरपीसाठी नाईक हे आमचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करत आहेत. मात्र, शिंदे यांच्यावर बोलण्याइतके नाईक मोठे नाहीत. ज्या मुख्यमंत्र्यांनी त्यांना मंत्री केले, त्यांचे ते ऐकणार नाहीत का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

कोल्हापूर जिल्ह्यात शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीसंदर्भात बैठक घेतल्याची माहिती त्यांनी दिली. स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या पहिल्या प्रचारसभेची नोंद कोल्हापुरात असल्याने येथे पक्ष अधिक मजबूत करण्यावर भर दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीही तशीच अपेक्षा असल्याचे त्यांनी नमूद केले.

भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावर सामंत यांनी कठोर भूमिका घेत, अशा प्रवृत्तीवर कडक कारवाई होणे आवश्यक असल्याचे सांगितले. संबंधित फोन कॉल यादीची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. तसेच अशोक खरात याला पाठीशी घालण्याचा प्रश्नच नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पाबाबत शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच काम पूर्ण केले जाईल, अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधीच मांडली असल्याचेही नाम.सामंत यांनी सांगितले.

# अतिक्रमण मुक्त इचलकरंजीसाठी अॅक्शन प्लॅन

## महापौर उदय धातुंडे : विरोधकांकडून केवळ दिशाभूल

**इचलकरंजी,ता.४–**

**इचलकरंजी शहराला अतिक्रमणाचा विळखा बसला आहे. याबाबत सर्वच नगरसेवकांनी शहर अतिक्रमणमुक्त करण्याचा संकल्प केला आहे. त्या दृष्टीकोनातून आम्ही अॅक्शन प्लॅन तयार केला असून ६ एप्रिलपासून फेरीवाला संघटना व व्यावसायिकांसोबत बैठका घेणार आहोत. तर २१ एप्रिलपासून प्रत्यक्ष अतिक्रमण हटाव मोहिमेला सुरुवात केली जाईल. अशी माहिती महापौर उदय धातुंडे व सभागृह नेता विठ्ठल चोपडे यांनी दिली तर विरोधकांनी केलेल्या टिकेवर उत्तर देताना विरोधक केवळ टीका करणे हे एकमेव लक्ष्य समोर ठेवून कोणतेही काम नसल्याने विरोधकांकडून या कामासंदर्भात जनतेची दिशाभूल करण्याचे काम करण्यात येत आहे असे त्यांनी सांगितले.**

शुक्रवारी शहरातील विविध विकासकामांच्या संदर्भात विरोधी पक्षातील शशांक बावचकर व मदन कारंडे यांनी टीका केली होती. त्या संदर्भात महापौर धातुंडे यांनी पत्रकारांशी संपर्क साधला. ते म्हणाले, मुख्यमंत्री फडणवीस हे इचलकरंजी दौऱ्यावर आल्यानंतर प्रातिनिधीक स्वरुपात त्यांनी काही विकासकामांचे ऑनलाईन उद्घाटन केले होते. मात्र, प्रत्यक्ष काम करण्याअगोदर आम्ही लोकप्रतिनिधींना घेऊन रितसर शुभारंभाचा कार्यक्रम केला. त्यामध्ये टीका करण्यासारखा विषय नव्हता. मात्र, विरोधाला विरोध म्हणून विरोधक आपली भूमिका बजावत आहेत.



**शहरातील मुख्य रस्त्यावर अतिक्रमण करून व्यवसाय थाटल्याचे छायाचित्र (छाया–मयूर चिंदे)**

इचलकरंजी शहराला अतिक्रमणाचा विळखा बसला आहे. त्या दृष्टीकोनातून आम्ही अॅक्शन प्लॅन तयार केला असून ६ एप्रिलपासून फेरीवाला संघटना व व्यावसायिकांसोबत बैठका घेणार आहोत. तर २१ एप्रिलपासून प्रत्यक्ष अतिक्रमण हटाव मोहिमेला सुरुवात केली जाईल. हे करत असताना कोणत्याही व्यावसायिकावर अन्याय होणार नाही याची काळजी घेऊन त्यांचे पुनर्वसन केले जाईल. पहिल्या टप्प्यात मुख्य रस्ता अतिक्रमणमुक्त केला जाईल. या कामात शहरवासियांनी साथ द्यावी, असे सांगितले.

शहरातील स्वच्छतेच्या विषयावर आम्ही गांभिर्यपूर्वक पावले टाकत आहोत. वारंवार सूचना देऊनही कचरा उठाव न करणाऱ्या एन. डी.के. कंपनीकडून काम व्यवस्थित केले जात नाही. तर कचरा डेपोच्या ठिकाणी मक्तेदाराकडून हयगय केली जात असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे या दोन्ही बाबतीत आम्ही कठोर पावले उचलणार आहोत. स्वच्छतेच्या बाबतीत आम्ही कोणतीही तडजोड स्विकारणार नसल्याचे महापौर धातुंडे व श्री. चोपडे यांनी सांगितले.

यावेळी उपमहापौर अनिल डाळ्या, स्थायी सभापती सतिश मुळीक, परिवहन सभापती सौ. अरुणा बचाटे, रवी रजपुते, सौ. रुपाली सातपुते, सौ. प्रमिला जावळे, सुशांत कलागते, अभिषेक वाळवेकर, योगेश पाटील, प्रमोद बचाटे, मनोज साळुंखे, रवी जावळे आदी उपस्थित होते.

# पती–पत्नीस पाईपने मारहाण

**सांगली, ता.४ (प्रतिनिधी)–**

**संजयनगर मधील जगदाळे प्लॉट मध्ये राहणाऱ्या पती–पत्नीला शेजारच्या मायलेकीने प्लास्टिक पाईपने आणि लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी संजयनगर पोलिसांनी संशयित मुमताज शानुर नदाफ ( वय ४५) आणि सादिया शानूर नदाफ ( वय २२, रा. जगदाळे प्लॉट) यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.**

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, याप्रकरणी रेहाना अमर मुल्ला (रा. जगदाळे प्लॉट ) यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे. शुक्रवारी संशयित मुमताज नदाफ आणि सादिया यांनी रेहाना यांच्या घरात घुसून प्लास्टिक पाईप ने त्यांच्यावर हल्ला केला. पायावर, पाठीवर हातावर, मारहाण करून केस ओढून रेहाना यांना खाली पाडले तर सादिया हिने वगऱ्याळ नामक भांड्याने रेहान यांच्या पतीवर हल्ला केला. याप्रकरणी पोलिसांनी दोघींवर गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्यातील वादाचे नेमके कारण अद्याप पुढे आलेले नाही.

# भाविकांच्या दागिन्यावर डल्ला मारणाऱ्या दोन चोरट्यांना अटक

**वारणानगर,ता.४(प्रतिनिधी)–**

**जोतिबा यात्रेत गर्दीचा फायदा घेत भाविकांच्या दागिन्यांवर डल्ला मारणाऱ्या दोन चोरट्यांना मुद्देमालासह पकडण्यात पोलिसांना यश आले आहे. प्रविण उर्फ पवन अनिल जाधव (वय २४ रा.पोखरमोह ता.शिरूर) व नागेश जवाहरलाल देवकते (वय ३७ रा.सरगम चौक पंढरपूर) अशी त्यांची नावे आहेत.**

मुख्य यात्रेच्या आदल्या रात्री रोहित बुचडे रहाणार कोल्हापूर हे दर्शनासाठी आले होते. यावेळी जोतिबा मंदिराजवळ गर्दीचा फायदा घेत गळ्यातील चेन चोरट्याने लंपास केली होती .या प्रकरणी ता. २ एप्रिल रोजी गुन्हा दाखल झाल्यानंतर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने चोरट्यांना पकडले असून त्यांच्याकडून चोरी केलेली रु १ लाख ३० हजार किंमतीची ११ ग्रॅम सोन्याची चेन पोलिसांनी हस्तगत केली आहे. दोन्ही चोरट्यांना न्यायालयात हजर केले असता त्यांना दोन दिवसाची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# हिट अॅण्ड रन मध्ये वृद्धाचा मृत्यू

**ईश्वरपूर,ता.४ (प्रतिनिधी)–**

**वाळवा तालुक्यातील हुबालवाडी परिसरात अज्ञात वाहनाच्या धडकेत ९० वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी ईश्वरपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी रोहित बाळासो माने (वय ३२, रा. हुबळवाडी, ता. वाळवा, जि. सांगली) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचे आजोबा शामराव बाबू माने (वय ९०) हे ४ एप्रिल २०२६ रोजी पहाटे सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास हुबळवाडी ते बहे जाणाऱ्या रस्त्यावर जॉगिंग करत होते. त्यावेळी ज्योतीलिंग मेडिकलजवळ अज्ञात वाहनाने भरधाव वेगात येऊन त्यांना जोरदार धडक दिली.या अपघातात गंभीर जखमी झालेल्या शामराव माने यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर संबंधित वाहनचालक घटनास्थळावरून फरार झाला असून, पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक भंडारे करीत आहेत.

## दोन तासाच्या थरारक खेळानंतर

# दोघा मच्छिमारांची मगरीच्या कचट्यातून सुटका

**सांगली,ता.४(प्रतिनिधी )–**

**सांगलीत कृष्णा नदीकाठावर बायपास पुलाखाली पिलर च्या कट्ट्यावर बसून मासे पकडणाऱ्या दोघांची मगरीने पाचावर धारण बसवली होती. बाहेर पडून काठावर येण्यासाठी दोघांनी पाण्यात उतरण्याचा प्रयत्न करताच मगर डोके वर काढत होती. सुमारे दोन तास हा थरारक खेळ सुरू होता. त्यानंतर बायपास पुलाखाली मगरीच्या कचाट्यात सापडलेल्या दोघांना मच्छीमारांच्या लोखंडी काईलीतून बाहेर काढले. तेव्हा दोघांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आणि पुन्हा या भागात मासेमारीसाठी न येण्याचा निर्णय घेऊन घराचा रस्ता धरला.**

तौफिक अल्लाउद्दीन कुरणे (वय ३५, जुना बुधगाव रस्ता) आणि संजय संभाजी लोंढे (वय ३८, रा. गणेशनगर) हे गेल्या काही वर्षांपासून नदीकाठावर गळ टाकून मासेमारी करत असतात. शनिवारी दुपारी एकच्या सुमारास दोघेजण बायपास पुलाखाली मासे पकडण्यासाठी आले. गुडघाभर पाण्यात उतरून ते पुलाच्या पहिल्या कॉलमच्या कठड्यावर जाऊन मासे पकडण्यासाठी बसले. सुमारे दीड तासात त्यांच्या गळाला बऱ्यापैकी मासे लागले. परंतु दोघे मासे पकडत असतानाच त्यांच्या काठावर येण्याच्या मार्गावर मगर येऊन दगडात दबा धरून बसली.

दोघांचा आरडाओरडा ऐकून मगर पाण्यात बुडाली. काही मिनिटे शांततेत गेल्यानंतर दोघांनी पाण्यात उतरण्याचा प्रयत्न करताच मगरीने पुन्हा डोके वर काढले. पुन्हा दोघेजण घाबरून कठड्यावर गेले.

मगर काठाजवळ दबा धरूनच बसली होती. सुमारे दोन तासांहून अधिक काळ मगरीने रोखल्यानंतर त्यांचा आरडाओरडा ऐकून पुलावरून जाणाऱ्या काहींनी मगरीचा हा थरार मोबाइलमध्ये टिपला. दोघांनी मदतीसाठी स्पेशल रेस्क्यू टीमला कळविले. टीमचे कैलास वडर तेथे दाखल झाले. त्यांना तत्काळ बोट मिळाली नाही. अखेर त्यांनी पुलाखाली येऊन मासे पकडण्यासाठी आलेल्या मच्छीमारांच्या काईलीतून दोघांना काठावर सुखरूप बाहेर काढले.

# श्री वीरशैव बँकेचा १२०० कोटी ठेवींचा टप्पा पार

## अध्यक्ष डॉ. सतिश घाळी : आंध्रप्रदेशात विस्तारास मंजुरी

**कोल्हापूर, ता.४ (प्रतिनिधी)–**

**मल्टीस्टेट श्री वीरशैव को–ऑपरेटिव्ह बँकेने आर्थिक वर्ष २०२५–२६ अखेरीस ठेवींच्या बाबतीत १२०० कोटींचा टप्पा पार करत भक्कम प्रगती नोंदवली आहे. मार्चअखेर बँकेच्या ठेवी १२०८ कोटी, कर्जे ६७४ कोटी, गुंतवणूक ६६९ कोटी असून एकूण व्यवसाय १८८२ कोटींवर पोहोचला आहे. तसेच बँकेने १७.५६ कोटी रुपयांचा तरतूदपूर्व नफा मिळविला आहे.**

बँकेच्या ३१ शाखांपैकी मंडई, पेठवडगाव, कळंबा आणि वाशी (नवी मुंबई) या चार शाखांमध्ये एनपीए शून्य टक्के असून एकूण नेट एनपीएही ० टक्के आहे. भागभांडवल व स्वनिधी २२४ कोटी रुपयांवर पोहोचल्याने बँक आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम झाल्याचे अध्यक्ष डॉ. सतिश घाळी यांनी सांगितले.

रिझर्व्ह बँकेकडून बँकेच्या कार्यक्षेत्र विस्तारास मंजुरी मिळाली असून आंध्रप्रदेश राज्यातही बँकेला कामकाजाची परवानगी मिळाली आहे. याशिवाय, मध्यवर्ती निबंधक, सहकारी संस्था, नवी दिल्ली यांच्याकडूनही आवश्यक मान्यता देण्यात आली आहे.

व्यवस्थापकीय संचालक प्रकाश पाटील यांनी सांगितले की, बँकेने नेट एनपीए ०टक्के, कासा ठेव २०%, नेटवर्थ ८२ कोटी आणि पीसीआर १०१टक्के राखत स्थिर कामगिरी केली आहे.बँकेने सुवर्णलक्ष्मी सोनेतारण कर्ज योजना ९.५०टक्के दराने सुरू केली असून विविध शासकीय योजनांद्वारे उद्योजकांना कर्जपुरवठा केला जात आहे. तसेच विनातारण कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.ग्राहकांसाठी सोनेतारण, वाहनतारण, गृहस्वप्न, धन्वंतरी, सोलर अशा कर्ज योजना सुमारे १०टक्के दराने, कृषीधन कर्ज १०.५०टक्के तर शैक्षणिक कर्ज ११टक्के दराने उपलब्ध आहेत. बँकेने शेड्युल्ड दर्जासाठी आवश्यक निकष पूर्ण करून रिझर्व्ह बँकेकडे प्रस्ताव सादर केला असून लवकरच मंजुरी मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# प्रेमसंबंधाच्या संशयातून युवकावर अमानुष हल्ला

## बेडगमध्ये संतापजनक घटना

**मिरज,ता.४(प्रतिनिधी)–**

**मिरज तालुक्यातील बेडग येथे प्रेम प्रकरणाच्या संशयातून युवकाला पाईपने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना सायंकाळी घडली. या घटनेमुळे परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

दिलीप बाबुराव शेंगणे (वय ३९) असे जखमी युवकाचे नाव असून त्याच्यावर मिरज येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, शेंगणे यांचे गावातील युवती सोबत प्रेमसंबंध असल्याचा संशय घेऊन काही युवकांनी त्यांच्यावर जीवघेणा हल्ला चढवला.

सायंकाळी सुमारे सातच्या सुमारास बेडग येथील एसटी स्टँड परिसरात ही घटना घडली. शेंगणे हे घराकडे जात असताना अचानक आलेल्या हल्लेखोरांनी त्यांना गाठत पाईपने निर्दयपणे मारहाण केली. या हल्ल्यात त्यांच्या अंगावर गंभीर वळ उठले असून पायाला गंभीर दुखापत झाली आहे.या प्रकाराने कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, संशयाच्या आधारे कायदा हातात घेणाऱ्या गुंडगिरीवर पोलिसांनी कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.दरम्यान, मिरज ग्रामीण पोलिसांनी घटनेची गंभीर दखल घेत तपास सुरू केला असून, संबंधित हल्लेखोरांचा शोध घेण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते.



आंतरराज्य चोरट्यांकडून जप्त करण्यात आलेल्या मोटारसायकली.

# संकेश्वरात दोन आंतरराज्य चोरट्यांकडून २७ दुचाकी जप्त

**संकेश्वर,ता.४(प्रतिनिधी)–**

**संकेश्वर पोलीसांनी मोठ्या शिताफीने दोन आंतरराज्य दुचाकी चोरट्यांना अटक करुन २७ मोटारसायकली जप्त केल्या आहेत.जप्त केलेल्या मोटारसायकली १८ लाख ३० हजार किंमतीच्या आहेत.**

संकेश्वर पोलीससूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, संकेश्वरात ३१ मार्च रोजी अजित सुभाष आरबोळे वय ( ४१,रा, जुगूळ ता, कागवाड) यांची बजाज डिस्कव्हर केए २३/ईडी १७९५ चोरीला गेली.अजित आरबोळे यांनी संकेश्वरात दुचाकी उभी करुन कामानिमित्त बाजारात गेले असता त्यांची दुचाकी चोरीला गेली.त्यांनी संकेश्वर पोलीस ठाण्यात आपली बजाज डिस्कव्हर मोटारसायकल चोरीला गेल्याची फिर्याद दाखल केली .

संकेश्वर पोलिसांनी सापळा रचून अट्टल आंतरराज्य दुचाकी चोर लक्ष्मण विरुपाक्षी कणबर्गी (वय ३१ रा. अंकलगी ता. गोकाक सध्या राहणार सामर्थ्य नगर बेळगाव),फकीरप्पा सिध्दप्पा करीगार (वय २५ रा. हिरेहट्टी ता. गोकाक. सध्या राहणार बोळकडबी तालुका यरगट्टी) याना अटक करुन त्यांची कसून चौकशी केली असता चोरट्यांनी महाराष्ट्र– कर्नाटक सीमाभागातील २७ मोटारसायकली चोरी केल्याचे कबूल केले.संकेश्वर पोलीस ठाण्यात चोरी प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

# हमिदवाडातील इसमाचे अपहरण करून बेदम मारहाण

## चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**मुरगूड ता.४(प्रतिनिधी)–**

**हमिदवाडा येथील राजेंद्र रामगोंडा जत्राटे यांना शेअर मार्केटमधील पैसे परत देण्याच्या वादातून त्यांचे अपहरण करून बेदम मारहाण केल्याप्रकरणी चौघांविरुद्ध मुरगूड पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी राजेंद्र रामगोंडा जत्राटे (वय ५२, रा. हमिदवाडा, ता. कागल) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांनी दोन वर्षांपूर्वी शेअर मार्केटिंगचा व्यवसाय सुरू केला होता. या माध्यमातून काही लोकांनी त्यांच्याकडे गुंतवणूक केली होती. त्यामध्ये सांगवडे (ता. करवीर) येथील तारा यादव यांनी ५० हजार रुपये गुंतवले होते. मात्र, शेअर मार्केटमध्ये तोटा झाल्याने जत्राटे यांनी व्यवसाय बंद केला आणि संबंधित रक्कम देणे बाकी राहिले.

याच कारणावरून संबंधित महिला वारंवार पैसे परत मागत होती. दरम्यान, दि. ३ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ४ वाजता हमिदवाडा ओढ्यावरुन राजेंद्र जत्राटेचे अपहरण करून पुणे बेंगलोर हायवेवरील कोगनोळी टोल नाका परिसरात त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी नेवून प्रविण यशवंत कांबळे (रा. सरवडे, ता. राधानगरी), अतुल बाळासो चांदणे (रा. बेलवळे बु., ता. कागल) आणि हेमांशी यादव (रा. सांगवडे, ता. करवीर) व अन्य एकजण अशा चौघांनी ३ लाख रुपयाची मागणी करीत त्यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली.

पैसे दिले नाहीत तर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकीही दिली.या मारहाणीत फिर्यादी जत्राटे यांच्या डाव्या डोळ्याला दुखापत झाली असून ते जखमी आहेत याबाबत त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून मुरगूड पोलीसात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

# कारागिरांना चालना देणे हीच खरी फलश्रुती

## काडसिद्धेश्वर स्वामी; कारागीर महाकुंभाची भव्य सांगता

**कोल्हापूर ता.४ (प्रतिनिधी)–**

**पारंपरिक कारागिरांच्या कलेला नवसंजीवनी देणाऱ्या सिद्धगिरी कारागीर महाकुंभाची शनिवारी भव्य सांगता झाली. कारागिरांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी शासनाने पुढाकार घेणे आवश्यक आहे. कारागीर महाकुंभाची खरी फलश्रुती म्हणजे शासनाने कारागिरांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, असे प्रतिपादन प.पू. काडसिद्धेश्वर स्वामी यांनी केले. कणेरी येथील सिद्धगिरी मठावर आयोजित सांगता समारंभात ते बोलत होते.**



श्री सिद्धगिरी संस्थान मठ आणि महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने ३१ मार्च ते ४ एप्रिल २०२६ या कालावधीत हा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. पाच दिवस चाललेल्या या उपक्रमाला तब्बल ४ ते ५ लाख नागरिकांनी भेट दिली.

आरोग्यमंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी कणेरी मठावर राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे कौतुक करत, भारतीय संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी हे ठिकाण देशभरात आदर्श ठरत असल्याचे सांगितले.

खासदार धनंजय महाडिक यांनी कारागीर महाकुंभाच्या संकल्पनेचे कौतुक करत, हस्तकलेला जागतिक स्तरावर मोठ्या संधी उपलब्ध होऊ शकतात, असे नमूद केले. आमदार राहुल आवाडे यांनी या उपक्रमातून समाजजागृतीचा संदेश दिला जात असल्याचे सांगितले. समरजित घाटगे यांनी विविध कारागिरांना एकत्र आणून त्यांच्या कलेला व्यासपीठ देण्याचे कार्य कौतुकास्पद असल्याचे नमूद केले.

महोत्सवात विविध अभियांत्रिकी व तांत्रिक महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादर केले. स्पर्धेत राजारामबापू टेक्निकल महाविद्यालय, इस्लामपूर यांनी प्रथम, आण्णासाहेब डांगे अभियांत्रिकी महाविद्यालय, आष्टा यांनी द्वितीय, तर डीकेटीईच्या विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक मिळवला. तसेच विविध कारागिरांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास माजी आमदार, पदाधिकारी, तज्ज्ञ व विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक यशवर्धन बारामतीकर यांनी केले, तर सूत्रसंचालन विवेक सिद्ध यांनी केले.

## दमदाटीचा जाब विचारल्याच्या कारणातून दोघांवर हल्ला

**कोल्हापूर ता.४ (प्रतिनिधी)–**

**रिक्षा व्यवसायातील वादातून एका चालकाने दोन जणांवर हल्ला केल्याची घटना शहरात घडली**

अमोल खर्जे याच्याविरोधात रिक्षाचालकांनी शाहूपुरी पोलिस ठाण्यात तक्रार अर्ज दाखल केला आहे. शहरात रिक्षा चालकांना दमदाटी केल्याच्या तक्रारीवरून काही रिक्षाचालकांनी खर्जे याला जाब विचारला होता. या घटनेचा राग मनात ठेवून खर्जे याने सर्जेराव केरबा पोवार यांच्या घरासमोर जाऊन रिक्षाची तोडफोड केली.यानंतर दुसऱ्याच दिवशी शनिवारी दुपारी प्रकाश निवृत्ती पोवार यांच्यावर हल्ला करण्यात आला. दरम्यान, खर्जे याच्या विरोधी शाहूपुरी पोलिस ठाण्यात लेखी तक्रार करण्यात आली.


भावपूर्ण श्रध्दांजली /ऋणनिर्देश



कै.सौ.स्मिता नवनाथ चव्हाण
स्वर्गवासः २५ मार्च २०२६

माझी धर्मपत्नी सौ.स्मिता नवनाथ चव्हाण हिचे बुधवार दि.२५ मार्च रोजी दुःखद निधन झाले.या दुःखद प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर, आप्तेष्ट, मित्रमंडळी, हितचिंतकांनी प्रत्यक्ष भेटून तसेच अप्रत्यक्ष संपर्क साधून सांत्वन करत आमचा दुःखभार हलका केला.या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.मृताच्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.!

शोकाकुल


पती-श्री.नवनाथ नामदेव चव्हाण, मुलगा-कु.पृथ्वीराज नवनाथ चव्हाण
समस्त चव्हाण परिवार, आप्तेष्ट व मित्रमंडळी,आदर्शनगर निपाणी.

टीपः उत्तरकार्य आज रविवार दि.५ रोजी आदर्शनगर येथील निवासस्थानी आहे.

# दुधगंगा धरण पात्राजवळचा काळूकी डोह बनतोय जीवघेणा

शिरगाव,ता.४(प्रतिनिधी)–

**राधानगरी तालुक्यातील दुधगंगा (काळम्मावाडी) धरणाच्या पायथ्याशी सुमारे एक किलोमीटर अंतरावर नदीपात्रातील काळूकीचा डोह जीवघेणा बनत चालला आहे. या डोहात नुकताच एका युवकाचा मृत्यू झाल्याने हा सहावा बळी ठरला आहे. त्यामुळे याठिकाणी प्रशासनाने पर्यटकांना बंदी घालावी, अशी मागणी राज्य पोलीस सेवा संघटनेचे संस्थापक–अध्यक्ष चंद्रकांत डोंगळे यांनी केली आहे.**



दुधगंगा नदी पात्रातील धोकादायक ठरत असलेल्या काळूकी डोहाचे छायाचित्र.

राधानगरी तालुक्याची पर्यटनाची पंढरी म्हणून ओळख आहे. त्यामुळे हिवाळा, उन्हाळा व पावसाळ्यात पर्यटकांची मोठी गर्दी असते. मात्र हौशी पर्यटन, हुल्लडबाजी आणि बेधूंद पर्यटकांमुळे तालुक्याच्या पर्यटनाला गालबोट लागत आहे. तालुक्यातील धरण क्षेत्रातील बॅक वॉटर पॉईंट तसेच, नदी पात्रात गेल्या तीन वर्षाच्या कालावधीत बारा लोकांचा बुडून मृत्यू झाला आहे. तर बत्तीस शिराळा येथील अभिषेक कांबळे हा तेरावा बळी ठरला आहे.

तालुक्यात उन्हाळ्याच्या काळात भोगावती, तुळशी, दुधगंगा नदी पात्र तसेच तलाव विहीरीवर पोहण्यासाठी लोकांची गर्दी असते. मात्र पोहण्याचा आनंद घेताना स्वतःची काळजी घ्यावी. तसेच प्रशासनाने धोक्याच्या ठिकाणी सुचना फलक लावणे गरजेचे आहे. जेणेकरून संभाव्य धोका टाळण्यास मदत होईल.

**पर्यटनाला बंदी घालण्याची मागणी**

तसेच प्रशासनाने पर्यटकांच्या हुल्लडबाजीवर अंकुश ठेवणे काळाची गरज आहे. त्यामुळे अशा दुर्दैवी घटना घडणार नाहीत. आजच्या युवा पिढीने आपल्या कुटूंबियांचा विचार करून संयम राखण्याची खऱ्या अर्थाने गरज निर्माण झाली आहे. स्थानिक प्रशासनाने याबाबत ठोस उपाययोजना करावी तसेच अशा घटना टाळण्यासाठी प्रशासनाने व पोलिस विभागाने येथील हुल्लडबाज पर्यटकांवर योग्य कारवाई करण्याची गरज आहे.जर असा अंकुश ठेवण्यात आला तर पर्यटकांकडून जीवावर बेतणारे धाडस टाळले जाईल.

**हा अपघात घडण्यापूर्वी दैनिक महासत्ताने १ एप्रिलच्या अंकात 'वाढत्या उन्हामुळे नागरिक हैराण'.आंघोळीसाठी नदी तलावावर वाढली गर्दी, या मथळयाखाली नागरिकांनी पोहण्याचा आनंद लुटतांना घ्यावयाची काळजी तसेच प्रशासनाने धोक्याच्या ठिकाणी सुचना फलक लावावे या आशयाचे सविस्तर वृत्त प्रसिद्ध केले होते. या वृत्ताव्दारे गेल्या काही वर्षात नदी, तलाव, धरण क्षेत्रामध्ये पाण्यात बुडण्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. याचे गांभीर्य नागरिकांनी विशेष करुन युवा वर्गाने ठेवणे महत्वाचे असल्याचे सांगण्यात आले होते.**



मुरगूडमध्ये शुक्रवारी गॅस एजन्सी समोर रांगेत ताटकळत थांबलेले ग्राहक.

# मुरगूडमध्ये गॅससाठी ग्राहकांच्या रांगा

**शहरात गॅसची प्रचंड टंचाई**
**३ हजार ५०० ग्राहक प्रतिक्षा यादीत**
**रोजचा गॅस पुरवठा केवळ ३०० ग्राहकांना**

मुरगूड,ता.४(प्रतिनिधी)–

**मुरगूडमध्ये अद्यापही गॅस ग्राहकांना नियमित सिलिंडर पुरवठा होत नसल्याने ग्राहकांना रांगेत दिवसभर गॅसवरच रहावे लागत आहे येथील बाळूमामा गॅस एजन्सीचे १६ हजार ग्राहक आहेत त्यापैकी ऑनलाईन बुकिंग केलेले ३५०० ग्राहक प्रतिक्षा यादीवर आहेत तर प्रत्यक्षात दररोज ३०० सिलिंडरचा पुरवठा होत असल्याने घरगुती गॅस ग्राहकांच्या रांगा दररोज पहायला मिळत आहेत.**

घरगुती गॅस पुरवठा सुरळीत होत असल्याचे प्रशासनाकडून सांगितले जाते. जिल्हा पुरवठा विभागाने गॅस पुरवठ्यावरील नियंत्रणासाठी तालुकावार निरीक्षकांच्या नेमणूका केल्या आहेत. तक्रार निवारणासाठी टोल फ्री क्रमांकही दिला आहे पण हे कागदोपत्रीच दिसते.प्रत्यक्षात वस्तुस्थिती पाहता ग्रामीण भागात गॅस सिलिंडरची टंचाई मोठ्या प्रमाणात भासत आहे.

घरगुती गॅस ग्राहकांना सिलिंडरसाठी एकवेळ ऑनलाईन बुकिंग नुसार डी.ए.सी.नंबर देण्यासाठी व प्रतिक्षा यादीत नाव नोंदणीसाठी दुसऱ्यावेळी रिसीट करण्यासाठी व तिसऱ्यावेळी सिलिंडर घेण्यासाठी तासन्तास रांगेत ताटकळत थांबावे लागते. ग्राहकांच्या उन्हातान्हात रांगा एजन्सीसमोर लागून असतात. यामध्ये वृद्धांचाही समावेश असतो. याकडे प्रशासनाकडून अक्षम्य दुर्लक्ष होत आहे.

एजन्सीकडील गॅस ग्राहकांची संख्या पाहता पुरवठा नगण्य प्रमाणात होत असल्याने मागणीप्रमाणे गॅसपुरवठा करण्याचे एजन्सी समोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. यात सामान्य ग्राहकांचे मात्र मोठे हाल होताना दिसतात. विशेषतः महिला व वृद्ध ग्राहकांना गंभीर समस्येला तोंड द्यावे लागत आहे.

## मंडलिक कारखान्याची सर्व ऊस बिले बँक खात्यात वर्ग

मुरगूड,ता.४(प्रतिनिधी)–



**लोकनेते सदाशिवराव मंडलिक कागल तालूका सहकारी साखर कारखान्याची चालू हंगामात ता.१६ जानेवारी ते हंगाम बंद अखेर गाळपास आलेल्या सर्व ऊसाची एफआरपी प्र.टनास रु.३,४१० प्रमाणे होणारी बिलाची रक्कम २९ कोटी ९० लाख ९१ हजार ८३२ रुपये संबंधित ऊस पुरवठादार शेतकऱ्यांचे बँक खात्यात वर्ग केली आहेत.**

त्याच प्रमाणे १६ डिसेंबर ते हंगाम बंद अखेरची रु.५,०१,२८,७९५ इतकी संपूर्ण तोडणी वाहतूकीची बिले सुध्दा संबंधित तोडणी वाहतूक कंत्राटदारांच्या खातेवर वर्ग केली असलेची माहिती कारखान्याचे चेअरमन संजय मंडलिक यांनी दिली. तरी संबंधीत ऊस पुरवठादारांनी व तोडणी वाहतूक कंत्राटदारांनी आपले बँकेशी संपर्क साधून बिले घेवून जावीत. मार्च अखेर वरील प्रमाणे सर्व बिले आदा केल्यामुळे शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे. यावेळी कारखान्याचे व्हा.चेअरमन आनंदा फराकटे, संचालक विरेंद्र मंडलिक, शिवाजीराव इंगळे,प्रकाश पाटील,कार्यलक्षी संचालक सर्जेराव पाटील व कार्यकारी संचालक एन.वाय.पाटील आदी उपस्थित होते.

# शरदमध्ये राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक स्पर्धा उत्साहात

यड्राव,ता.४–

**विद्यार्थ्यांनी स्वतःला कधीही कमी समजू नये. अपयश हे तात्पुरते असते, पण यश कायमस्वरूपी ठसा उमटवणारे असते. विद्यार्थ्यांना केवळ पदवीधर नव्हे, तर उद्योगासाठी पात्र, देशासाठी जबाबदार आणि समाजासाठी उपयुक्त नागरिक बनविणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन कुलगुरु पद्मश्री डॉ. जी.डी. यादव यांनी केले.**

ते यड्राव येथील शरद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे आयोजित 'इनोव्हेशन २ के २६' या राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी डॉ. वासंती यादव प्रमुख उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर अनिल बागणे होते.



यड्राव येथे इनोव्हेशन स्पर्धेचे उद्घाटन करताना डॉ.गणपती यादव, डॉ.वासंती यादव, अनिल बागणे, डॉ.बी.बी.संगमे आदी मान्यवर.

डॉ.यादव पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर विकासात्मक कामांसाठी, नवसर्जनासाठी आणि समाजोपयोगी निर्मितीसाठी करायला हवा.

यावेळी श्री बागणे म्हणाले, जीवनात आणि करिअरमध्ये पुढे जाण्यासाठी सकारात्मक विचार अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी केवळ स्वतःच्या करिअरसाठीच नव्हे, तर कुटुंब, गाव, देश आणि संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी सातत्याने कार्यरत राहिले पाहिजे. .

यावेळी महाराष्ट्रासह कर्नाटकातील अनेक महाविद्यालयातून हजारो विद्यार्थी सहभागी झाले होते.

सिव्हील–स्पॅन इट राईट, मेकॅनिकल– कॅड मॅनिया, टेक्निकल क्युझ, इलेक्ट्रॉनिक्स–रेक रिल्स, इलेक्ट्रो ब्रेनसस्ट्रॉम, हिअर क्युस्ट, इलेक्ट्रीकल–आयडिया एक्स्पो, मेकॅट्रॉनिक्स–मेकॅसर्किट अरेना, ॲटोमेशन रोबोटीक्स– ब्रेनस्पार्क क्युझ, रोबो ब्लाझ, इनोव्हेटेक्स, कॉम्प्युटर सायन्स– जावा मास्टर, टेक नॅरेट, इंटेलेक्ट अरेना, ए.आय.–आयडिया फोर्ज, ब्रेन बाइट, प्रथमवर्ष– स्लाइट मास्टर, माइंड स्पार्क, पोस्टर प्रेजेन्टेंशन यासह सर्व विभागात पेपर प्रेझेंटेशनसह २५ स्पर्धा झाल्या.

प्राचार्य डॉ.बी.बी. संगमे यांनी मनोगत व्यक्त केले. स्पर्धेचे समन्वय प्रा.अंजली झळके यांनी केले. सूत्रसंचालन अदिती काळे, मंजीरी जगताप यांनी केले. आभार प्रा. पी.एम. स्वामी यांनी मानले. यावेळी सर्व डिन, विभाग प्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

## यड्राव को–ऑप बँकेचा ४१५ कोटींचा व्यवसाय

**चेअरमन अजय यड्रावकर यांची माहिती**

जयसिंगपूर,ता.४(प्रतिनिधी)–

**यड्राव को–ऑपरेटिव्ह बँकेने २०२५–२६ या चालू आर्थिक वर्षात रु.४१५ कोटी रुपयांचा मिश्र व्यवसाय केला असून रु.४.८८ कोटी रुपये इतका ढोबळ नफा मिळविला असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष अजय राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी सांगितली.**



आर्थिक वर्षामध्ये रु.१६४ कोटींचे कर्ज वाटप केले असून अनुत्पादित कर्जाचे प्रमाण शून्य टक्के आहे. यड्राव बँक कोल्हापूर, सांगली, सातारा व सोलापूर जिल्ह्यामधील ग्राहकांना ६ शाखांद्वारे सेवा पुरवीत आहे. या उल्लेखनीय कामगिरीसाठी बँकेचे सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार, संचालक मंडळ, व्यवस्थापकीय मंडळ, बँकेच्या विविध कार्यकारी समित्या व सर्व कर्मचारी यांचे मोठे योगदान असल्याचे अध्यक्ष अजय पाटील यड्रावकर यांनी सांगितले. याप्रसंगी बँकेच्या व्यवस्थापकीय मंडळाचे अध्यक्ष संजय पाटील यड्रावकर, बँकेचे उपाध्यक्ष दिलीप मगदूम, लेखा परीक्षक सीए व्ही.के.बस्तवडे, तज्ञ संचालक सचिन देशिंगे, संचालक मंडळ, व्यवस्थापकीय मंडळाचे सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीशैल नायकुडे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## ससेगांव येथे विकासकामांचे उद्घाटन

सरूड,ता.४(प्रतिनिधी)–

**ससेगांव (ता.शाहूवाडी) येथील गोसावी वस्तीमध्ये सांस्कृतिक हॉल बांधकामासाठी १५ लाख रुपये तसेच विद्यामंदिर ससेगांव येथे एक वर्गखोली बांधण्यासाठी १० लाख रुपये, अशा एकूण २५ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे उद्घाटन आमदार डॉ. विनय कोरे यांच्या हस्ते करण्यात आले.**



या कार्यक्रमास कोल्हापूर जिल्हा परिषदेचे जनसुराज्य शक्तीचे गटनेते सर्जेराव पाटील (पेरीडकर), शाहूवाडी पंचायत समितीचे उपसभापती अमरसिंह खोत, रंगराव खोपडे, युवराज काटकर, सरपंच वनीता पारळे, उपसरपंच पांडुरंग पाटील, अशोक गोसावी, वसंत गोसावी, सुनिता गोसावी, प्रियांका पारळे, भरत गोसावी, ग्रा.प.सदस्या आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या विकासकामांमुळे गावातील शैक्षणिक व सांस्कृतिक सुविधांमध्ये मोठी भर पडणार असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

# राजे बँकेस ७.४२ कोटी रुपयांचा ढोबळ नफा

**अध्यक्षा नवोदिता घाटगे यांची माहिती**

कागल,ता.४(प्रतिनिधी)–

**कागल येथील शतकमहोत्सवी राजे विक्रमसिंह घाटगे को–ऑप बँकेने संपलेल्या आर्थिक वर्षात १४ शाखांच्या माध्यमातून तब्बल ९४३ कोटी रुपयांचा एकूण व्यवसाय साध्य केला असून ७ कोटी ४२ लाख रुपयांचा उच्चांकी ढोबळ नफा मिळविला आहे, अशी माहिती बँकेच्या अध्यक्षा सौ.नवोदितादेवी घाटगे यांनी पत्रकार परिषदेत दिली.**



कागल येथे पत्रकार परिषदेत बोलताना राजे बँकेच्या अध्यक्षा सौ. नवोदिता घाटगे, शेजारी उपस्थित संचालक.

बँकेच्या प्रधान कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्या म्हणाल्या की, यंदा सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याचा मानस असून समरजितसिंह घाटगे यांच्या कुशल नेतृत्वाखाली बँकेची प्रगतीपथावर वाटचाल सुरू आहे. या आर्थिक वर्षात बँकेच्या ठेवी ५९२ कोटी ६६ लाख, कर्जवाटप ३५० कोटी ७८ लाख इतके करण्यात आले आहे. तर बँकेने ३ कोटी २१ लाखांपर्यंत निव्वळ नफा साध्य केला आहे. बँकेचे भागभांडवल ५ कोटी ८८ लाख तर राखीव व इतर निधी ५३ कोटी ९७ लाखांपर्यंत पोहोचले असून गुंतवणूक २६० कोटी ४७ लाखांवर गेली आहे.

येत्या आर्थिक वर्षात १००० कोटींचा व्यवसाय गाठण्याचे तसेच सांगली व सातारा जिल्ह्यांत शाखा विस्तार करण्याचे उद्दिष्ट बँकेने ठेवले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पत्रकार परिषदेस संचालक रणजित पाटील, संजय पाटील, दत्तात्रय खराडे, संजय चौगुले, प्रकाश पाटील, राघु हजारे, अमर चौगुले, अमोल शिवई, ॲड.बाबासाहेब मगदूम, सौ.नम्रता कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण पाटील, संदीप रसाळ तसेच अधिकारी उपस्थित होते. संचालक एम.पी. पाटील यांनी स्वागत केले. उपाध्यक्ष रविंद्र घोरपडे यांनी आभार मानले.

# शिरदवाड येथील विधान सोहळ्यात मौजीबंधन संपन्न

शिरदवाड,ता.४(वार्ताहर)–

**येथील सुरू असलेल्या विधान सोहळ्यात मौजीबंधन अत्यंत उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यास अभुतपूर्व प्रतिसाद लागला.**

येथील दिगंबर जैन समाजाच्यावतीने बृहतगणधरवलय विधान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून हा सोहळा अत्यंत उत्साहात व धार्मिक वातावरणात सुरू आहे. त्यामध्ये उपनयन संस्कार (माजी बंधन) सोहळ्यास अभुतपूर्व उत्साह लाभला असून अनेक बालकांचे मौजीबंधन येथे करण्यात आले.सकाळी जलकुंभ मिरवणूक काढण्यात आल्यानंतर अभिषेक, शांतीधारा व होमहवन करण्यात आले. त्यानंतर अनेक बालकांचे मौजी बंधन संस्कार करण्यात आले या सर्व बालकांची हत्ती, घोडे तसेच विविध वाद्य वृंदासह जैन मंदिर पर्यंत मिरवणूक काढण्यात आली दुपारच्या सत्रात मंगल प्रवचन, सवाल समशरणात रत्नवृष्टी इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तर सायंकाळच्या सत्रात शास्त्र सभा, जाप्य,आरती व सांस्कृतीक कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी मोठी गर्दी झाली होती. आपल्या प्रवचनात मार्गदर्शन करताना मुनी चंद्रप्रभू सागर महाराज म्हणाले की, संस्कारक्षम पिढी निर्माण करण्याची सध्या गरज असून आई–वडिलांचे आशीर्वाद गुरु वचनांचे पालन व योग्य आहार इत्यादी गोष्टींचे युवकांनी आचरण करणे गरजेचे आहे.



शिरदवाड–जलकुंभ मिरवणूकीत सहभागी झालेले समाजबांधव.

यावेळी उपस्थित शिरोळ पंचायत समितीचे सभापती मिलिंद कुरणे व उपसभापती सौ. मनिषा रणजित कदम, इचलकरंजीचे माजी नगरसेवक बाळासाहेब कलागते, पै.अमृता भोसले तसेच पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते.



पाटपन्हाळा येथे घरावरील उडालेल्या पत्र्याचे छायाचित्र

## पाटपन्हाळ्याला अवकाळीचा दणका

**घरासह गोठ्यांचे मोठे नुकसान,गुरे जखमी**

शिरगाव,ता.४(प्रतिनिधी)–

**राधानगरी तालुक्यातील पाटपन्हाळा येथे गुरुवारी झालेल्या वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाने मोठी हानी झाली आहे. येथील एका शेतकऱ्याच्या घर व गुरांच्या गोठ्यावरील पत्रे उडून गेल्याने सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज असून पत्रे अंगावर पडल्याने जनावरे किरकोळ जखमी झाले आहेत.**

येथील शेतकरी गोविंद भाऊ पाटील यांच्या घरावरील व जनावरांच्या गोठ्या वरील पत्रे वादळी वाऱ्यामुळे उडून गेले. यावेळी सुटलेल्या वाऱ्याचा वेग इतका होता की हे पत्रे सुमारे ७० फूट अंतरावर जाऊन पडले. तसेच या पत्र्यापैकी काही पत्रे गोठ्यातील जनावरांच्या अंगावर पडल्याने गुरे जखमी झाली आहेत. सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झाली नाही.मात्र या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. प्रशासनाने या घटनेचा पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी गोविंद पाटील यांनी केली आहे.

# कागलच्या पाझर तलावाचा कायापालट कौतुकास्पद

**पन्हाळा,गगनबावडा,शाहूवाडीतील तलाव विकासापासून पोरके; लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष**

बाजारभोगाव,ता.४(वार्ताहर)–

**कागल येथील पाझर तलावाचा पर्यटनस्थळ म्हणून झालेला कायापालट सध्या संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरत आहे. कृत्रिम धबधबा, तलावातील बोटिंग, रंगीबेरंगी पाण्याची कारंजी, चिमुकल्यांसाठी छोटेखानी रेल्वे, बसण्याची व्यवस्था, प्रकाशयोजना आणि परिसराचे सुशोभीकरण यामुळे या तलावाचा लूक अक्षरशः 'गोवा बीच' सारखा बदलला आहे. परिणामी, सुट्टीच्या दिवशी व संध्याकाळच्या वेळी येथे पर्यटकांची मोठी गर्दी होत असून, कागलला पर्यटनाच्या नकाशावर नवी ओळख मिळू लागली आहे.**

या संकल्पनेला आकार देण्यात नाम. हसन मुश्रीफ व नगरपालिकेची दूरदृष्टी महत्त्वाची ठरल्याचे बोलले जात आहे. केवळ तलावाचे सुशोभीकरण न करता त्याभोवती रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. तलाव परिसरात खाद्यपदार्थांचे स्टॉल, खेळणी, बोटिंग, पार्किंग, फोटोग्राफी, लहान व्यावसायिक यांना रोजगार उपलब्ध झाला आहे. त्यामुळे कागल नगरपरिषदला उत्पन्न वाढू लागले असून स्थानिकांच्या हाताला कामही मिळू लागले आहे.



कागलच्या तलावातील कृत्रिम धबधबा व धबधब्याखाली भिजणारे पर्यटक.

कागलमध्ये झालेल्या या विकासकामाचे सर्वत्र कौतुक होत असताना, दुसरीकडे पन्हाळा, गगनबावडा आणि शाहूवाडी तालुक्यातील लघुपाटबंधारे तलावांकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याची भावना व्यक्त होत आहे. या भागातही निसर्गरम्य परिसर, डोंगरदऱ्या, तलाव आणि पर्यटकांना आकर्षित करणारी ठिकाणे आहेत. योग्य नियोजन केल्यास येथेही कृत्रिम धबधबे, बोटिंग, मुलांसाठी खेळणी, रेल्वे, कारंजी, खाद्यपदार्थ स्टॉल आणि मनोरंजनाच्या सुविधा उभारून मोठे पर्यटनस्थळ निर्माण होऊ शकते.

मात्र या भागातील अनेक लोकप्रतिनिधी अजूनही रस्ते, खड्डे बुजवणे, गटारी व मोऱ्या बांधणे या पारंपरिक कामांपुरतेच मर्यादित राहिल्याची टीका होत आहे. मूलभूत सुविधा आवश्यक असल्या, तरी स्थानिकांना कायमस्वरूपी रोजगार मिळवून देणाऱ्या पर्यटनविकासाकडे त्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. कागलच्या पाझर तलावाने दाखवून दिले आहे की, इच्छाशक्ती आणि दूरदृष्टी असेल तर एखादा तलावही मोठे पर्यटनकेंद्र बनू शकतो. त्यामुळे पन्हाळा, गगनबावडा व शाहूवाडीतील लोकप्रतिनिधींनी कागलच्या विकासकामातून काहीतरी बोध घेवून आपल्या मतदारसंघातही अशीच पर्यटनदृष्टीची कामे करावीत, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# वेदगंगा नदीचे पात्र कोरडे

## पाणी टंचाईचे संकट गडद;काळम्मावाडीतून पाणी सोडण्याची मागणी

निपाणी,ता.४(प्रतिनिधी)-

**गेल्या ५ ते ६ दिवसांपासून वेदगंगा नदीच्या पात्रातील पाणी कमी होऊ लागले आहे.उन्हाची तीव्रता वाढल्याने पिकांसाठी रोजचा पाण्याचा उपसाही वाढला.त्यामुळे नदीचे पात्र कोरडे पडले आहे.पात्रात सध्या मोजकेच पाणी शिल्लक आहे.त्यामुळे भविष्यात पाणीटंचाईच्या झळा भेडसावण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

जानेवारी व फेब्रुवारी महिन्याचे मार्चच्या पंधरवड्यात काळम्मावाडीचे पाणी नदीपात्रात दाखल झाले होते.त्यामुळे पात्र दुथडी भरून वाहत होते.मात्र मार्चच्या शेवटच्या आठवड्यापासूनच पाणी कमी झाले आहे. यंदा शेतकऱ्यांनी रब्बी हंगाम वेदगंगा नदीच्या पाण्यावरच साधला आहे.बऱ्याच शेतकऱ्यांनी तंबाखू पिकातून आंतरपिके घेतली आहेत.त्यामुळे तंबाखूची कापणी झाल्यावर या पिकांना पाणी दिले जात आहे. भूमी खात्याच्या अंदाजानुसार



निपाणी : पाण्याविना कोरडे पडलेले वेदगंगा नदीचे पात्र.

तालुक्यात यंदा २२०० हेक्टरवर रब्बीची पेरणी झाली होती.नदीचे पात्र कोरडे पडल्याने नदीकाठावर भीषण पाणीटंचाईची झळ सोसावी लागत असून शेतीसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होत आहे.त्यामुळे नदीकाठावरील नागरिकांना विहीरी व कूपनलिकांच्या पाण्याचा आधार घ्यावा लागत आहे.नदीकाठावरील जवळपास ३० ३५ गावे नदीच्या पाण्यावरच अवलंबून आहेत.कर्नाटक-महाराष्ट्र या दोन्ही राज्यांमध्ये झालेल्या काळम्मावाडी करारानुसार दरवर्षी कर्नाटकच्या वाट्याचे पाणी जानेवारीनंतर सोडले जाते.त्यामुळे लवकरात लवकर वेदगंगा नदीपात्रात पाणी सोडले जावे,अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# विकासासाठीच जोल्लेच पुढच्या आमदार झाल्या पाहिजेत

## एम.पी.पाटील

निपाणी,ता.४(प्रतिनिधी)-

**निपाणी तालुका विकासापासून वंचित होता. त्यावेळी आमदार शशिकला जोल्ले या निपाणीच्या आमदार झाल्या. आमदार झाल्यापासून १५ वर्षात विकासाचा डोंगर उभा केला. प्रत्येक गांवातील मुलभुत सुविधांच्या योजनापासून शेतीला पाणी, मंदिरे आणि शेतातील रस्ते अशा कोणत्याच अडचणी शिल्लक ठेवल्या नाहीत. डोंगर भागातील बुदलमुख गांवात आमदार शशिकला जोल्ले यांच्यामुळे ९० टक्के विकासाची कामे पूर्ण झाली आहेत. राहिलेली १० टक्के कामे येत्या कांही दिवसात पूर्ण होतील.**

१०० टक्के विकासासाठी आमदार जोल्लेच पुढच्या आमदार झाल्या पाहिजेत,असे प्रतिपादन हालशुगरचे अध्यक्ष एम.पी. पाटील यांनी केले.

बुदलमुख (ता.निपाणी) येथे आम.जोल्ले व बीडीसी बँकेचे अध्यक्ष आण्णासाहेब जोल्ले यांच्या प्रयत्नातून गौडवाडी ते महाराष्ट्र हद्दीपर्यंतच्या १.५ किमी. रस्त्यासाठी ३६ लाख रूपये मंजूर झाले आहेत. या रस्ता कामाचा शुभारंभ करताना ते बोलत होते.



बुदलमुखः येथील गौडवाडी ते महाराष्ट्र हद्दीपर्यंत रस्ता कामाचा शुभारंभ करताना एम.पी. पाटील,प्रकाश शिंदे, समित सासणे, देवानंद देवकते, शिवाजी चौगुले व इतर.

यावेळी बोलताना शिवाजी चौगले म्हणाले, आमदार जोल्ले व बीडीसी अध्यक्ष अण्णासाहेब जोल्ले यांनी बुदलमुख गांवासाठी भरभरून दिले आहे. गावातील ४ बाजूने येणारे रस्ते, पिण्यासाठी ६ बोअरवेल्स, पाणी पाईप लाईन, ५ हजार लिटर पाण्याची टॉकी, गांवातील ७५ टक्के फेव्हरब्लॉक, २ कोटीची शेतीच्या पाणी पुरवठा योजना, ओढ्यावरील पुल, गांवातील ६ मंदिरांचे जिर्णोद्वार पूर्ण झाले आहेत. सर्व बाजूचे पाणंद रस्ते पूर्ण केले आहेत. अशा प्रकारे सर्व कामे पूर्ण झाल्याने गावांतील ९० टक्के कामे पूर्ण झाली आहेत.उर्वरित कामेही होतील असेही चौगुले यांनी सांगितले.

यावेळी हालशुगरचे संचालक प्रकाश शिंदे, समित सासणे, देवानंद देवकते,आनंदा कुंभार, धर्मा कुंभार,पंकज देसाई, राजू कोकाटे, शिवाजी कुंभार, संदीप गौंड, विकास गौड, महादेव गौंड, गणेश गौड,तानाजी गौड, कल्पाना गौड, शोभा जाधव, सुवर्णा गौड, गिता गौड, सुशिला गौड, नंदा गौड, अंजना गौड, सुनंदा गौड उपस्थित होते.

## निपाणीतील मंगळवार पेठ हनुमान मंदिरात हनुमान जन्म सोहळा साजरा

निपाणी,ता.४(प्रतिनिधी)-

**मंगळवार पेठ निपाणी येथील हनुमान मंदिरात हनुमान जन्म सोहळा साजरा करण्यात आला. प्रारंभी पहाटे मंदिराचे पुरोहित गुरुस्वामी व उपस्थित भक्तांच्या हस्ते श्रींना अभिषेक घालण्यात आला.**



सकाळी ६ वाजून २७ मिनिटांनी श्री हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला.त्यानंतर भक्तांना सुंठवडा प्रसाद वाटप करण्यात आला.महिलांनी पाळणा गीत सादर केले.सायंकाळी ७ वाजता श्री हनुमान पालखी श्री राममंदिर येथे नेण्यात आली.दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती.कार्यक्रमास मंदिराचे ट्रस्टी व चेअरमन डॉ.सी.बी.कुरबेटी, सेक्रेटरी नितीन वाली, अजित मूर्तले, सनी शिप्पुरे, सुदीप येडूरे, सतीश येडूरे,अनंत बर्डे, मृणाल कुरबेटी, नागेश मुर्तूले,विरु मूर्तले,गणेश देशमाने,अलोक वाली,मिहीर कुरबेटी, सागर शांडगे, राजू येडूरे, विनायक कदम यांच्यासह मंगळवार पेठ महिला मंडळाच्या सर्व सदस्या उपस्थित होत्या.

## यरनाळात सोमवारपासून ग्रामदैवत अंबाबाई देवीची यात्रा

निपाणी,ता.४(प्रतिनिधी)-

**यरनाळ गावचे ग्रामदैवत श्री.अंबाबाई देवीची यात्रा सोमवार ता.६ ते बुधवार ता.८ एप्रिलपर्यंत संपन्न होत आहे. त्यानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत.**

ता.६ रोजी रात्री ७ वा. पारंपारिक विधी सुवासिनींच्यामार्फत पाणी आणणे (व्हंगाड), मंगळवार ता.७ रोजी सकाळी ७:०० वा. देवीस अभिषेक व पेहराव व सकाळी ९ वा. नैवेद्य व दंडवत, दु. ४ वा. देवीची भव्य अंबिल मिरवणूक तसेच रात्री १० वा. देवीची सवाद्य पालखी मिरवणूक होईल.बुधवार ता.८ रोजी सकाळी ७:०० वा.श्री मरगुबाई देवीस पेहराव व नैवेद्य, दुपारी ३ वा.विविध शर्यती होणार आहेत.पाडा बैलगाडी-जनरल बैलगाडी शर्यतीसाठी अनुक्रमे १०,००१, ७००१, ५००१, जनरल घोडागाडी शर्यत-५००१ ३००१, २००१, आदत बैलघोडागाडी शर्यत-५००१,३००१,२००१, नवीन नवतर व जनरल घोडागाडी शर्यत-५,००१, ३,००१, २,००१ रात्री १० वा. मास्टर नितीनकुमार कोल्हापूरकर यांचा लोकनाट्य तमाशा तर गुरूवारी ९ रोजी मायबोली गीतराधाई उत्सवशाही हा कार्यक्रम होणार आहे.

## बोरगाव येथे ११ एप्रिलला शेतकऱ्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन

बोरगाव,ता.४(प्रतिनिधी)

**श्रावकरत्न, सहकाररत्न स्वर्गीय रावसाहेब पाटील यांच्या ८२ व्या जयंतीनिमित्त शनिवार ११ एप्रिल २०२६ रोजी अरिहंत उद्योग समूह, दक्षिण भारत जैन सभेचे ग्रॅज्युएशन असोसिएशन व भ. वृषभनाथ कृषी कमिटी यांच्या संयुक्त विद्यमानाने शेतकऱ्यांसाठी किफायतशीर खर्चात उत्पादन वाढीबाबतची महत्त्वपूर्ण कार्यशाळेचे आयोजन केले असून, कृषी विज्ञान संत अंकुश पाटील हे शेतकऱ्याना मार्गदर्शन करणार असल्याची माहिती दक्षिण भारत सभेचे उपाध्यक्ष अभिनंदन पाटील यांनी दिली.**

बोरगाव येथे माहिती देताना अभिनंदन पाटील म्हणाले, स्व. रावसाहेब पाटील यांनी सहकार क्षेत्राच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रमांना प्राधान्य दिले आहेत. आज त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून वाटचाल सुरू आहे. त्यांच्या ८२ व्या जन्म जयंतीनिमित्त खास शेतकऱ्यांसाठी येथील अरिहंत सभागृह येथे शनिवारी ११ एप्रिल रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत महत्त्वपूर्ण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे .तरी शेतकऱ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

## अलाटवाडीत हनुमान जयंती साजरी

पट्टणकोडोली,ता.४(प्रतिनिधी)-

**अलाटवाडी (ता. हातकणंगले) येथील हनुमान मंदिरामध्ये हनुमान जयंती सोहळा भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी ६ वाजता कोल्हापूर येथील भालचंद्र कडेकर यांच्या हस्ते मूर्तीस अभिषेक घालून विधीवत पूजा करण्यात आली.**

सूर्योदयास ६.३१ वाजता हनुमान जन्मकाळ सोहळा पार पडला. त्यानंतर भाविकांतर्फे पुष्पवृष्टी करण्यात आली. आरती झाल्यावर भाविकांना सुंठवड्याचे वाटप करण्यात आले. धार्मिक विधी व पौराहित्य नरहरी मनुकर यांनी केले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते गदा पूजन व स्तोत्र पठण करण्यात आले.यावेळी उद्योगपती चिन्मय कडेकर, गजानन कडेकर, युवा उद्योजक गोविंदा मसुरकर, पंचायत समितीच्या सभापती अश्विनी बिरांजे, प्रभारी सरपंच विठ्ठल मोठे,शरद पुजारी यांच्यासह मान्यवरांनी श्रींचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी अलाटवाडी येथील हनुमान मंदिरामध्ये हनुमान जयंतीनिमित्त सौ.सुजाता धनंजय शिंदे यांनी हनुमंताची आकर्षक मूर्ती रांगोळीतून रेखाटली आहे. सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.

## आप्पाचीवाडी पुलाच्या कामाला प्रारंभ न केल्यास

# पाटबंधारे कार्यालयाला टाळे ठोकणार

### राजू पोवार यांचा इशारा

कोगनोळी,ता.४(प्रतिनिधी)-

**आप्पाचीवाडी (ता. निपाणी) येथील पुलाच्या कामासाठी लोकप्रतिनिधींनी केवळ आश्वासने देऊन दुर्लक्ष केले आहे. पुलाचे काम सुरु करण्यासाठी उद्घाटन होऊनही प्रत्यक्षात पुलाचे काम सुरु झाले नाही. त्यामुळे पंधरा दिवसांपूर्वी तहसीलदार आणि पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांची घटनास्थळी बैठक घेतली.**

त्यावेळी मार्च झाल्यानंतर कामाला सुरु करण्याचे आश्वासन दिले होते. पण अजूनही कोणतीच कार्यवाही झाली नाही. येत्या दहा दिवसात प्रत्यक्षात कामाला सुरुवात न झाल्यास पाटबंधारे विभागाच्या कार्यालयाला टाळे ठोकण्याचा इशारा कर्नाटक राज्य रयत संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष राजू पोवार यांनी दिला. शुक्रवार ता.३ रोजी आप्पाचीवाडी येथील शेतकऱ्यांसमवेत राजू पोवार यांनी घटनास्थळी भेट देऊन हा इशारा दिला.



आप्पाचीवाडी येथे घटनास्थळी पाहणी करताना राजू पोवार शेजारी संघटनेचे पदाधिकारी व शेतकरी बांधव.

राजू पोवार पुढे म्हणाले, पुलाच्या कामाचे प्रस्ताव पाठविल्याचे सांगून शेतकऱ्यांची दिशाभूल केली आहे. याकडे लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने लक्ष दिलेले नाही. आप्पाचीवाडी येथील पुलाचे काम तातडीने होणे गरजेचे आहे. किमान ५० टन वजन वाहून नेण्याची क्षमता असलेला सुसज्ज पूल येथे उभारणे आवश्यक आहे. या पुलामुळे परिसरातील शेतकऱ्यांना ऊस तसेच इतर पिकांची वाहतूक करणे सोपे होणार आहे. आप्पाचीवाडी येथील श्री हालसिद्धनाथ देवस्थान हे जागृत असल्याने येथे कर्नाटक-महाराष्ट्रासह अन्य राज्यातून भाविक मोठ्या प्रमाणामध्ये येत असतात. या सर्वांच्यासाठी हा पूल महत्त्वाचा आहे. त्यामुळे येणाऱ्या १० दिवसात पुलाच्या कामाला प्रत्यक्षात प्रारंभ न झाल्यास पाटबंधारे विभागाच्या कार्यालयाला टाळे ठोकणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी माजी ग्रामपंचायत सदस्य किसन पोटले, बी.एच.बोते, सचिन पटेकर, शिवाजी माने, सुर्याजी पोटले, लक्ष्मण दळवी, प्रदीप माने, अशोक वडे, रावसाहेब कुरणे, रुपेश खोत, कुमार पत्रावळे, बाबासाहेब कुरणे, सुभाष पत्रावळे, अंकुश माने, आशिष करे, आनंदा जालपुरे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी,कार्यकर्ते व शेतकरी बांधव उपस्थित होते.

## कोगनोळीत आज समाजसेवकांचा गौरव

कोगनोळी,ता.४(प्रतिनिधी)

**श्री सद्‌गुरु पूर्णानंद महाराज लोकसेवा मंडळ कोगनोळी या संस्थेचा २३ वा वर्धापन दिन सोहळा रविवार,ता.५ रोजी दुपारी ३ वाजता तारा पॅलेस हॉलमध्ये होणार आहे. त्यानिमित्त विविध क्षेत्रातील समाजसेवकांचा गौरव करण्यात येणार आहे,अशी माहिती लोकसेवा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष डॉ.प्रकाश कदम यांनी दिली.कोगनोळी (ता. निपाणी) येथे आयोजित प्रसारमाध्यमांशी माहिती देताना ते बोलत होते.**

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष आण्णासो माणगावे, सचिव एस.आर.पाटील, संचालक शाहीर संभाजी माने, सदाशिव पंढरे, विलास लोखंडे, राजेंद्र चौगुले आदी मान्यवर उपस्थित होते.

# गडहिंग्लज-चंदगड मार्गावर रस्त्याचे काम रखडले

गडहिंग्लज,ता.४(वार्ताहर)-

**गडहिंग्लज ते चंदगड तालुका हद्दीपर्यंत असलेल्या राज्य मार्ग क्र. १८९ वरील रस्त्याच्या रखडलेल्या व नियोजनशून्य कामामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असून, याबाबत तातडीने बैठक घेऊन योग्य नियोजन करण्याची मागणी जिल्हा परिषद सदस्य संग्रामसिंह कुपेकर यांनी केली आहे.**

उपविभागीय अधिकारी गडहिंग्लज यांना दिलेल्या निवेदनात कुपेकर यांनी नमूद केले की, गेल्या अनेक महिन्यांपासून या रस्त्याचे काम अत्यंत संथगतीने व नियोजनशून्य पद्धतीने सुरू आहे. नुकत्याच झालेल्या वळीव पावसामुळे रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले असून, त्यामुळे मोठ्या वाहनांसह दुचाकीस्वारांचे अपघात वाढल्याचे निदर्शनास येत आहे.विशेषतः नेसरी परिसरातून गडहिंग्लज येथे शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना या परिस्थितीचा मोठा फटका बसत आहे. विस्कळीत वाहतूक व्यवस्थेमुळे विद्यार्थ्यांना वेळेत शाळा-कॉलेज गाठणे कठीण झाले असून, त्यांचा शैक्षणिक वेळापत्रकावरही परिणाम होत आहे.दरम्यान, जून महिन्यापासून सुरू होणाऱ्या मुसळधार

### प्रवाशांचे हाल



गडहिंग्लजः उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देताना जि.पं.सदस्य संग्रामसिंह कुपेकर.

पावसाचा विचार करता, सद्यस्थितीत काम पूर्ण होण्याची कोणतीही खात्री दिसत नसल्याने स्थानिक नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

या पार्श्वभूमीवर, संबंधित विभागाचे अधिकारी, ठेकेदार व सुपरवायझर यांची तातडीने बैठक बोलावून कामाचा आढावा घेऊन ठोस नियोजन करावे, अशी मागणी कुपेकर यांनी केली आहे. अन्यथा नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## मुरगूडमध्ये हनुमान जयंती उत्साहात साजरी

मुरगूड,ता.४(प्रतिनिधी)-

**मुरगूड येथे श्री पूजक भाट समाजाच्यावतीने हनुमान जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी हनुमान मूर्तीला वैदिक मंत्रोच्चारात अभिषेक व पूजन करण्यात आले. हे पूजन दीपक बहुधान्ये यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.**

हनुमान जन्मकाळ साधून, पूर्वेकडील सूर्योदयाच्या लालिमेत श्रींच्या पाळण्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली. महिला भक्तांनी पारंपारिक पद्धतीने पाळणा गीत गायले. फटाक्यांची आतषबाजी करत संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमास भाट समाजातील लक्ष्मण भाट, नारायण भाट, भरत भाट, जनार्दन भाट, भाविक उपस्थित होते.

# व्यापारी नागरी पतसंस्थेला ७५ लाख नफा-गवाणकर

मुरगूड,ता.४(प्रतिनिधी)

**मुरगूड येथील विश्वनीय संस्था म्हणून नावारूपास आलेली आणि जिव्हाळ्याची पतसंस्था म्हणून ओळखली जाणारी रौप्यमहोत्सवी श्री . व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेला ७५ लाखाचा ढोबळ नफा झाल्याची माहिती सभापती किरण गवाणकर यानी दिली .**

यावेळी बोलताना गवाणकर म्हणाले,संस्थेची सांपत्तिक स्थिती भक्कम असून वसुल भागभांडवल ४९ लाख ७५ हजार राखीव व इतर निधी १ कोटी ४३ लाख , ठेवी २५ कोटी ४७ लाख , इतर तरतूदी १ कोटी २५ लाख, रोख व बँक शिल्लक २४ लाख ४१ हजार , गुंतवणूक ८ कोटी ७३ लाख, मालमत्ता २७ लाख ६४ हजार , कर्जे २० कोटी १९ लाख यापैकी १४ कोटी ७४ लाख सोने - तारण हे सुरक्षित कर्ज आहे, इतर येणी ४४ लाख ८ हजार, खेळते भांडवल ३० कोटी ३२ लाख , उलाढाल १५९ कोटी लाख झाली आहे.असून थकबाकी अल्प प्रमाणात आहे.स्टेशनरी १ लाख २१ हजार रूपयाची शिल्लक आहे अशी माहितीही गवाणकर यांनी यावेळी दिली. याप्रसंगी प्रशांत शहा, किशोर पोतदार,धोंडीबा मकानदार यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी उपसभापती प्रकाश सणगर, किशोर पोतदार, प्रशांत शहा, शशिकांत दरेकर, साताप्पा पाटील, नामदेवराव पाटील, निवास कदम , संदिप कांबळे,सौ.रोहिणी तांबट, सौ.सुनंदा जाधव,सुदर्शन हुंडेकर यांच्यासह कर्मचारी वर्ग, महिला कर्मचारी उपस्थित होते.

# बीडीसीसी बँकेला ५६.२५ कोटी रूपयांचा नफा-जोल्ले

निपाणी,ता.४(प्रतिनिधी)-

**जिल्ह्यातील शेतकरी आणि ग्राहकांनी आमच्यावर मोठा विश्वास ठेवला आहे.यावर्षी बँकेला गेल्या वर्षीपेक्षा जास्त ठेवी मिळाल्या आहेत. आमचे नवीन प्रशासन स्वीकारून ग्राहक आत्मविश्वासाने व्यवहार करत आहेत. त्यांनी कोणत्याही अफवा न ऐकता बँकेसोबत चांगले संबंध जपले आहेत. चालू वर्षात ५६.२५ कोटी रुपयांचा नफा कमावला आहे, असे बेळगावी डीसीसी बँकेचे अध्यक्ष आणि माजी खासदार अण्णासाहेब जोल्ले यांनी सांगितले.**

बँकेच्या सभा भवनात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना ते म्हणाले की, बँक शेतकरी आणि ग्राहकस्नेही म्हणून चांगले काम करत आहे.बेळगावी डीसीसी बँकेने चालू वर्षात ६७०३.३६ कोटी रुपयांच्या ठेवी जमा केल्या आहेत, ज्या गेल्या वर्षीपेक्षा ६१६.३० कोटी रुपयांनी अधिक आहेत. ठेवी जमा करून बँकेने चांगले परिणाम साधले आहेत.

चालू वर्षात जिल्ह्यातील ४,७७,४६४ शेतकऱ्यांना शून्य व्याजदराने ३८१८.७९ कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. जिल्ह्यातील एकूण ४४४ शेतकऱ्यांना ट्रॅक्टर कर्ज आणि पाईपलाईन कर्जासाठी २४.५४ कोटी रुपये देण्यात आले आहेत. १६५ संघटनांना गोदाम कर्जासाठी २२.८९ कोटी रुपये देण्यात आले आहेत. प्रति मेट्रिक टन ७७० रुपयांची सूट दिली जात आहे, असे ते म्हणाले.

चालू २०२५-२६ मध्ये ८ नवीन शाखा सुरू करण्यात आल्या असून, कोअर बँकिंग अंतर्गत एकूण ११२ शाखा कार्यरत आहेत. राज्यातील पहिल्या जिल्ह्यातील सर्व विविध उद्देशांच्या प्राथमिक ग्रामीण कृषी सहकारी संस्थांच्या कर्मचाऱ्यांना १ लाख रुपयांचा आरोग्य विमा, ५ लाख रुपयांचा जीवन विमा आणि १० लाख रुपयांचा अपघात विमा प्रदान करण्यात आला आहे, असे ते म्हणाले.२०२६-२७ या वर्षासाठी जिल्ह्यातील ३,६४,२०४ शेतकरी सदस्यांचा यशस्विनी योजनेत समावेश करण्यात आला आहे. पीकेपीएस संघ ग्रामीण चार सदस्यांच्या कुटुंबासाठी ५०० रुपये देत आहे. प्रति सदस्य १०० रुपये आणि ४ पेक्षा जास्त सदस्यांसाठी वर्गणी भरावी लागेल. अनुसूचित जाती/जमाती सदस्यांसाठी मोफत. जास्तीत जास्त चार सदस्यांच्या कुटुंबासाठी १००० रुपयांपर्यंत आणि ४ पेक्षा जास्त सदस्य असल्यास प्रत्येक सदस्यासाठी २०० रुपयांपर्यंत वर्गणी भरली जाईल, असे सांगण्यात आले आहे.भारतीय रिझर्व्ह बँक आणि नाबार्ड बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार बँकेत सायबर सुरक्षा प्रणाली लागू केली जात आहे, असे त्यांनी सांगितले.



बेळगावःपत्रकार बैठकीत बोलताना अध्यक्ष आण्णासाहेब जोल्ले,शेजारी आम.भालचंद्र जारकीहोळी व इतर.

जिल्ह्यातील ९१८ बचत गटांना ३६.१८ कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले आहे. ५ लाख रुपयांपर्यंत शून्य व्याजदर, १० लाख रुपयांपर्यंत ४% व्याजदर, दुचाकी, कार, जेसीबी, ट्रक, व्यावसायिक भाड्याचे वाहन, गृहकर्ज, तारण कर्ज, वैयक्तिक कर्ज यांसारख्या बिगरशेती कर्जांचे १६०.२८ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.

**सर्व शाखांमध्ये एटीएम सुविधा**

बँकेच्या डिजिटलीकरणाच्या अनुषंगाने, ग्राहकांना जलद व्यवहार करण्यासाठी आयएमपीएस सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यूपीआय सेवा लवकरच सुरू केली जाईल.

बँकेच्या मुख्य कार्यालयात एटीएम मशीनची सुविधा आहे. येत्या काही दिवसांत प्रत्येक तालुका आणि शाखेत एटीएम मशीन बसवण्यात येतील, असे जोल्ले म्हणाले.यावेळी बँकेचे संचालक आप्पासाहेब कुलगोड, नीलकंठ कप्पलागुड्डी, विरुपाक्ष मामाणी, नानासाहेब पाटील, बँकेचे महाव्यवस्थापक एन.जी. कलावंत आदी उपस्थित होते.

**१० हजार कोटी ठेवी गोळा करण्याचे लक्ष्य - जारकीहोळी**

गेल्या वर्षीच्या तुलनेत बँकेतील ठेवी सुमारे १६२२ कोटी रुपयांनी वाढल्या आहेत. बँकेबद्दल कितीही चुकीची माहिती पसरवली तरी, बँकेचे भागधारक त्यांच्या अफवांकडे लक्ष न देता आमच्यावर विश्वास ठेवतात, ज्यामुळे ठेवींमध्ये वाढ झाली आहे. येत्या काही दिवसांत जिल्हा प्रभारी मंत्री सतीश जारकीहोळी, बँक अध्यक्ष अण्णासाहेब जोल्ले यांच्या नेतृत्वाखाली १० हजार कोटी रुपयांपर्यंत ठेवी गोळा करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले असल्याचे बँकेचे मार्गदर्शक आणि अरभावीचे आमदार भालचंद्र जारकीहोळी यांनी सांगितले.

**पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत**

## * खरेदी विक्री *

**२ बीएचके फ्लॅट विकणे आहे.** सांगली रोड, फॉर्च्युन प्लाझाशेजारी, इचलकरंजी. फोन–९५७९३७३३६७

**खोतवाडी– तारदाळ** रस्त्यानजीक, अयोध्यानगर, खोतवाडी येथे प्रांत बिगरशेती प्लॉट विकणे आहेत. विजय–९६८९६९१८६२

**१ एकर जागा विकणे आहे.** शाहुनगर, गल्ली नं.१, चंदूर. संपर्क–९९२२७७२१८९

**म्हैस–गाय** तूप सर्व प्रकारच्या शुभ कार्यासाठी, महाप्रसादासाठी, होमहवनसाठी, हॉटेल व खानावळीसाठी चांगल्या क्वॉलिटीचे साजूक कणीदार तूप होलसेल दरात पोहोच मिळेल. परगावी विक्रीसाठी सुध्दा मिळेल. ८७८८२०४५१३

**शहापूर, जेके नगर,** कोरोची, कबनूर, इचलकरंजी या भागातील घर विकत पाहिजे. (एजंट क्षमस्व) संपर्क–८४२१२३४६२८

**४ बीएचके फ्लॅट** विकणे आहे. संपर्क– वृषभ ट्रेडर्समागे, इचलकरंजी. ८३२९६४८५१६

**माणकापूर गावात** लाईट, पाण्याची सोय असलेला ६५० व १००० स्क्वे. फूटाचे एनए प्लॉट विकणे आहेत. दर–७५० रू. स्क्वे. फूट. संपर्क–९३७०५८१००८, ९८९०९७२१७८

**चंदूर शाहूनगरमध्ये** मेन रोडपासून जवळ एनए प्लॉट विकणे तसेच हॉटेल गुडलक दत्तनगरमध्ये एनए प्लॉट विकणे. ८१४९९६५६९९, ९८९०२७४१७६

**विकणे–** मारूती इको पेट्रोल/सीएनजी जानेवारी २४ व्हाईट कलर, रनिंग फक्त १० हजार. संपर्क–९४२२४२४५९५

**मजुरीवर** धोतीची बिमे देणे आहे. ९ पैसे मजुरी. संपर्क–९४२०३५२५३६, ९३७०६५३०३४–विजय कदम.

**इचलकरंजी महानगरपालिका** हद्दीतील शहापूर येथील ३०X५० (१५०० स्क्वे. फूट) एन.ए. प्लॉट विकणे. संपर्क–९४२२६२०२७९

**इचलकरंजी मध्यवस्तीत** ५० रूमचे चालू स्थितीतले लॉजींग, बोर्डिंग, रेस्टॉरंट, हॉल योग्य किंमतीत विकणे आहे. संपर्क–९८१९०२८२०४

**फक्त १ बीएचके** मोजकेच फ्लॅट शिल्लक रू. १० लाख मध्ये व दुकानगाळे रू. १२ लाखामध्ये विक्रीस तयार संपर्क–९४२०१३२३७२

**एनए प्लॉट विकणे आहे.** ३०X३५ धनगर माळ, रूई, तसेच २५X२५ प्रथमेश पेट्रोल पंपाजवळ, रूई फाटा, कबनूर. संपर्क–७२६१९१५३४०, ९२०९४२६६६३

**दातार मळा १ ली गल्ली,** छत्रपती संभाजी महाराज चौक, डीमार्ट जवळ, ६०० स्क्वे. फूट (१५X४०) जागेतील घर विकणे आहे. संपर्क–९४२२६२९०००

**प्लॉट विकणे आहे.** अलायन्स हॉस्पीटलजवळ क्लियर टायटल १२५० स्क्वे. फूटाचा एनए प्लॉट, २५ फुटी रोडटच. संपर्क–९१३०००२७६६

**आपल्या घरी येऊन** सोफा क्लिनिंग (शाम्पोईंग) करून देऊ. जुने व नवीन बंगलो क्लिनिंग करून देऊ. संपर्क–८९७५९७४१०७, ८६००४३५१३२

**आभारफाटा सहारानगर** येथे १६००० चौ. फूट (एनए) जमीन विकणे आहे. संपर्क–८४८२९८८८०९, ८६९८००२०००

**जुने व नवे पॉवरलूम** घेऊ व देऊ. तसेच फवारा कांडीमशिन डक्टींग घेऊ व देऊ. संपर्क–८३१७२९१००८

**छोटी जाहीरात मोठा प्रतिसाद**

## * नोकरी विषयक *

**गरजू व निर्व्यसनी** टेम्पो ड्रायव्हर पाहिजे. ट्रान्सपोर्ट लायसन्स आवश्यकता आहे. ड्रायव्हर पाहिजे. संपर्क– ९०२२११०१९८

**Urgently Required-** Backend Office Manager (Female) Responsibilities : Client Communication (Calls, Email & Whatsapp) Software onboarding & Support General administration. Qualification : BCA or Equivalent Tally Experience Preferred. Good English Skills. Call-9637351516

**अर्जंट पाहिजेत.** मिल्क प्रोडक्ट (डेअरी) मध्ये काम करण्याकरिता कामगार पाहिजे. शिक्षणाची अट नाही. संपर्क–७८७५५१९९७२

**Walk in Interview-** Robotic Trainer (Qualification-ENTC/Diploma/B.Sc/B.Tech/BCA/MCA/Electronics/Mechanical/CS/IT) 8, 9 April 2026, Time-10am to 4 pm. Address- 3rd Floor, Aurum Lohiya Reality, Aaditya Corner, Tarabai Park, Kolhapur. Mail ID-hr@robostorms.com

**नामवंत शैक्षणिक संस्थेत** सायं. ४.३० ते ८.३० वेळेत ऑफिस कामासाठी व कौन्सील व ऑफिसबॉय या पदासाठी नेमणे आहेत. मो. ९९२२३१४३०९

**ब्लिंकीट स्टोअरसाठी** डिलीव्हरी बॉय हवे आहेत. कमवा महिना २५ ते ३० हजार, वखारभाग, इचलकरंजी. संपर्क–८८८८३५९५७४, ९६१५९६७१११

**फार्मासिस्ट पाहिजे.** ११ वी, १२ वी झालेली मुलगी पाहिजे. कल्पवृक्ष मेडिकल, संजय फौंड्रीजवळ, इचलकरंजी. संपर्क–७५८८९१३०७०

**भव्य प्रशिक्षण** निसर्गोपचार तज्ञ होवून महिना २७,०००/– मिळवा. कार्यशाळा हॉटेल सेंट्रल पार्क, भगतसिंग बागेसमोर, इचलकरंजी. संपर्क–९१५६३००८९०

**इचलकरंजी मधील** नामांकित कॅफे रेस्टॉरंटमध्ये पार्टटाईम/फूलटाईम अनुभवी व फ्रेशर कामगार पाहिजे. संपर्क–७०२०२४५६७२, इचलकरंजी.

**ASC** कॉलेजजवळ मॉंजिनिज केक दुकानात सेल्ससाठी मुलगी पाहिजे. शिक्षण– किमान १२ वी, भेटण्याची वेळ– संध्याकाळी ५–६. मो. ८६२४९२६२१०

**जय जगन्नाथ एक्स्पोर्ट, प्राईड इंडिया, तारदाळ येथे** 'शिफ्ट सुपरवायझर' या पदासाठी उमेदवार पाहिजेत. अनुभवी किंवा फ्रेशर–१ ते २ वर्षांचा अनुभव. पगार–१०००० ते १५००० महिना. अपेक्षा आणि जबाबदारी– १) कामावर सातत्य, वेळेचे पालन आणि कामाकडे लक्ष देणे. २) सुताचा आणि कापडाचा हिशोब आणि कामगारांवर लक्ष ठेवणे व त्यांच्याशी समन्वय साधणे. मो. ९६७३६८४६१७. Email. jaijagannathexports@gmail.com

**कॉम्प्युटर हार्डवेअर** इंजिनिअर पाहिजेत. आकर्षक पगार+भत्ता. संपर्क–श्रीकॉम एंटरप्राईजेस, धान्य ओळ, फेडरल बँकेजवळ, इचलकरंजी. फोन–८३७८९८११०४, ९३२५८१११०४

**मोफत कॉम्प्युटर प्रशिक्षण** योजनेअंतर्गत ५० बॅचेसना प्रवेश सुरू. नोकरी, व्यवसायभिमुख कोर्सेस CCC, Tally Prime, Graphic Design, Advance Excel, Taxation, Programming कोर्सेस ना नाममात्र नोंदणी फी व शासनमान्य केंद्र सरकार व ISO Certificate. पत्ता– योगाश्रम रोड, तारदाळ नाका, शहापूर. 2nd नगरपालिका कॉम्प्लेक्स, गाळा नं.६४ व ६५, इचलकरंजी बसस्टँडजवळ. संपर्क–७२१९२५८९७५, ८९९९२४३३८१

**नामांकित ॲडव्हर्टायझिंग कंपनीमध्ये** लेडीज अकौंटट पाहिजे. किमान दोन ते तीन वर्षाचा अनुभव आवश्यक. संपर्क–८६८७१८१८१९, ९८२२६६९५४८

**यार्न ऑफिसमध्ये** अनुभवी व निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजेत. संपर्क–९२८४७४८२९७

**ब्रॅन्डेड मेन्सवेअर शोरूममध्ये** अनुभवी सेल्समन पाहिजे. आकर्षक पगार व कमिशन मिळेल. संपर्क–९६११८९५९८८

**टेली कॉलिंगसाठी** मुली हव्या आहेत. आकर्षक पगार, ऑफीसमधून काम, शिक्षण १० वी पुढे श्री महालक्ष्मी वधू–वर, मो. ८८३०२४०४२६.

**इचलकरंजीमध्ये** रेफ्रिजरेशन कंपनीमध्ये कामगार पाहिजेत. रेफ्रिजरेशन मेकॅनिक–१ जागा, इलेक्ट्रीकल आयटीआय–२ जागा, वेल्डर/फिटर आयटीआय–१ जागा, हेल्पर–१० वी/१२ वी पास/नापास– १ जागा. सर्व जागा अनुभव ० ते २ वर्षे. संपर्क–९६७३०२१७३२

**CNC/VMC-** प्रोडक्शन क्वॉलिटी सुपरवायझर पाहिजेत. पत्ता– लक्ष्मी इंडस्ट्रिज, हातकणंगले. संपर्क–९८५००५७५६३

**हेल्पर पाहिजे.** श्रीम इंडस्ट्रिज कंपनीमध्ये पावडर कोटींग युनिटमध्ये हेल्पर कामासाठी जेंटस पाहिजेत. (अनुभवी+फ्रेश) आकर्षक पगार, पत्ता– विनायक हायस्कूल, शहापूर. ७०८३८४८९४६

**बारसाठी वेटर पाहिजे.** संपर्क–८८०६४८४९१९, ९५९५२७४५२७

**ड्रायव्हर पाहिजेत.** बोलेरो पिकअप/दोस्त टेम्पोसाठी प्रामाणिक ड्रायव्हर पाहिजेत. (TR) लायसन्स आवश्यक. फक्त गरजू व्यक्तींनी त्वरीत संपर्क साधावा. ९५११२७९९४१

**हेल्पर पाहिजेत.** बाहेर गावी टेम्पोसोबत जावून डिलेव्हरी वाटप करणेसाठी प्रामाणिक हेल्पर पाहिजे. संपर्क–९९२२३१३३६६

**Chate English Medium Academy** शिक्षक भरती. 1) English-B.A. B.ed. 2) Maths-B.Sc-M.Sc. B.ed. 3) Science- B.Sc-M.Sc. B.ed. 4) Marathi- B.A. B.ed. 5) Hindi- B.A. B.ed. 6) His.Geo.-B.A. B.ed. वरील पदे त्वरीत भरणे आहेत. संपर्क–९५९५६९२६१७, ७२१९२८५८२३

**सांगली नाक्याजवळ** प्लास्टिक मोल्डींग मशिनवर शिकाऊ स्त्री व पुरूष कामगार पाहिजेत. फक्त दिवसपाळी, कामाचे तास–८ तास व १२ तास. मो. ९८८१०७३५२९

**पाहिजे.** शेती कामासाठी अनुभव असलेला दिवाणजी पाहिजे. बीएससी ॲग्री किंवा डिप्लोमा यांना प्राधान्य. संपर्क–९८८१४९११५८२

**होलसेल किराणा दुकानात** कामगार पाहिजे. कॉम्प्युटरवर बिलींगसाठी कामगार तसेच इलेक्ट्रीक गाडीसाठी ड्रायव्हर कम हमाल पाहिजे. संपर्क–९८६०८०७५५८, ९९७५२३४६५१

**इंटरनेट कॅफेसाठी** अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. संपर्क–९३७१२९५९००

**कामगार पाहिजे.** रंगाच्या दुकानात कामासाठी नवभारत पेंटस, बंगला रोड, कॉंग्रेस कमिटीजवळ, इचलकरंजी. ९८२३१८१४४८

**कामगार पाहिजेत.** लेडीज/जेंटस, कापड दुकानाकरिता संपर्क–क्रींन्झ, जनता चौक, इचलकरंजी. फोन–७७९६७७२७७७

**आम्ही नोकरीही देतो** आणि ती मिळावी यासाठी त्याची तयारी ही आम्ही करून घेतो. अधिक माहितीसाठी. ९५११८७६५८३, ९३२५८१११०२

**A leading Consultancy** Firm Requires office Staff with Qualification B.Com/M.Com, CA Inter/Final. CA, BBA/MBA with Good Computer Knowledge, Send your Resume on-9665654723

**कामासाठी मुले पाहिजेत.** बादशहा कृषी सेवा केंद्र, बादशहा पेट्रोल पंपासमोर, सांगली रोड, इचलकंजी. भेटणेची वेळ– दुपारी १२ ते ४.

**पार्वती इस्टेट जवळील** टेक्स्टाईल मिलमध्ये एअरजेट लूमकरिता अनुभवी दिवाणजी व क्वॉलिटी राऊंडर/चेकर व वायडिंग/खरड दिवाणजी पाहिजेत. संपर्क–७७२००१८४०६

**पार्वती इस्टेट जवळील** टेक्स्टाईल मिलमध्ये मेंडर व हेल्पर पाहिजेत. संपर्क– ७७२००१८४०६

**ज्वेलर्समध्ये हुशार** व अनुभवी सुशिक्षित सेल्समन/सेल्सगर्ल पाहिजे. मोबाईलवर दागिन्याची रिल्स तयार करता येणाऱ्याला प्राधान्य. मो. ९४२१८४८४८६

**अकाऊंटंट पाहिजे.** ऑफिस कामासाठी हुशार व अनुभवी अकौटंट जेंटस/लेडीज पाहिजे– २ जागा. संपर्क–९३२६००६५४३

**Required-** Purchase Asst. (Female): Any Graduate1. Exp. 1-3 Years. Loc. Parvati Industrial Estate, Yadrav. Vendor Handling, Stock & PO Experience Required. Cont. 7720018406. Email-hrdstmpl@gmail.com

**माल चेकिंग,** पॅकिंग आणि माल काढण्यासाठी लेडीज कामगार पाहिजे. लिहता–वाचता येणे गरजेचे आहे. पत्ता. डॉ. आंबेडकर पुतळाजवळ, स्टेशन रोड, इचल. ९३५६७८५५०७

**अर्जंट ऑफिस वर्क** आणि होमवर्कसाठी १२ वी पास मुली पाहिजेत. टेलीकॉलिंग/डेटा एन्ट्री कामासाठी पगार–१४०००/–. संपर्क–७३९७९०८२१०

**हेल्पर पाहिजे.** मोहनस पॅकेजिंग कटींग ऑपरेटर पाहिजे. संपर्क–८०५५०८९९५८, ८८३०७६०३५०

**पाहिजेत.** नामांकित केक आणि बेकरी ब्रँडसाठी १) मार्केटिंग DBM/Graduate. २) सुपरवायझर–Graduate + Computer Knowledge. संपर्क–८५५२०३४००९

**पाहिजेत.** इचलकरंजीस्थित नामांकित बेकरीत केक मेकींग व पॅकिंगसाठी १) हेल्पर (महिला/पुरूष) १० वी/१२ वी पास/नापास. २) सफाई कामगार (महिला/पुरूष) आकर्षक पगार व इतर लाभ. संपर्क–८५५२०३४००९

**कापड दुकानात** पुरूष कामगार पाहिजेत. शिकाऊ/अनुभवी. संपर्क– नारायण पेठ, इचलकरंजी. ७०२८८३११११, ९८६०६६१३२७४

**ऑफिसमध्ये** कामासाठी विवाहीत महिला पाहिजेत. संगणक ज्ञान आवश्यक. संपर्क–हत्ती चौक, इचलकरंजी. ९८३४८९२९७१

**जेंटस कामगार पाहिजे.** टू व्हिलर आवश्यक. बेसिक –१२०००/– पगार. संपर्क–९६३१३१६०३०

**नामवंत कंपन्यांच्या** इलेक्ट्रॉनिक्स वस्तू विक्रीसाठी इलेक्ट्रॉनिक्स शोरूममध्ये ४ अनुभवी सेल्समन पाहिजेत. पगार–१४००० ते ३०००० पर्यंत अनुभवानुसार. ९२२६८८१४७०

**इलेक्ट्रॉनिक्स शोरूममध्ये** बॅक ऑफिस कॉम्प्युटर ऑपरेटिंगसाठी लेडीज पाहिजेत. ९५१८३६५३९२

**नामांकित वकिलांच्या ऑफिसमध्ये** होतकरू व शिक्षणाची आवड असणारे १२ वी पास मुली पाहिजेत. ठिकाण– जैन मंदिरजवळ, हातकणंगले. संपर्क–९८५०५७०९३३, ९३७१७२३९३९

**सिक्युरिटी गार्डस् पाहिजेत.** इचलकरंजी शहाराकरिता ड्युटी ८ व १२ तास, आकर्षक पगार. मो. ८८५७०४९५९०, ९८२९५४५४६८

**१) विश्वासू दिवसपाळीसाठी** वॉचमन पाहिजे. २) अनुभवी विश्वासू कायमस्वरूपी कारवर ड्रायव्हर पाहिजे. धनलक्ष्मी कॉटन मिल्स् कापड मार्केटसमोर, इचलकरंजी.

**गारमेंटमध्ये** शिलाई कामासाठी महिला कामगार पाहिजेत. जयभवानी परिसर, गावभाग, इचलकरंजी. संपर्क क्रमांक–७७७६८१८२८४

**१० वी/१२ वी** पास/नापास मुले पाहिजेत. भागवत मिल स्टोअर्स, स्टेशन रोड, अजब फर्निचरसमोर, इचलकरंजी. मो. ७०९७६०७०७०

**टेलिकॉलिंगसाठी आणि** Coral Draw येत असलेली महिला उमेदवार पाहिजेत. संपर्क– न्यु उत्सव डिजीटल–९९६०४०१५५०

**घर कामासाठी** व मुले सांभाळण्यासाठी महिला पाहिजे. पूर्णवेळ, कबनूर संपर्क–९८९०३०४६०३

**Required.** Data Entry Operator (Female) Exp, 1 year, Ichalkaranji. 7090969802.

**नामांकित फुलांच्या बुके दुकानात** कामासाठी गरजू मुलगा/मुलगी पाहिजे. संपर्क–९१२०९१७१७७, ८८८८२३१७३५

**शिकाऊ लेडीज** कामगार भरती सुरू आहे. नेण्याची–आणण्याची सोय. कोरोची मार्गे आहे. कोअर शॉप, लक्ष्मी इंडस्ट्रिज इस्टेट, हातकणंगले. संपर्क–७७४५८८४८९६, ९८९०८८७१९६

**पाहिजेत.** Laser Cutting M/C वरती ऑपरेटर शिक्षण– ITI, DME, १२ वी पास तसेच Welder, Fitter त्वरीत पाहिजेत. भेटा– परफेक्ट लेसर्स, स्टेशन रोड, कोरोची. ८७९३५४४४९७, ९३२६१०७६४४

**कामगार पाहिजे.** बांधकाम साईटवरील वरकामासाठी शिकाऊ गवंडी/कामगार/शिकाऊ पेंटर पाहिजे. योग्य मोबदला. संपर्क–८१८००४६०६०, मेसेज करावा.

**Mandhana Synthetics PVT Ltd.** Required Experienced Tally Accountant Needed Location Parvati Industrial Estate, Yadrav. Mob. 9325305531

**नामांकित रोकडे बंधू** अमृततुल्य चहा दुकानासाठी पार्टटाईम/फूलटाईम कामगार पाहिजे. संपर्क–मलाबादे चौक, शहापूर रोड, इचलकरंजी. फोन–८४२१९६८६५४

**आपटे वाचन मंदिर, ('अ' वर्ग तालुका वाचनालय) ३/५६९, राजवाडा चौक, इचलकरंजी.**

### उपग्रंथपालपद भरणेबाबत

**आपटे वाचन मंदिर, इचलकरंजीमध्ये उपग्रंथपाल या पदासाठी B. Lib, किंवा M. Lib, ही शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांनी शुक्रवार दि. १० एप्रिल २०२६ रोजी सायं. ५.०० वाजता मूळ कागदपत्रांसह ग्रंथालयात उपस्थित रहावे.**

अध्यक्ष
**आपटे वाचन मंदिर**

**सेल्समन पाहिजे.** मराठी, कन्नड भाषा येणे आवश्यक. गोकुळ टेन्ट सप्लायर, डेक्कन चौक, इचलकरंजी. फोन–९३६००४०६००, ७३५०७४५६९३

**अकौटंट पाहिजे.** नामांकित फौंड्रीमध्ये फूलटाईम संगणक ज्ञान आवश्यक. संपर्क–९९२१६८६४००, ९६६५०१९८३१

**पाहिजेत.** स्मार्ट ब्रेनी अकॅडमीसाठी एज्युकेशनल कौन्सीलर आणि स्मार्ट टेलिकॉलर नेमणे आहे. पत्ता–सिटीइन हॉटेलसमोर, इचलकरंजी. मो. ९५१८३९७७७०, ९५५२९१७२३२

**लेडीज पाहिजे.** ८ महिन्याचे लहान बाळ सांभाळण्यासाठी लेडीज पाहिजे. वेळ– सकाळी ९ ते संध्याकाळी ७ पर्यंत. पत्ता– गांधी कॅम्प परिसर, इचलकरंजी. मो. ९८९०१११११३, ८८८८८८८९५८

**Accountant Required-** Accountant with 4-5 years experience in GST & Income Tax Needed in Ichalkaranji. Contact-9923980783

**पाहिजेत.** सेल्समन, टेली मार्केटिंग तसेच मार्केटिंगसाठी लेडीज किंवा जेंटस पाहिजेत. प्रकाश लाईट हाऊस इंडिया प्रा. लि. संपर्क–७८८७९७८८८३, ७५८८३३९६३१

**व्हीएमसी ऑपरेटर व** टर्नर पाहिजेत. प्रोग्रॅम व सेटिंग शिकवले जाईल. पगार–१० ते २० हजार. संपर्क–९४२३२९०४०७, कोरोची.

**Required Accountant-** Experience-1 to 2 years in Tally Prime. Contact-9225585858 at Borgaon

**गोडावून कामासाठी** हेल्पर पाहिजे. संपर्क– वर्धमान हौसिंग सोसायटी महावीर जैन मंदिरसमोर, रॉंवका सदन, इचलकरंजी.

**गॅस एजन्सी ऑफिसमध्ये** ऑफिस स्टाफ पाहिजे. डेक्कन, शहापूर रोड खणीजवळ, एचपी गॅस गोडाऊन, शहापूर. फोन–९५४५२२०१८९

**महाराष्ट्रातील** नामवंत नेटवर्किंग कंपनीमध्ये सोशल मिडीया प्रमोशनकरिता व कॉल सेंटरकरिता मुले/मुली पाहिजेत. अनुभवी व्यक्तींनी कॉल करा. ८४३९२३२३२३

**अकौंटट असिस्टंट पाहिजेत.** टॅलीचे ज्ञान असणारे अनुभवी लेडीज/जेंटस संपर्क–९६७३८७७४९४

**अकौंटट पाहिजेत.** टॅलीचे ज्ञान आवश्यक. १ ते २ वर्षाचा अनुभव (लेडीज/जेंटस) संपर्क–६३६४९१२८६५०, एमआर पॉलिमर्स, बोरगांव.

**ड्रायव्हर पाहिजे.** अनुभवी, निर्व्यसनी कार ड्रायव्हर पाहिजे. संपर्क–एम.आर. पॉलिमर्स, बोरगाव. ६३६४९१२८६५०

**वधुवर सुचक ऑफिसमध्ये** कामासाठी ग्रॅज्युएट मुलगी पाहिजे. शहापूर. संपर्क–९८२३४२५४०४

**फोन पे कंपनीमध्ये** हातकणंगले व शिरोळ तालुका करीता फिल्ड सेल्स एक्झीक्युटिव्ह पाहिजेत. पगार–१७,५०० + इन्सेंटिव्ह + पीएफ संपर्क–७५०७७०६१३०, ७०३५१५१७१७

**लेडीज स्टाफ पाहिजे.** मगदूम आयुर्वेदिक क्लिनिक, गांधी पुतळा, इचलकरंजी. संपर्क–९७६६३५४४६७

**कामगार पाहिजे.** हार्डवेअर दुकानात अनुभवी व शिकाऊ कामगार पाहिजे. आकर्षक पगार, संपर्क–उमिया हार्डवेअर मार्ट, वखारभाग, इचलकरंजी. मो. ८४११०३५४११

**पाहिजेत.** The Salon 21, इचलकरंजी येथे अनुभवी जेंटस बार्बर– २ जागा, टेलीकॉलर लेडीज– १ जागा. चांगला पगार+इन्सेंटिव्ह. संपर्क–८०८७९९५५८१

**लॅपटॉप शोरूममध्ये** सेल्ससाठी मुलगी पाहिजे. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. संपर्क–प्रमोद इन्फोटेक–९७६७४९६९२२

**ऑटोलूम मधील** कापड ट्रेनिंगचा अनुभव असणारा स्टाफ पाहिजे. अप्सरा ग्रुप, कामाक्षी प्लाझा, दुसरा मजला, शाहू कॉर्नर, हॉटेल मन शेजारी, इचलकरंजी.

**बिअरबार व परमिट रूमसाठी** अर्जंट वेटर पाहिजेत. संपर्क–९५४५३९०९०८, ९८८१९५७०५५

**सीएनसी व व्हीएमसी सेटर** व लाईन इन्स्पेक्टर पाहिजेत. जागा–२. ईएसआयसी सुविधा उपलब्ध. आकर्षक पगार. संपर्क–७८४१९११२९६, ९८५०८७१४८१

**कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे.** बेसिक नॉलेज टॅली चे ज्ञान असलेला कॉम्प्युटर ऑपरेटर (ज्युनिअर अकौंटंट) पाहिजे. संपर्क–९८२२५०२६६४

**लेडीज रिशेप्सनिस्ट पाहिजे.** पार्टटाईम सकाळी ८.३० दुपारी ते ३.०० टू व्हिलर येत असेल तर उत्तम गोपाळ होमिओपॅथी हॉस्पिटल, रामजानकी हॉलसमोर, नदीवेस, इचलकरंजी. ९८३४२३३१७८

**पाहिजेत.** डी.टी.पी. ऑपरेटर–पेजमेकर, फोटोशॉप, कोरल ड्रॉ ची माहिती असणारे व प्रुफरिडर–मराठी भाषेचे ज्ञान असणारा पाहिजे. संपर्क–९७६६४०००११

**ड्रायव्हर पाहिजे.** ट्रान्सपोर्ट लायसन सहीत संपर्क–उदय एजन्सी, इचलकरंजी. मो. ९८२२६२१३०२

**मुली पाहिजेत.** हिंदूस्थान युनिलिव्हर कंपनीमध्ये मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह मुली पाहिजेत. १२ वी पास, आकर्षक पगार + इतर सर्व सुविधा. संपर्क–उदय एजन्सी, इचलकरंजी. मो. ९८२२६२१३०२

**पेपर कारखान्यात**–जेंटस ऑपरेटर–२, हेल्पर–जेंटस–२, लेडीज सुपरवायझर (बी.कॉम)–१ पाहिजेत. संपर्क–८०८७३६७४१८. (भेटणेची वेळ– दुपारी ४ ते ६)

**हॉटेलमध्ये** साफसफाईसाठी हेल्पर पाहिजेत. मो. ९५९५६०४७४७

**शिका व कमवा–** आमच्या इंडस्ट्रिजमध्ये शिकाऊ मुलांची आवश्यकता आहे. काम– स्टेनलेस स्टिल रेलिंग व मॉड्युलर किचन संबंधित. सुविधा– इएसआयसी/पीएफ, उत्तम प्रशिक्षण, भविष्याची संधी. संपर्क–समर्थ इंडस्ट्रिज, टाकवडे. ९३७१५९५६६६

**ऑफिस कामासाठी मुली पाहिजेत.** पद– सेल्स असिस्टंट, पगार– बेसिक सॅलरी इन्सेंटिव्ह स्थळ, लिंबू चौक, इचलकरंजी. फोन–९२८४००७४०४

**पाहिजेत.** वेल्डर–३, हेल्पर–४, हॉलमार्क हॉस्पिटल फर्निचर, सावली सोसायटी, शहापूर रोड, इचल. ९९२२१४२०४०, ९४२३२७५२३२

**ऑफिस कामासाठी** विवाहीत लेडीज टायपिस्ट पाहिजे. शिक्षण–किमान १२ वी, इंग्रजीचे ज्ञान आवश्यक. संपर्क– वारणा बँकेजवळ, बंगला रोड, इचलकरंजी. फोन–९८३४९८३२९०

**होलसेल कॉस्मेटिक दुकानात** १० वी /१२ वी झालेली मुले पाहिजेत. हिरा एन्टरप्राईजेस, गांधी कॅम्प, गंथडे खानावळशेजारी, इचलकरंजी.

**सेल्समन पाहिजेत.** साडी दुकानमध्ये काम करणेसाठी अनुभवी लेडीज व जेन्टस सेल्समन पाहिजे. चौकशी वैशाली कापड केंद्र, मेनरोड, हॉटेल कुबेरशेजारी, इचलकरंजी. मो. ९८२२२५६६६६

**पाहिजेत.** इचलकरंजी जनता बँकेजवळ ऑफिस कामासाठी १०० + जागा अर्जंट भरती. वय, शिक्षणाची अट नाही. मुली/महिलांना सुवर्णसंधी. संपर्क–७२१९६०४४५४, ९१३०९१९५९५

**नवीन एअरजेट लूम युनिटसाठी अनुभवी प्रोडक्शन** आणि स्टोअर मॅनेजमेंट स्टाफ हवा. त्वरीत जॉईनिंग, आकर्षक पगार. संपर्क–९४०५५१२३४६

**नवीन एअरजेट युनिटमध्ये** लूम ऑपरेटर बिमगेटर्स पाहिजे. आयटीआय प्रशिक्षण घेतलेला असेल तर १०% जादा रक्कम. संपर्क–९९७०११२३४६

**क्रिकेट टर्फ व** मल्टि फंक्शन हॉलसाठी मॅनेजर हवा. बुकिंग ग्राहक संपर्क– स्टाफ व दैनंदिन व्यवस्थापक पाहणारा जबाबदार उमेदवार हवा. वयोमर्यादा ३० वर्षे. चांगला पगार, तात्काळ जॉईनिंग. संपर्क–९९७०११२३४६

**गारमेंटमध्ये परकर** शिवण्यासाठी ऑपरेटर पाहिजे. दोन वेळ चहा, मोफत २६ दिवस कामाची हमी, महिलांचा ग्रुप असेल तर एकवेळ वहातुकीचा खर्च मिळेल. संपर्क–९४०५५१२३४६

**फॅब्रिकेशन शीटमेटल** व हॉस्पिटल फर्निचर तयार करणेसाठी हेल्पर, $Co_2$ Orgen वेल्डर भरती सुरू आहे. संपर्क–९०२१२०२७३१

**त्वरीत सिक्युरिटी गार्ड** नामवंत कंपनीकरिता नेमणे आहेत. ठिकाण–तारदाळ, शहापूर, जे.के.नगर, इचलकरंजी. त्वरीत संपर्क–९०६७९८५२३३

**अकौंटट पाहिजेत.** ड्युटी १२ तास–१८,०००/– पगार. मातोश्री प्रोडक्शन, हुपरी. फोन–८००७०६२५७७

**हमाली कामासाठी** हेल्पर – पगार १८००० व वेल्डर मिस्त्री पगार २१००० पाहिजेत. शिवमल्हार ट्रेडर्स, खंडोबावाडी, यड्राव. मो. ९०२८९२२२८९, ९८२२४५५६०४.

## * भाड्याने देणे/घेणे *

**पंचगंगा शुगर फॅक्टरी कमानीजवळ** संजय फौंड्रीसमोर ४००० स्क्वे. फूट मोकळी जागा भाड्याने देणे आहे. संपर्क–९६५७६५२४२६, ८८७९९४१११७

**भाड्याने देणे.** आरसीसी रूम सिंगल सर्व सोयीनियुक्त छोट्या कुटुंबासाठी पहिला मजला, गुरूकृपा रेडिमेडस, नदी रोड, इचलकरंजी. भोसले–९५१८५४३६९५

**सर्व सोयीनियुक्त** १ आरके खोल्या शाकाहारी छोट्या परिवाराकरिता भाड्याने देणे आहे. आयोध्या कॉलनी, कुरूंदवाडे मळा, पंचवटी मागे, इचलकरंजी. ९४२११०७८७२, ८१४९७३१९८१

**सर्व सोयीनियुक्त** २ बीएचके गहाणवट देणे आहे. सांगली रोड, इचलकरंजी. फोन–८००७२६२१९६

**भाड्याने देणे.** आरसीसी २ बीएचके घर भाड्याने देणे आहे. सर्व सुविधांसह, पत्ता–शिवाजीनगर, कोरोची. संपर्क–७६२०८०४७९३

**मध्यवर्ती ठिकाणी** २ बीएचके फ्लॅट भाडयाने देणे आहे. विद्यार्थी/परिवारासाठी संपर्क–९०२८७०५८५९, इचलकरंजी.

**भाड्याने देणे.** १ ला मजला, २ रूम स्वतंत्र संडास बाथरूम, पाणी, छोट्या कुटुंबासाठी भाड्याने देणे. थोरात चौक, भाग्यश्री कॉलनी, श्रीकांत बडे.–९९२३००९६५६

**भाड्याने देणे.** सर्व सोयीनियुक्त १ बीएचके १ ला मजला शुक्रतारा अपार्टमेंट, सांगली रोड, इचलकरंजी. फोन–८१४९९६५८०२, ७२७६२६०९११

**आरसीसी दोन रूम** भाड्याने देणे आहे. सर्व सोयीनियुक्त गोविंदराव हायस्कूलमागे, धनगर गल्ली. फोन–८७८८३९३२१२

**२ बीएचके** भाड्याने देणे आहे. मराठा चौक, जवाहरनगर, इचलकरंजी. फोन–९८८१८१३८८१

**सर्व सोयीनियुक्त** मोक्याच्या ठिकाणी नदीवेस नाकारोड, रेणुका मंदिरशेजारी ३८०० स्क्वे. फूट जागेत १८०० स्क्वे. फूट बांधकामसहित हॉटेलसाठी (शाकाहारी) किंवा अन्य व्यवसायासाठी भाड्याने देणे आहे. संपर्क–८६६८६२०९२३, ९३५६१९२०७५

**१३००० स्क्वे. फूट** कुंपन असलेली मोकळी जागा कोरोची येथे भाड्याने देणे आहे. संपर्क–७२१८३५५८८५, ७७६९०४११५०

**सर्व सोयीनियुक्त घर** भाड्याने देणे आहे. २ खोल्या. संपर्क– कलावंत गल्ली, टाकवडे वेस. ९३७२४९१५२७, ९३७००२४१२०

**३०X३०=९०० स्क्वे. फूट** व ३०X२०=६०० स्क्वे. फूट हॉल एकत्रित/वेगवेगळी भाड्याने देणे. पेढी/ऑफिससाठी उपयुक्त. संपर्क–९८९०६८८९३४, आयजीएम हॉस्पिटलजवळ, इचलकरंजी.

**स्टेशन रोड,** डेक्कन मिलजवळ, दत्त मंदिरसमोर गाळा भाड्याने देणे आहे. ८१४९९१३०८८

**साखरपे हॉस्पिटलजवळ,** सातपुते गल्लीमध्ये १०'X२०' चा गाळा भाड्याने देणे आहे. संपर्क–८१४९९१३०८८

**साखरपे हॉस्पिटलजवळ** २००/४०० स्क्वे. फूट चे/चा प्रशस्त गाळा पोटमाळ्यासह भाड्याने उपलब्ध आहे. शोरूम, सहकारी बँक/पतसंस्था, ऑफिस इ. साठी आदर्श व मध्यवर्ती ठिकाण उत्तम लोकेशन, पाण्याची सुविधा उपलब्ध. संपर्क–८१४९९१३०८८

**३०० स्क्वे. फूटाचा गाळा** भाड्याने देणे आहे ऑफिससाठी. संपर्क–९८५०९२८१५७

**फ्लॅट भाड्याने देणे.** ३४X५० कोल्हापूर रोड, वैशाली गार्डनमागे, मारूती मंदिरशेजारी, फोन–९४२१२०७३३६, ९४२०७७६३२१

**गाळा भाड्याने देणे.** साखरपे हॉस्पिटलसमोर, डंबाळ गल्लीमध्ये, गजानन मंगल कार्यालयनजीक, १८० फूटाचा वॉशरूमसहित संपर्क–९४२२४२४५९५

**गाळा भाड्याने देणे.** जनता बँकेपासून जवळ तारा हॉटेल व फळ मार्केटमध्ये ५०० फूटाचा बेसमेंट गाळा वॉशरूमसहित संपर्क–९४२२४२४५९५

**५६ इंची ५६ माग** असलेले सर्वसोयीनियुक्त शेड कबनूर, दत्तनगर, गल्ली नं. १२ येथे भाड्याने देणे आहे. संपर्क–९५९५२४४२४०, ९१३०००२७६६

**भाड्याने देणे–** १ बीएचके आरसीसी सर्व सोयीनियुक्त बोअरसह, ग्राऊंड फ्लोअर, गुरू कन्ननगर, इचलकरंजी. फोन–९४२०७७६२६८

**सर्व सोयीनियुक्त** १ बीएचके घर भाड्याने देणे आहे. २४ तास पाणी, शिरदवाड–लाट रोड, दत्त मंदिरजवळ, लाट हद्द. संपर्क–९९२१२४३३१८

**भाड्याने देणे.** १ बीएचके पहिला मजला, लोकल मार्टसमोर, जवाहरनगर, इचलकरंजी व खुली जागा १२ हजार चौ. फूट, ६ हजार चौ. फूट संपर्क–९८९००३३५००, ८२३७७७९०३४

**२ बीएचके** सर्व सोयीनियुक्त फ्लॅट भाड्याने देणे. (शाकाहारी) रूगे मळा, विवेकानंद कॉलनी, इचलकरंजी. संपर्क–९४२२४१२३१०

**सर्वसोयीनियुक्त** १ बीएचके आरसीसी फ्लॅट भाड्याने देणे आहे. संपर्क– तिरंगा कॉलनी, कबनूर. ९९२१८०७२६८

**२ बीएचके** व ३ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे आहे. संपर्क– सांगली नाक्याजवळ. ९८८१७७५२४२

**राजवाडा चौक ते** सांगली नाका परिसरमध्ये ऑफिससाठी १ बीएचके किंवा ३०० स्क्वे. फूट विथ वॉशरूम हॉल पहिला मजल्यावर भाड्याने हवा आहे. संपर्क–९४२२५८२९६७

**भाड्याने देणे.** लायकर टॉकीजशेजारी, पुजारी मळा–१ हॉल, १ किचन पहिल्या मजल्यावर सर्वसोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. संपर्क–९३७३४२६६७७

**२ बीएचके –** १३०० स्क्वे. फूट पहिला मजला (फर्स्ट फ्लोअर) स्वतंत्र बंगला सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. महासत्ता चौकजवळ, इचलकरंजी. ९८२२६१००७३, ९६५७९५२५९९

**१ रूम, १ बीएचके** फ्लॅट भाड्याने देणे आहे. शुद्ध शाकाहारी लोकांसाठी तारा हॉटेलजवळ, इचलकरंजी. फोन–७९७२०४६७१५

**दुकानगाळा भाड्याने देणे.** ३७५ स्क्वे. फूट आरसीसी रूणवाल टॉवर, इचलकरंजी. फोन–७९७२०४६७१५

**आरसीसी शेड** २००० स्क्वे. फूट व २ बीएचके तसेच स्वतंत्र २००० स्क्वे. फूटाचे शेड भाड्याने देणे. (शाकाहारींसाठी) जुने बसस्टॅन्ड चौक, इचलकरंजी. फोन–९६६५०३८६७७

**सर्व सोयीनियुक्त** १ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे आहे. थोरात चौक, शांतीनगर चर्च व भंडारे हॉस्पिटलमागे. संपर्क–७३५००००००३०

**भाड्याने देणे.** आरसीसी १२X३० चौ. फूटचा गाळा गावभाग येथे गारमेंट, गोडावून, वर्कशॉप, दवाखाना, विद्यार्थी रहाणेसाठी उपयुक्त. मो. ९५६१७७९६२९, ९४२११४३९१२

**शहापूर चौकात** २ रूम कमर्शियलसाठी भाड्याने देणे आहे. तसेच बालाजीनगर येथे फॅमिलीसाठी रूम भाड्याने मिळेल. संपर्क–९९७५५७२७२१

**जनता बँकेपासून** जवळच नारायण पेठमध्ये सर्व सोयीनियुक्त २ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे. संपर्क–९७६४७११३५०

**उर्वरीत पान ७ वर**

### वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी–विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे–घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहिरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

(पान ६ वरून)


*** भाड्याने देणे-घेणे ***

**सर्व सोयीनियुक्त** आरसीसी २ रूम भाड्याने देणे. वेद भवनजवळ, इचलकरंजी. फोन-९४२१२०४०११

**२ बीएचके फ्लॅट** भाड्याने देणे आहे. पत्ता- कुडचे मळा, सोनपाऊली मारूती मंदिरजवळ, इचलकरंजी. फोन-९९२३४५०३९२, ९८९०१५०४९५

**बंगलो भाड्याने देणे.** सर्वसोयीनियुक्त सोनल फौंड्री, मणेरे हायस्कूलजवळ, इचलकरंजी. फोन-९८२२९५१८००

**भाड्याने देणे.** १ बीएचके चिन्मयी संकूल डीकेटीई नारायण मळा शाळेजवळ, इचलकरंजी. संपर्क-७८७५५६५३००, ९८२२५३५३००

**१ बीएचके खोली** भाड्याने देणे आहे. जनता चौक, पल्लवी हॉटेल रोड, साखरपे हॉस्पिटलमागे, इचलकरंजी. फोन-९५६११९६५२९

**इचलकरंजी जवळपास** शहरालगत, अथवा खंजिरे इंडस्ट्रियल इस्टेटमध्ये ५००० ते १०००० स्क्वे. फूटाचे बंदिस्त रोडटच गोडावून/शेड भाड्याने पाहिजे. मो. ९४२२०४४५८९, ९४२३०४२३८२

**यड्राव सुतगिरणीसमोर** मेन रोडटच ११२५ स्क्वे. फूट पत्र्याचे २ वेगवेगळे गाळे भाड्याने देणे. शोरूम, दुकान, गोडाऊनसाठी. संपर्क-९८९०२७०२०५

**गाळा भाड्याने देणे.** सांगली रोड, बजाज शोरूमसमोर, २०० स्क्वे. फूट आरसीसी २०० स्क्वे. फूट रिकामी जागा. संपर्क-७३८५७६९५६०

**५००/१००० स्क्वे. फूट ऑफिस** किंवा शोरूमसाठी गाळा भाड्याने देणे. मेन रोडटच, पार्किंग उपलब्ध. संपर्क-७२७६१२३७११

**खोल्या भाड्याने देणे.** तारदाळ-संगमनगर, पार्वती इस्टेटसमोर, इचलकरंजी. ९१७२७१७१११

**जनता बँकेपासून जवळच** आरसीसी २०० स्क्वे. फूट दुकानगाळा, ऑफिस किंवा व्यवसायासाठी भाड्याने देणे. सर्व सोयीनियुक्त. आर.पी. रोड, पद्मा लाँड्री, बिरदेव बँकेजवळ, इचलकरंजी. ७२४९४९०९६२

*** बांधकाम ***

**Dr. Fixti वॉटरप्रुफिंग-** पावसाळा सुरू होण्यापूर्वी स्लॅब लिकेजची कामे करून घ्या. तोडफोड न करता टेरेस वॉटरप्रुफिंगची कामे मटेरियल, मजुरीसह खात्रीने करून देऊ. संपर्क-७९७२९३४८२१

*** शैक्षणिक ***

**MS STAR TRADE EDUCATION** फॉरेस्ट आणि क्रिप्टो सर्व काही Free मर्यादित जागा. रोज दुपारी १२ वाजता. Live Trading Guidance प्रॉफिटसह Basic to Advance 12 दिवसाचा कोर्स Indicator Training मंगळवार व शनिवार रात्री ८ वाजता. व्हॉटसअप-९२७०२१५२१२

*** व्यवसाय विषयक ***

**शेअर मार्केट बेसिक** ते ॲडव्हॉन्स माफक फीमध्ये, तज्ञ प्रशिक्षकाकडून, परफेक्ट शिका. प्रॉफिट फर्स्ट, कल्पना टॉकीजसमोर. ९६६५४०८८२८, ७७६८९५००२१

**पार्टटाईम/फूलटाईम-** व्यवसायासाठी सुवर्णसंधी! विद्यार्थी, महिला नोकरदार आणि उद्योजकांसाठी उत्तम संधी. ८६२३९५५३२७, ८३७८०८७२९५.

*** कर्ज विषयक ***

**कमी पगारातही-** विकत घ्या. तुमच्या स्वप्नातले घर कमीत कमी व्याज दरामध्ये. संपर्क-९१४५७५३८१०

**ग्रामीण भागासाठी** फक्त असेसमेंट उतारा व घरफाळा पावतीवर होमलोन किंवा तारण लोन करून मिळेल. संपर्क-९१४५७५३८१०

*** यात्रासहल ***

**१ जुन ते ९ जुन २०२६-** खाटूश्याम राजस्थान, जयपूर सिटी- सालासर बालाजी मंदिर, हवामहल व अशीच नयनरम्य ठिकाणे व श्रीकृष्ण कथेचा, राहणे व जेवणासहीत फक्त १३ हजार रू. मध्ये. संपर्क-९२८४८६६०६३

*** विवाहविषयक ***

**मराठा वधुवर मेळावा-** मराठा वधुवर मालक मेळावा रविवार १२ एप्रिल सकाळी १० ते २ स्थळ. मराठा मंडळ सांस्कृतिक भवन, तांबे माळ, इचलकरंजी. संपर्क-९८५०००९०७१

**लिंगायत वधुवर मेळावा-** रविवार १२ एप्रिल गजानन मंगल कार्यालय, साखरपे हॉस्पिटलजवळ, डंबाळ गल्ली, इचलकरंजी-बेनाडीकर. ९८२३९९३४९०


## माहूरगडाचे महंत मधुसूदन भारती महाराज यांचे निधन

**नांदेड,ता.४ -**

**तीर्थक्षेत्र माहूरगडावरच्या दत्त मंदिराचे महंत मधुसूदन भारती महाराज (वय ९९) यांना आज देवाज्ञा झाली. ते गेल्या काही दिवसांपासून आजारी होते.उद्या रविवारी दुपारी तीन वाजता माहूर गडावरच त्यांच्या पार्थिवावर अंत्यविधी करण्यात येणार आहेत. महाराजांच्या निधनामुळे माहूर गडावर शोककळा पसरली आहे.**

सन १९७८ पासून ते आजतागायत देवस्थानचे महंत म्हणून गादीवर विराजमान होते.मधुसूदन महाराजांच्या निधनाचे वृत्त समजताच माहूरगड परिसरातील सर्वच व्यापाऱ्यांनी दुकाने आणि व्यवसाय बंद ठेऊन दु:ख व्यक्त केले. तर, परिसरातील नागरिक आणि भाविकांनीही गडाकडे धाव घेतली. मोठ्या संख्येने महंत गडाचे भाविक आणि समाजातील प्रतिष्ठित मंडळी देखील महाराजांच्या अंत्यदर्शनसाठी आल्याचे दिसून आले.

# चिक्कोडी-सदलगा मतदारसंघातील मंदिर जिर्णोध्दारासाठी २ कोटींचा निधी मंजूर

## हुक्केरी पिता-पुत्रांचे प्रयत्न : एकसंबा येथे आदेशपत्रांचे वितरण

**चिक्कोडी,ता.४(वार्ताहर)-**

**चिक्कोडी-सदलगा मतदारसंघातील विविध गावांमध्ये धार्मिक श्रद्धास्थाने व मंदिरांच्या जिर्णोध्दारासाठी व नवीन इमारतींच्या बांधकामासाठी २ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या कामांचे आदेशपत्र नुकतेच संबंधित मंदिर समित्यांचे सदस्य आणि ठेकेदारांना वितरित करण्यात आले.**

**हुक्केरी पिता-पुत्रांचा पाठपुरावा**

मतदारसंघातील अनेक मंदिर कमिट्यांनी जिणाध्दारासाठी निधीची मागणी आमदार गणेश हुक्केरी व विधान परिषद सदस्य व राज्य सरकारचे दिल्ली प्रतिनिधी प्रकाश हुक्केरी यांच्याकडे केली होती. या मागणीची दखल घेऊन सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात



**विविध मंदिर कमिट्यांना मंजुरी पत्राचे वितरण करताना आम. प्रकाश हुक्केरी व इतर.**

मुख्यमंत्री पायाभूत सुविधा विकास योजनेअंतर्गत एकूण ६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. त्यापैकी काही कामे प्रगतीपथावर असून, उर्वरित १७ कामांसाठी आज २ कोटींचे आदेश सुपूर्द करण्यात आले. कामकाज तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश निधीचे वितरण करताना प्रकाश व गणेश हुक्केरी यांनी संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांना दिले. ही कामे दर्जेदार आणि विहित मुदतीत पूर्ण करावीत, जेणेकरून भाविकांना सोयी-सुविधा उपलब्ध होतील.

**निधी मंजूर झालेली मंदिरे व कामांचा तपशील (लाखांमध्ये).**

जोडकुरळी श्री बीरलिंगेश्वर मंदिर इमारत काम पूर्ण करणे १५, जोडकुरळी श्री अरेविडी बीरेश्वर मंदिर खुले मंडप निर्माण १०, सिध्दापूरवाडी श्री हनुमान मंदिर इमारत काम पूर्ण करणे २०, येडूरवाडी (डोणी मळा) श्री लक्ष्मी मंदिर जिर्णोद्धार व विकासासाठी ७, काडापूर श्री अमोघ सिद्धेश्वर मंदिर समुदाय भवन पूर्ण करणे १०, काडापूर श्री केदारेश्वर मंदिर इमारत काम पूर्ण करणे ७, येडूरटेक श्री सप्त मातृका मंदिर समुदाय भवन पूर्ण करणे ७, हिरेकोडी श्री हनुमान मंदिर इमारत जिर्णोद्धार २५, वाळकी श्री जगज्योती बसवेश्वर समुदाय भवन पूर्ण करणे १०, वाळकी श्री सिद्धिविनायक (गणेश) मंदिर इमारत पूर्ण करणे १०, पांगेरी (अ) श्री हनुमान मंदिर इमारत काम पूर्ण करणे ७, चिखलव्हाळ मराठा समाज समुदाय भवन (पहिला मजला) १०, नणदी श्री यल्लम्मा मंदिर जिर्णोद्धार करणे ७, चिक्कोडी शहर माळी समाज परिसरात सार्वजनिक सुविधा २५, चिक्कोडी शहर श्रीकृष्ण समुदाय भवन १०, चिकोडी शहर श्री मरगुबाई मंदिर इमारत १०, चिक्कोडी शहर घाळे गल्ली, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर इमारत १० असा एकूण २ कोटींचा निधी मंजूर झाला आहे.याप्रसंगी विविध मंदिर व्यवस्थापन समित्यांचे सदस्य, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, ठेकेदार आणि काँग्रेसचे स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

# रस्ते विकासातूनच खऱ्या अर्थाने शेतीच्या विकासाला गती

## एम.पी.पाटील ; जत्राट येथे ५० लाखातून रस्ता कामाचा शुभारंभ

**निपाणी,ता.४(प्रतिनिधी)-**

**आमदार शशिकला जोल्ले व जिल्हा बँकेचे चेअरमन अण्णासाहेब जोल्ले यांच्या नेतृत्वाखाली निपाणी मतदार संघाला सर्वांगीण विकासाची दिशा प्राप्त झाली आहे.मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करत असताना नेतृत्वाने नेहमीच शेती विकासाला पूरक असा विकास केला आहे.**

शेती विकासासाठी पाणी व्यवस्थापन, वीजपुरवठा जसा गरजेचा असतो, त्यापेक्षाही अधिक रस्ते विकास अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.बारमाही शेती उत्पादन घेत असताना शेती मशागतीची अवजारे नेण्याबरोबरच रासायनिक खते पोहोचवण्यासाठी रस्त्यांची गरज असते.त्याचबरोबर उत्पादित माल बाजारपेठेपर्यंत



**जत्राट येथे रस्ता कामाच्या शुभारंभप्रसंगी हालशुगरचे चेअरमन एम.पी.पाटील, प्रकाश शिंदे, रमेश भिवसे व इतर**

पोहोचवण्यासाठी रस्ता अत्यंत महत्त्वाचा असतो. म्हणूनच रस्ते विकासातूनच खऱ्या अर्थाने शेतीच्या विकासाला गती प्राप्त होते,असे प्रतिपादन हालशुगरचे चेअरमन एम.पी.पाटील यांनी केले.जत्राट येथे लक्ष्मी मंदिर ते वेदगंगा नदी पर्यंतच्या १.२ किलोमीटर रस्ता कामासाठी ५० लाखाचा निधी मंजूर करण्यात आला आहे.जोल्ले दाम्पत्याच्या नेतृत्वाखाली मंजूर करण्यात आलेल्या या रस्ता कामाचा शुभारंभ शनिवारी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.याप्रसंगी रस्ता कामाचा शुभारंभानंतर ते बोलत होते. राजू कल्लोळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. माजी जि. पं. सिद्धू नराटे म्हणाले, हा रस्ता जत्राटसह श्रीपेवाडी, नांगनूर , पडलीहाळ गावाच्या शेतकऱ्यांसाठी अत्यंत लाभदायक ठरणार आहे.यावेळी हालशुगरचे संचालक अविनाश पाटील, प्रकाश शिंदे, भरत नसलापुरे, रावसाहेब फराळे, सुहास गुग्गे,श्रीकांत बन्ने, पिकेपीएस चेअरमन रमेश भिवसे, दिनकर शिंपूकडे, प्रभाकर शिंपूकडे, दशरथ कुंभार, विजय जबडे, सुधाकर थोरात, पांडुरंग शिंपुकडे, रवींद्र पोवार, सचिन कुंभार, दीपक पाटील, प्रशांत पाटील, अरुण पाटील, सागर चेंडके, प्रभाकर पाटील, मधुकर जासूद, विशाल जबडे, रमेश कांबळे,सागर तोडकर, अरुण जबडे, सचिन खोकाटे, ज्योती जबडे यांच्यासह शेतकरी बांधव उपस्थित होते.

# कराडमध्ये कचरा व्यवस्थापनाला वेग

## 'स्वच्छ सर्वेक्षण' व 'माझी वसुंधरा' अंतर्गत पालिकेची जनजागृती

**कराड,ता.४(प्रतिनिधी)-**

**शहर स्वच्छतेच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकत कराड नगरपालिकेने कचरा वर्गीकरणाबाबत व्यापक जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. 'स्वच्छ सर्वेक्षण' आणि 'माझी वसुंधरा' अभियानाच्या पार्श्वभूमीवर पालिकेच्या पथकाने शहरातील विविध भागांत जाऊन नागरिकांना कचरा योग्य पद्धतीने वेगळा करण्याचे महत्त्व समजावून सांगितले.**

या मोहिमेद्वारे नागरिकांना घरगुती कचरा सहा प्रकारांत वर्गीकृत करूनच घंटागाडीत देण्याचे आवाहन करण्यात येत आहे. ओला, सुका, कागदी, प्लास्टिक, ई-कचरा आणि घातक कचरा असे स्पष्ट विभाजन करण्यावर भर देण्यात आला आहे. प्रत्येक प्रकारचा कचरा वेगळा केल्यास त्यावर प्रक्रिया करणे सुलभ होऊन पर्यावरणीय हानी टाळता येते, असेही सफाई कर्मचाऱ्यांनी नागरिकांना पटवून दिले.दरम्यान, शहरातील कचरा संकलन व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी पालिकेकडे २१६ आरोग्य कर्मचारी, १६० कंत्राटी सफाई कर्मचारी कार्यरत आहेत. याशिवाय १८ घंटागाड्या, १ रोड स्वीपिंग मशीन, ४ ट्रॅक्टर आणि ३ छोटे ट्रॅक्टर यांची मदत घेतली जात आहे. या यंत्रणेमुळे कचरा संकलन आणि स्वच्छता मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याचे पालिकेने सांगितले.

# जवान संतोष जाधव यांचेवर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**कराड,ता.४(प्रतिनिधी)-**

**येरवळे (ता. कराड) येथील भारतीय सैन्यात कार्यरत असलेले वीर जवान संतोष जाधव (वय ३८) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. गावी सुट्टीसाठी आले असतानाच ही दुर्दैवी घटना घडली. जाधव यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.**

संतोष जाधव हे आसाममधील जोरहाट येथील ७०२ इंजिनियर प्लांट मिलिटरी स्टेशन येथे कार्यरत होते. २३ मार्च रोजी ते सुट्टीसाठी आपल्या गावी आले होते. मात्र



गुरुवारी रात्री अचानक त्यांना तीव्र हृदयविकाराचा झटका आला. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले.

शुक्रवारी सकाळी त्यांचे पार्थिव येरवळे येथे आणण्यात आले. यावेळी संपूर्ण गाव शोकमग्न झाले होते.

'वीर जवान अमर रहे'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. सजवलेल्या ट्रॅक्टरमधून काढण्यात आलेल्या अंत्ययात्रेत ग्रामस्थांनी सहभाग घेतला.त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा व मुलगी असा परिवार आहे.

अंत्यसंस्कारावेळी कराड तहसीलदार कल्पना ढवळे, महेश पाटील, पंचायत समिती सभापती नंदाताई यादव, प्रशांत कदम, सैन्य अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## बाब अल-मंदेबमधूनही वाहतूक रोखणार

**तेहरान,ता.४-**

**इराण आता आपल्या सामरिक व्यूहनितीचा विस्तार होर्मुझच्या सामुद्रधुनीतून वाढवून बाब अल-मंदेबपर्यंत करु शकतो, असे स्पष्ट संकेत इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बागेर गलिबाफ यांनी दिले.**

गेल्या महिन्याभरापासून इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी वाहतूक रोखून धरली आहे. त्यामुळे जागतिक सागरी व्यापार अडचणीत आला आहे.

खनिज तेलाचे दर गगनाला भिडल्याने अनेक देशांच्या अर्थव्यवस्था अडचणीत आल्या आहेत. होर्मुझमधून २० टक्के तेल वाहतूक चालते. तर बाब अल-मंदेबमधून १२ टक्के तेल वाहतूक होते.

# शिराळा तालुक्यात 'शिवम् शौर्य : सुरक्षा अभियान'

**शिराळा,ता.४ (प्रतिनिधी)-**

**शिराळा तालुक्यात वाढत्या बिबट्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर मानसिंगभाऊ नाईक लोककल्याण अभियान व वन विभाग शिराळा यांच्या संयुक्त विद्यमाने 'शिवम् शौर्य : सुरक्षा अभियान' राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा उद्देश विशेषतः शाळकरी मुलांमध्ये स्वसंरक्षणाची जाणीव निर्माण करणे हा आहे.**

या अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली वन्यप्राण्यांच्या हल्ल्यावेळी काय करावे, स्वतःचे संरक्षण कसे करावे याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार आहे.

तसेच चित्रफिती व प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आवश्यक माहिती दिली जाणार आहे, असे आवाहन जिल्हा परिषद सदस्य विराज नाईक यांनी दिली आहे.

उपवळे येथील शिवम् पाटील यांच्या धाडसी घटनेतून प्रेरणा घेत या अभियानाला नाव देण्यात आले आहे. हा उपक्रम विराज नाईक यांच्या संकल्पनेतून साकारला असून, नागरिकांमध्ये सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

हा कार्यक्रम मंगळवारी ७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता मांगले येथील राजारामबापू पाटील माध्यमिक विद्यालयात आयोजित करण्यात आला आहे.

या अभियानामुळे विद्यार्थ्यांसह नागरिकांमध्ये वन्यप्राण्यांबाबत जागरूकता वाढून सुरक्षिततेची नवी दिशा मिळेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# शाहूवाडीत राज्यस्तरीय 'शेती वाचवा, शेतकरी वाचवा' परिषद १२ एप्रिलला

**सरूड, ता.४ (प्रतिनिधी)-**

**शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करून दलाल व भांडवलदारांना पोसण्याचेच सरकारचे धोरण असल्याचा आरोप अतुल दिघे यांनी पत्रकार परिषदेत केला. श्रमिक शेतकरी संघटनेच्या वतीने दक्षिण महाराष्ट्र व कोकण विभागातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर १२ एप्रिल रोजी शाहूवाडी येथील संकल्प सिद्धी मंगल कार्यालयात राज्यस्तरीय 'शेती वाचवा, शेतकरी वाचवा' परिषद आयोजित करण्यात आली असून ती यशस्वी करण्याचे आवाहन त्यांनी केले.**

यावेळी भारत पाटील यांनीही शासनाच्या धोरणांवर टीका करत शेतकऱ्यांना एकत्र येण्याचे आवाहन केले.


दिघे म्हणाले की, शेतकऱ्यांचे मृत्यू आणि सरकारचे धोरण हीच सध्याची स्थिती झाली आहे. जंगली प्राण्यांपासून संरक्षणाचा अभाव, जंगलतोड, केमिकल प्रकल्प, सौर ऊर्जा प्रकल्प, गॅस प्लांट, महामार्ग आदींमुळे शेतीवर मोठा परिणाम होत आहे.



या परिषदेला राजाराम सिंग, माजी खा.राजू शेट्टी, पुरुषोत्तम शर्मा, राजेंद्र बावके, उद्धव शिंदे, किशोर ढमाले तसेच एस. सी. जाधव उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आली. यावेळी भारत पाटील यांनी सांगितले की, केमिकल्स प्रकल्प, अनावश्यक रस्ते व सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी शेतजमिनी ताब्यात घेतल्या जात आहेत.

पत्रकार परिषदेला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष सुरेश माऊटकर, भैया थोरात, राजाराम मगदूम यांच्यासहे शेतकरी उपस्थित होते.

## अभयकुमार चौगुले यांचे निधन



**कोगनोळी,ता.४( प्रतिनिधी)**

करनूर (ता.कागल) येथील रहिवाशी व शारदा उद्योग समूहाचे अभयकुमार आण्णासो चौगुले (वय४८) यांचे शनिवारी अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, भाऊ, भावजय असा परिवार आहे.


**जाहीर नोटीस**

मौजे कोरोची येथील गट नं. ७५६ मधील प्लॉट नं. १६ पैकी १४९४ चौ. फुट ची मिळकत. यासी चतुः सिमा - पुर्वेस - रस्ता, पश्चिमेस - गीता पाटील यांची मिळकत, दक्षिणेस - रवींद्र पाटील यांची मिळकत, उत्तरेस- रस्ता. सदर मिळकत ही मूळची सौ. शोभा अर्जुन उमराणी रा. कोरोची यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांच्याशी करारपत्र केलेला आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही बोजा, हक्क, दावा, पोटगी, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही ता ०४/०४/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**
रा.आसरा नगर,
बसस्टॉप जवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

**जाहीर नोटीस**

मौजे तारदाळ येथील गट नंबर ७४८ पैकी प्लॉट नं ५६ व ५७ चे एकत्रीत क्षेत्र १६७.२८ चौ.मी यासी चतु:सिमा-पुर्वेस - प्लॉट नं. ५२ व ५३, पश्चिमेस - २० फुट रस्ता, दक्षिणेस - २० फुट रस्ता, उत्तरेस - प्लॉट नं. ५८, सदरची मिळकत ही श्री. संजय ज्ञानदेव शेळके रा. इचलकरंजी यांच्या मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे संचकारपत्र आमचे अशिलांकडून संचकार रक्कम स्वीकारून करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता. ०४/०४/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**
रा.आसरा नगर,
बसस्टॉप जवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

**जाहीर नोटीस**

मौजे खोतवाडी येथील गट नं. ७५ पैकी प्लॉट नं. ६ चे क्षेत्र १७३.२५ चौ.मीटर ची मिळकत, यासी चतु:सिमा पुर्वेस- लाटकर (कांबळे) वगैरे यांची मिळकत, पश्चिमेस - २० फुट रस्ता, दक्षिणेस- प्लॉट नं. ५, उत्तरेस - प्लॉट नं. ७, सदरची मिळकत ही श्री. राकेश कलगोंडा पाटील रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना संचकारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही

ता ०३/०४/२०२६

**ॲड.आनंद प्रकाश पटवा**
रा.आसरा नगर,
बसस्टॉप जवळ
सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना कळविणे करिता नोटीस प्रसिध्द करणेत येते की-

मिळकतीचे वर्णन - जिल्हा व तु. कोल्हापूर, तहसिल शिरोळ, मे. दुय्यम निबंधकसो, शिरोळ श्रेणी - १ यांचे अधिकार कक्षेतील मौजे यड्राव गट नं. ३८५ क्षेत्र हे. ०.६०.३७ आर, यापैकी प्लॉट नं. २९क्षेत्र १२२.६९ चौ.मी.१३२०.१४ चौ.फुट ची खुली प्लॉट जागा मिळकत, यासी चतु:सीमा- पूर्वेस - २० फूट रुंदीचा रस्ता, पश्चिमेस - बाबासो कोळी, दक्षिणेस - प्लॉट नं. ३०, उत्तरेस - प्लॉट नं. २८ ची मिळकत येणेप्रमाणे चतु:सीमेतील प्लॉट जागा मिळकत आतील, तद्ंगभूत वस्तूसह सर्व इजमेंन्ट चे हक्कासह यांस मिळक़त असे संबोधले आहे.

येणेप्रमाणे वर नमूद मिळकत राजश्री अरविंद कुरडे, सचिन शिवगोंडा पाटील, सुनिता भरत आंबी, वैशाली भिमगोंडा पाटील, आशिष महावीर भरमगोंडा, अरविंद भूपाल कुरडे, बापूसो भूपाल आंबी, भिमगोंडा पासगोंडा पाटील, रा. यड्राव यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची आहे. त्यांनी सदर मिळकत आमचे आशिलास खरेदी देणेबाबत संचकारा दाखल रक्कम स्विकारली आहे. सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा मिळकत मालकांनी आमचे आशिलांना दिलेला आहे. तथापि सदर मिळकतीवर कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, अधिकार,वहिवाट ,बोजा, लिज, पोटगी अथवा अन्य काही लागलिगाड असलेस ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसात खाली नमूद पत्यावर भेटून आपल्या हक्काचा कागद पत्रासह खुलासा करावा. मुदतीत कोणाची कसलीही तक्रार न आलेस आमचे आशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार आमचे आशिलांवर अगर आमचे आशिलांचे खरेदी केले मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. म्हणून प्रसिध्द केली जाहीर नोटीस

ता. ०४/०४/२०२६.

**ॲड. सौ. मृणाल गिरीष माने**
६/६००, मेन रोड, मोठे तळेजवळ, इचलकरंजी.
मो. ९८९०३०४१४२.

## थोडक्यात

### समता परिषदेच्या इचलकरंजी शहराध्यक्षपदी जयसिंग तनंगे

इचलकरंजी,ता.४–

**अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या इचलकरंजी शहर अध्यक्षपदी जयसिंग तनंगे यांची निवड करण्यात आली.**



मुंबई येथे या परिषदेची आढावा बैठक संपन्न झाली.या बैठकीस परिषदेचे संस्थापक तथा मंत्री छगन भुजबळ तसेच कार्याध्यक्ष समीर भुजबळ, प्रदेश चिटणीस सुनील मेटे हे उपस्थित होते.या बैठकीत जिल्हाध्यक्ष पदी बाबासाहेब बागडी, कोल्हापूर शहर अध्यक्षपदी हुसेन मुल्ला, महिला शहराध्यक्षपदी स्वाती काळे, जिल्हा कार्याध्यक्षपदी राणी गायकवाड यांची ही निवड करण्यात आली. श्री. तनंगे यांच्या निवडीमुळे जुना चंदुर व गावभाग परिसर, विणकर संघटना तसेच सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.



मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार स्विकारताना डॉ. सुचिता भोसले.

### डॉ.सुचिता भोसले यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

यवलूज,ता.४(प्रतिनिधी)–

**कोल्हापूर हॉटेल रॉयल पॅव्हेलियन येथील कार्यक्रमात 'यशवंत सन्मान सोहळा २०२६' अंतर्गत राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.या सोहळ्यात विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.**

यावेळी डॉ. सुचिता भोसले यांना त्यांनी केलेल्या शिक्षण क्षेत्रातील विशेष नाविण्यपूर्ण कार्यासाठी मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार पंचायत समिती सदस्या तेजस्विनी भोरे (कागल) व प्रा. डॉ. स्मिता गिरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाला दादासाहेब लाड यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. उपस्थित मान्यवरांनी डॉ. भोसले यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करत त्यांच्या कार्याची प्रशंसा केली.आयोजकांच्या वतीने सर्व मान्यवरांचे आभार मानण्यात आले.



पुलाची शिरोलीत दिव्यांग लाभार्थींना धनादेश वाटप प्रसंगी सरपंच पद्मजा करपे उपसरपंच विजय जाधव,सौ. गिता कोळी व मान्यवर.

### पुलाची शिरोलीत दिव्यांग लाभार्थ्यांना धनादेश वाटप

हेरले,ता.४(प्रतिनिधी)–

**शिरोली येथील छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृह येथे दिव्यांग निधीचे वाटप लोकनियुक्त सरपंच सौ. पद्मजा करपे पंचायत समिती सदस्या सौ.कमल कौंदाडे व उपसरपंच विजय जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.**

यावेळी सन २०२५/२६ या आर्थिक वर्षात १८८ दिव्यांग लाभार्थींना ४ लाख ३१ हजार ६०० रुपये निधी त्यांच्या खातेवर जमा करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी सौ.गीता कोळी,माजी सरपंच अनिल शिरोळे, सुजाता पाटील मनिषा संकपाळ, अनिता शिंदे, नजिया देसाई, वसिफा पटेल, कोमल समुद्रे, योगेश खवरे, दिपक यादव, महादेव सुतार,बाळासाहेब पाटील,सागर कौंदाडे आदी उपस्तित होते.

### डॉ.शितल पाटील पुरस्काराने सन्मानित

बारवाड,ता.४(वार्ताहर)–

**कारदगा येथील सुपुत्र एआय तज्ञ डॉ.शितल महावीर पाटील यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल ''४० अंडर ४० एआय तज्ञ'' हा प्रतिष्ठित पुरस्कार बंगळुरू येथील मशीन लर्निंग डेव्हलपर शिखर परिषदेमध्ये प्रसिद्ध क्रिकेटपटू चेतेश्वर पुजारा यांच्या हस्ते प्रदान करून सन्मानित करण्यात आले.**

हा पुरस्कार भारतातील ४० वर्षांखालील सर्वोत्तम ४० तज्ञांना जे एआय क्षेत्रात नाविन्यपूर्ण आणि प्रभावी काम करणाऱ्या युवकांना दिला जातो.सध्या डॉ.शीतल पाटील(रॉबर्ट बॉश) या आंतरराष्ट्रीय कंपनीमध्ये एआय तज्ञ म्हणून कार्यरत आहेत.त्यांच्या संशोधन आणि औद्योगिक अनुभवाच्या आधारे एआय आणि डिजिटल ट्विन या क्षेत्रात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आह.त्याबद्दल शीतल पाटील यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# विशेष डिजिटल शेतीशाळांमध्ये सहभागी व्हावे

## कृषी अधिकारी जालिंदर पांगरे यांचे शेतकऱ्यांना आवाहन

कोल्हापूर,ता.४(प्रतिनिधी)–

**हवामानातील वाढती अनिश्चितता, पावसाचा खंड आणि नैसर्गिक आपत्तींमुळे पारंपारिक कोरडवाहू शेती संकटात सापडली असून उत्पादन खर्च वाढत आहे. यावर मात करण्यासाठी कृषी विभागांतर्गत नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामार्फत राज्याकरिता 'हवामान अनुकूल तंत्रज्ञान अभियान' सुरू केले आहे. हे अभियान शेतीचा उत्पादन खर्च कमी करणे आणि प्रतिकूल परिस्थितीतही शेतकऱ्यांच्या उत्पन्नाची हमी देणे या उद्देशाने राबविण्यात येत आहे.**

हे अभियान यशस्वी करण्यासाठी कृषी विभागाबरोबरच, कृषी विद्यापीठे,कृषी विज्ञान केंद्रे, उमेद, माविम, पशुसंवर्धन विभाग इ.



यंत्रणादेखील सहभागी होत आहेत. या अभियानाचा एक टप्पा म्हणजे हवामान अनुकूल तंत्रज्ञानावर आधारित विशेष डिजिटल शेती शाळांचे आयोजन.नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प आणि पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एप्रिल महिन्यात चार विशेष डिजिटल शेती शाळा आयोजित करण्यात येत आहेत. राज्यातील सर्व प्रकारच्या पिक पद्धतींना उपयुक्त असणाऱ्या तंत्रांची माहिती एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विद्यापीठे आणि कृषी विभागातील तज्ज्ञ आणि प्रगतशील शेतकऱ्यांमार्फत या डिजिटल शेती शाळांमध्ये ज्ञानाचे आदान प्रदान होणार आहे.

विशेष डिजिटल शेती शाळांचे वेळापत्रानुसार शेतीशाळा १,८,१५ व २२ एप्रिल २०२६ या चार सत्रात सायंकाळी ७.३० वाजता सुरु होणार असून सर्व शेतीशाळा नमुद तारखांना होणार असून या शेती शाळांचे लाईव्ह प्रसारण कृषी विभाग, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, पाणी फाउंडेशन आणि उमेदच्या चॅनेलवर केले जाणार आहे.

शेतकरी, महिला गट, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे सदस्य, कृषी मंडळे, बिजोत्पादक, फार्मर कप स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणारे निमंत्रक व शेतकरी गट,वनपट्टे धारक या सर्वांनी मोठ्या संख्येने डिजिटल शेती शाळांना जॉईन व्हावे, असे आवाहन कृषी विभाग आणि नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामार्फत करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी क्षेत्रीय स्तरावरील सहाय्यक कृषी अधिकारी, उप कृषि अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा,असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी जालिंदर पांगरे यांनी केले आहे.

### खेळाडू निवड चाचणीकरीता आज अंतिम मुदत

कोल्हापूर,ता.४(प्रतिनिधी)–

**मिशन लक्षवेध अंतर्गत जिल्हा प्रतिभा विकास केंद्राकरिता करीता कोल्हापूर जिल्ह्यातील कुस्ती, मैदानी, वेटलिफ्टींग, हॉकी व रायफल शुटिंग या खेळाच्या खेळाडूंनी आवश्यक कागपत्रासह अर्ज रविवार ता.५ एप्रिल पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कोल्हापूर येथे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी विद्या शिरस यांनी केले आहे.**

या निवडचाचणी करीता कुस्ती, मैदानी,वेटलिफ्टींग, हॉकी व रायफल शुटिंग या खेळाच्या खेळाडूंनी कागपत्राची पुर्तता mission lakshvedhdsokop @gmail.com या मेलवर किंवा प्रत्यक्षात करावेत.

# महाडिक हायस्कूलमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

हेरले,ता.४(प्रतिनिधी)–

**पुलाची शिरोली येथील समता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कै.रा.म. महाडिक हायस्कूल, नवजीवन विद्यानिकेतन,अंकुर विद्यालय या शाळांचा वार्षिक क्रीडा स्पर्धा आणि विविध गुणदर्शन पारितोषिक वितरण समारंभ पंचायत समिती सदस्या सौ.कमल कौंदाडे, उद्योजक अविनाश मुखरे, व जि.प. सदस्य सलीम महात यांच्या हस्ते आणि संस्थेचे अध्यक्ष प्रकाश कौंदाडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.**

सौ.कमल कौंदाडे यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या आयुष्यात



पुलाची शिरोलीत महाडिक हायस्कूलमध्ये पारितोषिक वितरण प्रसंगी सलीम महात,प्रकाश कौंदाडे,कमल कौंदाडे आदी.

दैदीप्यमान यश मिळवावे, असे आवाहन केले.

अविनाश मुखरे यांनी सर्व शाळा डिजिटल करून देण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांचा सत्कार प्रशासन प्रमुख एस .डी. लाड यांच्या हस्ते करण्यात आला तसेच कमल कौंदाडे यांचा सत्कार प्रियांका लाड, शाईन बागवान व प्राजक्ता ओऊळकर यांच्या हस्ते करण्यात आला.स्वागत प्राजक्ता ओऊळकर यांनी केले . शाहीन बागवान यांनी वार्षिक अहवाल सादर केला. प्रशासन प्रमुख एस.डी.लाड यांनीही विद्यार्थी व पालकांना शिक्षणाचे महत्त्व आणि महाडिक हायस्कूलची ध्येय धोरणे विषद केली.

यावेळी दिग्विजय कौंदाडे, सागर कौंदाडे, आकाश कौंदाडे, शंकर पाटील, लक्ष्मी गावडे,सुजाता गावडे, राधिका पाटील, स्नेहल पाटील, पूजा कांबळे,मनीषा संकपाळ उपस्थित होते. सूत्रसंचालन जयश्री तिरपणे यांनी केले तर आभार स्वप्नाली जाधव यांनी मानले.

### डी.वाय.पाटील टेक्निकल कॅम्पसच्या विद्यार्थ्यांचे क्रीडा स्पर्धेत यश

वारणानगर,ता.४(प्रतिनिधी)–

**डी.वाय.पाटील टेक्निकल विभागाच्या संकेत व्यवहारे पावर लिफ्टिंगमध्ये तर केदार शिंदे याने बॉडी बिल्डिंग स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त करत उल्लेखनीय यश मिळवले आहे.**



श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय कोल्हापूर येथे कोल्हापूर विभागीय क्रीडा परिषद अंतर्गत शिवाजी विदयापीठ अंतर विभागीय स्पर्धा संपन्न झाल्या. यामध्ये महाविद्यालयाच्या तृतीय वर्षातील कॉम्प्युटर सायन्सचा संकेत व्यवहारे याने पावर लिफ्टिंग या स्पर्धेमध्ये ९३ किलो या वजनी गटात द्वितीय क्रमांक पटकाविला.तसेच व्यवसाय व्यवस्थापन पदव्युत्तर पदवी मध्ये शिकत असलेला केदार शिंदे याने बॉडी बिल्डिंग स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला. संकेत व केदार यांना जिमखाना प्रमुख व्ही.बी. उतळे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय.पाटील,आम.सतेज डी.पाटील, ऋतुराज पाटील,पृथ्वीराज पाटील,तेजस पाटील, डॉ.ए.के.गुप्ता, डॉ.सतीश पावसकर यांनीअभिनंदन केले.

# नृसिंहवाडीत गुरुवारपासून श्री गुरुचरित्र पारायण सोहळा

नृसिंहवाडी,ता.४(वार्ताहर)–

**श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथील श्री स्वामी समर्थ गुरुपीठ दत्तधाममध्ये श्री स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त गुरुवार ता.९ ते १५ एप्रिल अखेर सामुहिक श्री गुरुचरित्र वाचन पारायण सप्ताह, अखंड नाम,जप,यज्ञ सप्ताह, महाप्रसाद तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

आखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर,नाशिकचे पिठाधीश प.पु.गुरुमाऊली यांच्या आदेशानुसार व गुरुपुत्र चंद्रकांतदादा यांच्या मार्गदर्शनाखाली नृसिंहवाडी सह गाणगापुर,पिठापूर व त्र्यंबकेश्वर या चार गुरुपीठात तसेच देश-विदेशातील सर्व श्री स्वामी समर्थ केंद्रात एकाचवेळी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहामध्ये बुधवार ता. ८ रोजी ग्रामदेवता मानसन्मान, मंडल मांडणी गुरुवार ता. ९ रोजी मंडल स्थापना, अग्निस्थापना, स्थापित देवता हवन, नित्य स्वाहाःकार,श्री गुरुचरित्र वाचनास सुरुवात शुक्रवार ता.१० रोजी नित्य स्वाहाकार,श्री गणेश याग, श्री मनोबोध याग.शनिवार ता.११ रोजी चंडी याग, रविवार ता.१२ रोजी स्वामी याग, सोमवार ता.१३ रोजी श्री गीताई याग, मगंळवार ता.१४ रोजी श्री रुद्र याग, मल्हारी याग बुधवार ता.१५ रोजी बली पुर्णाहुती,सत्यदत्त पुजन व अखंड नाम,जप,यज्ञ सप्ताह सांगता, तसेच १०:३० वा.महाआरती होऊन महाप्रसाद होईल. दैनंदिन कार्यक्रमामध्ये सकाळी ८ वाजता भुपाळी आरती,८:१५ वा. नित्यस्वाहाकार,सकाळी ८:३० ते १० वा.सामुहिक श्री गुरुचरित्र वाचन, साडेदहा वा.नैवेद्य आरती, सकाळी १०:४५ ते १२ विशेष हवनयुक्त याग, दुपारी २ ते ५:३० वाजेपर्यंत श्री दुर्गा सप्तशती, स्वामीचरित्र सारामृत पाठ वाचन, सायंकाळी ६ वा.औदुंबर प्रदक्षिणा, साडेसहा वा. नैवेद्य आरती, ७ वा. विविध विषयावर मार्गदर्शन, साडेसात वा.नित्यसेवा व नित्यध्यान असे कार्यक्रम होतील.

सप्ताह काळातील सर्व धार्मिक कार्यक्रमांचा सर्व भाविक, सेवेकरी भक्तांनी लाभ घ्यावा, तसेच ज्या भाविकांना सप्ताह काळात अन्नदान करण्यासाठी धान्य, वस्तु, पदार्थ, देणगी द्यावयाचे असेल त्यांनी श्री स्वामी समर्थ गुरुपीठाशी( दत्तधाम) संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# राजे ग्रुपचे सामाजिक कार्य कौतुकास्पद-डॉ.चिचणीकर

शिरगाव,ता.४(प्रतिनिधी)–

**रक्तदान हे श्रेष्ठ दान असून राजे ग्रुपने गेली तेरा वर्षे हा सामाजिक उपक्रम राबवत आहे.त्यांचे कार्य हे कार्य कौतुकास्पद आहे.असे प्रतिपादन डॉ. राजेंद्र चिंचणीकर यांनी केले.**

तरसंबळे (ता.राधानगरी) येथील ज्योतिर्लिंग चैत्र यात्रेनिमित्त राजे ग्रुपच्या वतीने आयोजित रक्तदान शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या शिबीराचे उद्घाटन दिपाली पडवळे व सारिका धामणे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने झाले. मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर धामणे यांनी प्रास्ताविकात



तरसंबळे येथे आयोजित रक्तदान शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी दिपाली पडवळे,सारिका धामणे,प्रभाकर धामणे व इतर मान्यवर.

मंडळाच्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला. राजेग्रुप व अर्पण रक्तपेढीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या रक्तदान शिबीरात ७५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यात सोळा महिला रक्तदात्याचा समावेश आहे.शिबीर यशस्वी होण्यासाठी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. आभार संभाजी पाटील यांनी मानले.

श्रीहरी
शुक्रवार, ता. ०३/०४/२०२६ पासून
दुपारी १ व ४ वाजता
मस्त रोमँटीक हिंदी चित्र
वासना
जबदस्त रोमँटीक हिंदी चित्र
७ वा.
A
सेक्सी गर्लफ्रेंड
प्रौढांसाठी

श्रीदत्त
शुक्रवार, ता. ३ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
स्कँडल सेक्स
A
फक्त प्रौढांसाठी
A

पंचवटी
DOLBY DIGITAL PLUS 7.1
गर्दीचा ३ रा आठवडा
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 7 वाजल्यापासून सुरू राहील
book my show
पंचवटी वॉटसॲप ग्रुप
संपर्क : 9623150103
रोज ३ खेळ
* दुपारी १२ व ४ आणि रात्री ९ वा.




५७ वर्षे
सिनेरसिकांच्या सेवेत
DOLBY DIGITAL
भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम
गुरुवार ता. १९पासून रोज ३ खेळ
११.१५ - ३.१५ - ७.१५ वा.
खास कमी केलेल्या दरात ति.दर रु. ५०




कल्पना
लेजर प्रोजेक्टरसहीत
गुरुवार ता.१९ पा
१२ वा., दुपारी ४ वा, रात्री ९ वा,
सुपरहिट फुल्ल ॲक्शन चित्रपट




गुरु
शुक्रवार ता.३ पासून
ऑनलाईन बुकींग book my show
रोज ३ खेळ १२*४*९ वा.
फॅमिली गर्दीचा सुपरहिट्ट ३ रा आठवडा
आता खास कमी केलेल्या दरात




RK CINEMA
3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070
book my show




" धुरंधर 2 : द रिव्हेंज " - हिंदी ( A )
09:30 AM, 10:45 AM, 12:00 PM, 02:00 PM
03:00 PM, 04:15 PM, 06:15 PM, 08:45 PM
10:00 PM, 10:30 PM
" सुपर डुपर " - मराठी ( U/A 16+ )
07:15 PM
आता कोणताही मराठी शो पहा 100/-* पासून पुढे

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on book my show
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क
+91 88 88 01 51 11




धुरंधर २ (HIN) (A)
10.30am, 12.00, 01.30, 03.00, 04.30, 06.00, 07.30, 09.00, 10.30 pm
सखे गं साजणी (MAR) (U/A)
11.00 am
आता पहा मॉर्निंग शो फक्त 100 पासून पुढे

# बुर्लीतील पंचायतन वन प्रकल्पाची दयनीय अवस्था

## वनीकरणाच्या गप्पा हवेत,केवळ वृक्षारोपणाचा फार्स

## शासनाच्या उदासीनतेमुळे ग्रामस्थांत संतापाची लाट

भिलवडी,ता.४(घनःशाम मोरे)-

**सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील बुर्ली आणि आमणापूर या गावांच्या दरम्यान कृष्णा नदीच्या काठावर वसलेले बंचाप्पा बन हे एक नैसर्गिक पर्यटन स्थळ आहे. पक्ष्यांचा उत्तम अधिवास आणि निसर्गाचे वरदान लाभलेल्या सुमारे ८० एकरांच्या विस्तीर्ण बंचाप्पा बन गायरानात सध्या शासकीय अनास्थेचा एक विचित्र नमुना पाहायला मिळत आहे.**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक वनीकरण विभाग, सांगली यांच्या वतीने थाटामाटात येथे पंचायतन वन प्रकल्प साकारण्याची घोषणा झाली होती.



बुर्ली येथील पंचायतन वनात लावलेली झाडे दुर्लक्षामुळे पूर्णपणे वाळून गेली असून येथे केवळ माहितीचे फलकच दिसत आहेत.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून या ठिकाणी औषधी आणि दाट सावली देणाऱ्या झाडांची लागवड प्रशासनाने केली. परंतु आज घडीला या संपूर्ण प्रकल्पाची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, निसर्ग संवर्धनाचा हा दावा निव्वळ कागदी घोडे आणि केवळ फलकांपुरताच मर्यादित राहिल्याचे विदारक चित्र समोर आले आहे.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत २०२३-२४ या कालावधीत सुमारे १ हेक्टर म्हणजेच अडीच एकर क्षेत्रावर वड, उंबर, पिंपळ, बेल, कडुलिंब आणि देशी आंबा अशा शंभरहून अधिक औषधी आणि देशी वृक्षप्रजातींची लागवड करण्यात आली होती. या झाडांमुळे परिसरात कायमस्वरूपी शीतलता निर्माण होईल आणि पशूपक्ष्यांसाठी उत्तम अधिवास ठरेल, अशी देखणी स्वप्ने येथील एका भव्य लोखंडी माहिती फलकाद्वारे रंगवण्यात आली. मात्र, प्रत्यक्षात या ठिकाणी वृक्षारोपणाचा निव्वळ फार्स सुरू आहे. गेल्या दोन-तीन वर्षांत येथे एकाच खड्ड्यात दोन-दोनदा झाडे लावूनही ती कुठेच वाढलेली दिसत नाहीत.

आज परिस्थिती अशी आहे की, झाडांच्या नावांचे आणि त्यांच्या गुणवैशिष्ट्यांचे फलक येथे दिमाखात उभे आहेत, मात्र ज्या झाडांची माहिती ते देतात ती झाडेच परिसरातून गायब झाली आहेत. हा फलक आता केवळ शोभेची वस्तू बनून प्रशासकीय थट्टेची साक्ष देत उभा आहे. या ठिकाणी वृक्षारोपण करण्यासाठी आणलेले महागडे साहित्य आज उघड्यावर अस्ताव्यस्त पडून धूळ खात आहे. यामध्ये ठिबक सिंचनाचे ड्रीप पाईप, बांबू, शेडनेट आणि झाडांच्या रक्षणासाठी आणलेली संरक्षक फायबर जाळी यांचा समावेश आहे. हे साहित्य योग्य रीतीने न वापरल्यामुळे शासकीय निधीचा अपव्यय कसा होतो, हे स्पष्ट दिसते.

शासनाच्या या उदासीन आणि बेजबाबदार कारभारामुळे निसर्गप्रेमी, आमणापूर आणि बुर्लीच्या ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. हा प्रकल्प केवळ कागदोपत्री न ठेवता, प्रशासनाने तातडीने या पंचायतन वनाची प्रामाणिक पाहणी करावी, वाळलेल्या झाडांच्या जागी नवीन रोपे लावून त्यांच्या संगोपनाची आणि जगण्याची लेखी शाश्वती द्यावी, अशी मागणी आता परिसरातून जोर धरू लागली आहे.

> गेल्या महिन्यात वनीकरणाच्या कोणत्यातरी बड्या अधिकाऱ्यांनी या प्रकल्पाला भेट दिली होती. त्यांच्या दौऱ्यानिमित्त आयत्या वेळी आणलेली रोपे लागवड न करता तशीच नाळीत पडून राहिली.अखेर देखभालीअभावी आणि पाण्याच्या टंचाईमुळे ती सर्व कोवळी रोपे आता पूर्णपणे वाळून गेली आहेत. वृक्षारोपणाचा केवळ सोहळा साजरा करायचा,फोटो काढून वरिष्ठ पातळीवर उद्दिष्ट पूर्ण झाल्याचे दाखवायचे आणि नंतर त्या रोपांकडे कायमची पाठ फिरवायची,ही सामाजिक वनीकरण विभागाची जुनीच खोड यानिमित्ताने पुन्हा अधोरेखित झाली आहे.या झाडांना वेळेवर पाणी घालणे किंवा जनावरांपासून त्यांचे संरक्षण करणे याकडे वन विभागाने पूर्णतः दुर्लक्ष केले आहे.



सभापतीपदी निवडीनंतर महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यास अभिवादन करताना सौ.सावित्री पाटील,तमनगोंडा रविपाटील व इतर.

# जिल्हा परिषद सभापती निवडीनंतर जतमध्ये जल्लोष

जत,ता.४(प्रतिनिधी)-

**जत तालुक्याला पुन्हा एकदा जिल्हा परिषद सभापतीपदाचा मान मिळाला असून सौ.सावित्री तमनगोंडा रवि पाटील यांची सांगली जिल्हा परिषद सभापतीपदी निवड झाली आहे. महाविकास आघाडीच्या माध्यमातून ही निवड झाल्याने जिल्ह्यातील राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे.**

यापूर्वी २०१७ च्या जिल्हा परिषद निवडणुकीत तमनगोंडा रवि पाटील यांना शिक्षण व आरोग्य सभापतीपदाची जबाबदारी मिळाली होती. दरम्यान, सौ.सावित्री पाटील यांच्या निवडीचे वृत्त समजताच जत शहरासह तालुक्यात जल्लोष साजरा करण्यात आला. कार्यकर्त्यांनी फटाके फोडत, घोषणाबाजी करत आनंद व्यक्त केला. शहरात भव्य स्वागत मिरवणूक काढण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

सभापतीपदी निवड झाल्यानंतर सौ. सावित्री पाटील म्हणाल्या, जत तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रांवर विशेष भर देत जिल्ह्याच्या प्रगतीसाठी काम केले जाईल.

# धोमच्या डाव्या कालव्याला आवर्तन सोडावे

## ...अन्यथा सोमवारपासून बेमुदत उपोषण

## धोम पाणी बचाव संघर्ष समितीचा इशारा

कोरेगाव,ता.४(वार्ताहर)-

**धोम धरणाच्या डाव्या कालव्याला उन्हाळी हंगामातील पहिले आवर्तन पाच एप्रिलला सोडावे अन्यथा सोमवार (ता.६)पासून सातारा सिंचन मंडळाच्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास बसण्याचा इशारा धोम धरण पाणी बचाव संघर्ष समितीने दिला आहे.**

याबाबत संघर्ष समितीने सातारा सिंचन मंडळाचे अधीक्षक अभियंता आणि कार्यकारी अभियंता योगेश शिंदे यांना प्रत्यक्ष भेटून एक निवेदन देऊन पिकांसाठी पाण्याची गरज लक्षात घेऊन उन्हाळी हंगामातील पहिले आवर्तन एक एप्रिलला सोडण्याची मागणी केली होती. हे आवर्तन सोडण्यासाठी कालवा सल्लागार समितीची बैठक झालेली नाही अशी कारणे न देता आवर्तन सोडण्याची विनंती केली होती. मात्र तेच कारण पुन्हा सांगण्यात आले.मागील आवर्तन २३ फेब्रुवारीला सोडण्यात आले होते. रहिमतपूरपासून पुढील भागातील शेतीला पाणी देऊन तब्बल ३५ दिवस पूर्ण झाले आहेत आता पाणी मिळाले नाही तर पिके पाण्यावाचून वाळून जाणार आहेत. या पार्श्वभूमीवर पाच एप्रिलला आवर्तन आवर्जून सोडावे अन्यथा सहा एप्रिलपासून धोम धरण लाभक्षेत्रातील वाई, सातारा, जावळी,कोरेगावच्या शेतकऱ्यांसह हक्काच्या पाण्यासाठी सातारा सिंचन मंडळाच्या कार्यालयासमोर उपोषणाला बसणार आहोत,असे निवेदनात म्हटले आहे.



सातारा: कार्यकारी अभियंता योगेश शिंदे यांना निवेदन देताना रणजीत फाळके, त्यावेळी चंद्रकांत बर्गे, माणिकराव भोसले आदी.

निवेदनावर समितीचे अध्यक्ष चंद्रकांत रावसाहेब बर्गे, कार्याध्यक्ष रणजित शिवाजीराव फाळके, सचिव नंदकुमार माने-पाटील, माणिकराव भोसले, चंद्रकांत राऊत, जगदीश पवार, सुधाकर बर्गे, दत्तात्रय बर्गे, संजय गायकवाड, विशाल हुबे आदींच्या सह्या आहेत.

# गॅस,इंधन पुरवठा सुरळीत ठेवा-आ.आवताडे

## मंगळवेढ्यात गॅस एजन्सी प्रतिनिधी, पेट्रोल पंप चालक आणि प्रशासनाची संयुक्त बैठक

पंढरपूर,ता.४(प्रतिनिधी)-

**पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात गॅस आणि इंधनचा पुरवठा सुरळीत सुरू ठेवण्यासाठी आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील प्रांताधिकारी व दोन्ही तालुक्यातील तहसीलदार, गॅस एजन्सीचे प्रतिनिधी आणि पेट्रोल पंप चालक यांची मंगळवेढा येथे संयुक्तपणे बैठक घेतली. याप्रसंगी आमदार समाधान आवताडे यांनी मतदारसंघात गॅस आणि इंधनचा पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या सूचना दिल्या.**



मंगळवेढा येथे आयोजित संयुक्त बैठकीत बोलताना आ.समाधान आवताडे,समवेत अधिकारी व इतर मान्यवर.

याप्रसंगी पंढरपूरचे प्रांताधिकारी सचिन इथापे, मंगळवेढ्याचे प्रांताधिकारी बी.आर.माळी, पंढरपूरचे तहसीलदार सचिन लंगोटे, मंगळवेढ्याचे तहसीलदार मदन जाधव, सभापती दिपाली ताड, जिल्हा परिषद सदस्य रमेश भांजे, जिल्हा परिषद सदस्य प्रदीप खांडेकर, उपनगराध्यक्ष येताळा भगत,जिल्हा परिषद सदस्य करुणा शिवशरण,अनिल नागटिळक, अरुण नागटिळक यांच्यासह गॅस एजन्सीचे प्रतिनिधी तसेच पेट्रोल पंप चालक उपस्थित होते.

आखाती देशात सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे देशाबरोबर राज्यातही गॅस आणि इंधनचा तुटवडा भासू लागल्याने सर्वसामान्य नागरिकांना इंधनाच्या समस्यांशी सामना करावा लागत असून हॉटेल व्यावसायिकांवर व्यवसाय बंद करण्याची वेळ आली आहे. देवभूमी पंढरपूर आणि संत भूमी मंगळवेढा येथे मोठ्या संख्येने भाविक दाखल होत असतात.येथे येणाऱ्या भाविकांची संख्या पाहता हॉटेल व्यावसायिकांना आणि स्थानिक नागरिकांना गॅस आणि इंधनचा सुरळीत पुरवठा व्हावा. यासाठी आमदार आवताडे यांनी ही बैठक घेऊन मतदार संघात गॅस आणि इंधनचा पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या सूचना केल्याने सर्वसामान्य नागरिकांना आणि हॉटेल व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# एम.डी.पवार पीपल्स बँकेला ६४ कोटींचा निव्वळ नफा-पवार

ईश्वरपूर,ता.४(प्रतिनिधी)-



**येथील एम.डी.पवार पीपल्स को-ऑप. बँकेला ३१ मार्च अखेरच्या आर्थिक वर्षात ६४ कोटी १९ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला असल्याची माहिती बँकेचे संचालक वैभव पवार यांनी दिली.**

ते म्हणाले, बँकेच्या एकूण ठेवी ८४ कोटी २९ लाख रुपयांवर पोहोचल्या असून एकूण कर्जवाटप ५३ कोटी ५६ लाख रुपये झाले आहे. खेळते भांडवल १०१ कोटी तर स्वनिधी ८ कोटी ३२ लाख इतका आहे. बँकेचा एकूण व्यवसाय १३७ कोटी ८५ लाख रुपयांपर्यंत पोहोचला आहे. गुंतवणूक ३६ कोटी ७१ लाख इतकी आहे. प्रति सेवक व्यवसाय २ कोटी ९३ लाख इतका नोंदविण्यात आला आहे. बँकेचे ग्रॉस एनपीए प्रमाण ५.८० टक्के तर नेट एनपीए १.३४ टक्के आहे. सीआरआर १७.३८ टक्के आणि सीडी रेशो ६३.५४ टक्के आहे. बँकेने ऑडिट वर्ग 'अ' सतत राखलेला आहे. यावेळी चेअरमन अलकादेवी पवार, व्हा.चेअरमन प्रकाश चव्हाण, तज्ञ संचालक ॲड.सुहास हावळे, चंद्रकांत खंकाळे व मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष आवटी उपस्थित होते.

# आनंदराव पाटील पतसंस्थेचा २०० कोटी एकत्रित व्यवसाय-पाटील

ढेबेवाडी,ता.४(प्रतिनिधी)-



**आनंदराव चव्हाण ग्रामीण बिगर शेती-सहकारी पतसंस्था मंद्रुळकोळे (ढेबेवाडी, ता.पाटण) या संस्थेने मार्च २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात २०० कोटींवर एकत्रित व्यवसायाचा टप्पा गाठून प्रगतीचा चढता क्रम कायम ठेवला असल्याची माहिती संस्थेचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी दिली.**

श्री.पाटील म्हणाले, संस्थेने चालू आर्थिक वर्षात नेत्रदीपक कामगिरी केली आहे. संस्थेकडे २१५ कोटींच्या वर ठेवी जमा झाल्या आहेत, तर ८० कोटी ५० लाख कर्ज वितरण केले आहे. संस्थेचे वसूल भांडवल तीन कोटी ५८ लाख ८० हजार आहे. गुंतवणूक ३३ कोटी ७ लाख ९७ हजार आहे. संस्थेचा निधी तीन कोटी १५ लाख ७३ हजार ९०० असून, एक कोटी ३० हजार एवढा नफा झाला आहे. चालू आर्थिक वर्षात १६ कोटी ५० लाखाची वाढ झाली आहे. संस्थेचे सात हजार ८३२ सभासद आहेत.संस्थेच्या कराड व पाटण तालुक्यात १३ शाखा व मुख्य कार्यालय कार्यरत असून त्यापैकी सात शाखा व मुख्य कार्यालय संस्थेच्या स्वतःच्या जागेत आहे. सर्व शाखेत आरटीजीएस, लाईट बिल स्वीकृती केंद्र, चेक क्लिअरन्स अशा विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या असून संस्थेचे कामकाज कोअर बँकिंग प्रणालीपद्धतीने सुरू आहे. संस्थेच्या कार्यक्षेत्र वाढीस परवानगी मिळाली असून लवकरच पुणे व मुंबई शाखा सुरू करण्याचा मनोदय आहे.

# डांगे महाविद्यालयात मार्गदर्शन सत्र संपन्न

आष्टा,ता.४(प्रतिनिधी)-

**येथील अण्णासाहेब डांगे अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी 'इन्क्युबेशन व स्टार्टअप' या विषयावर विशेष संवाद व मार्गदर्शन सत्र संपन्न झाले. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पनांचे यशस्वी स्टार्टअपमध्ये रूपांतर कसे करावे आणि इन्क्युबेशन केंद्रांची महाविद्यालयामध्ये भूमिका काय? याबाबत मार्गदर्शन करणे हा उद्देश होता.**

संदीप मगदूम यांनी विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता आणि उद्योजकतेची वृत्ती विकसित होण्याची गरज अधोरेखित केली. सिद्धम इनोव्हेशन अँड बिझनेस इन्क्युबेशन सेंटरचे श्रेयस दोडमिसे यांनी स्टार्टअप उभारणीची प्रक्रिया आणि इन्क्युबेशन केंद्रांचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी विद्यार्थ्यांना आपल्या कल्पनांचे पेटंट किंवा कॉपीराइटद्वारे संरक्षण करण्याचे महत्त्वही पटवून दिले. तसेच शासनाच्या संशोधन विकास निधीसारख्या आर्थिक सहाय्य योजनांची माहिती दिली. सचिन कुंभोजे यांनी कोणतेही उत्पादन बाजारात आणण्यापूर्वी संभाव्य ग्राहकांशी संवाद, सुधारणा आणि नवकल्पना याबाबत मार्गदर्शन केले.

जागतिक पातळीवरील बदल, संरक्षण तंत्रज्ञान आणि आर्थिक घडामोडींचा उल्लेख करत त्यांनी विद्यार्थ्यांना अंडरवॉटर वेल्डिंग, हेल्थकेअर टेक्नॉलॉजी, फूड टेक्नॉलॉजी, हरित ऊर्जा आणि क्वांटम संगणन यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये नवोन्मेष करण्याचे आवाहन केले.विद्यार्थ्यांनी विविध कल्पनांबाबत प्रश्न विचारून तज्ज्ञांशी संवाद साधला.

संस्थेचे सचिव ॲड.राजेंद्र डांगे म्हणाले, विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीकडे पाहण्याऐवजी नवकल्पना आणि उद्योजकतेच्या माध्यमातून रोजगारनिर्माते बनण्याचा विचार करावा. हॅकाथॉन आणि इन्क्युबेशनसारखे उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला आणि संशोधन वृत्तीला चालना देतात. संस्थेचे सहसचिव विश्वनाथ डांगे म्हणाले, नाविन्यपूर्ण कल्पनांवर काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्थेकडून आवश्यक ते प्रोत्साहन व मार्गदर्शन दिले जाईल. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पना प्रत्यक्ष उत्पादनामध्ये रूपांतरित करण्यासाठी पुढाकार घ्यावा.

महाविद्यालयाचे संचालक डॉ. एल.वाय.वाघमोडे म्हणाले, आजच्या काळात स्टार्टअप संस्कृती विद्यार्थ्यांसाठी मोठ्या संधी निर्माण करत आहे. स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण कल्पना विकसित करून त्यांचे स्टार्टअपमध्ये रूपांतर करण्याची प्रेरणा मिळते. महाविद्यालयातील डीन्स डॉ. एस. गोपीनाथ,डॉ.अमोल डांगे,डॉ.आसमा शेख, इतर प्राध्यापक वर्ग, समन्वयक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# सांगली अर्बन बँकेस १८ कोटींचा ढोबळ नफा-खिरे

सांगली,ता.४(प्रतिनिधी)-

**सांगली अर्बन को-ऑप बँकेने २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु २३०० कोटी मिश्र व्यवसायाचा टप्पा पार केला आहे. संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेला रु १८ कोटी ढोबळ नफा झाला आहे, अशी माहिती बँकेचे अध्यक्ष सी.ए श्रीपाद खिरे यांनी दिली.**



बँकेच्या ठेवींमध्ये रु ११९ कोटींची वाढ होऊन एकूण ठेवी रु १३९६ कोटी झाल्या आहेत.तसेच कर्जामध्ये रु. १७२ कोटी इतकी वाढ होऊन रु. ९३२ कोटी कर्जांचे वाटप झाले आहे. बँकेचा एकूण व्यवसायात वाढ होऊन तो रु. २३२८ कोटींचा झाला आहे. बँकेच्या एन.पी.ए मध्ये लक्षणीय घट होऊन ढोबळ एन.पी.ए २.६७ टक्के इतका व निव्वळ एन.पी.ए चे प्रमाण केवळ ०.७८ टक्के इतके राहिला आहे, असे श्री.खिरे यांनी सांगितले.

ते म्हणाले, बँकेस मोबाईल बँकिंग सुरु करण्यास रिझर्व बँकेकडून नुकतीच मान्यता मिळाली आहे. त्यामुळे जून महिन्यात बँकेच्या खातेदारांना मोबाईल बँकिंग सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मोबाईल बँकिंगमुळे बँकेचे ग्राहक घरबसल्या या सेवेद्वारे आपल्या मोबाईल फोनवरून आपल्या खात्याची तपासणी, बिल भरणे, पैसे ट्रान्सफर करणे आणि इतर बँकिंग कार्ये करू शकतात. बँकेच्या एकूण प्रगतीमध्ये माजी अध्यक्ष आणि व्यवस्थापन मंडळाचे विद्यमान अध्यक्ष गणेश गाडगीळ यांचे मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष संजय पाटील व सर्व सहकारी संचालक, व्यवस्थापन मंडळ सदस्य यांची मोलाची मदत व सहकार्य मिळाले आहे. तसेच बँकेच्या आर्थिक स्थितीमुळे यावर्षीही लाभांश देणे, शाखा विस्तार करणे आणि ग्राहकांसाठी नवीन अद्ययावत तंत्रज्ञानयुक्त सेवा देणे शक्य होणार आहे असेही अध्यक्ष खिरे यांनी सांगितले.

# मांगलेत अंगणवाडीस दूरदर्शन संचाचे वाटप

शिराळा,ता.४(प्रतिनिधी)-

**मांगले (ता. शिराळा) येथे सर्व अंगणवाडीस दूरदर्शन संच (एल. ई. डी. टिव्ही) वाटप कार्यक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद सदस्य विराज नाईक होते. स्वागत व प्रास्ताविक सरपंच प्रल्हाद पाटील यांनी केले.**

नवनिर्वाचित उपसरपंच पांडुरंग उर्फ पिंटू कुंभार व मावळते उपसरपंच तानाजी जमदाडे यांचा सत्कार जि. प. सदस्य श्री. नाईक यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी सर्व अंगणवाडीस दूरदर्शन संच (एल. ई.डी. टिव्ही) वाटप करण्यात आले. कार्यक्रमास पंचायत समिती सदस्य मोहन पाटील, 'विश्वास'चे संचालक सुरेश पाटील, दत्तात्रय पाटील, मीनाताई बेंद्रे, राहूल पवार, उदय पाटील, पोपट चरापले, दत्ता पाटील, सत्यम पाटील, संपत चरापले, आबासो गावडे, विजयकुमार पाटील, तसेच अंगणवाडी सेविका, ग्रामस्थ उपस्थित होते.

# पंढरपुरातील अत्यावश्यक कामांना प्राधान्य द्यावे

## नगरसेवक बंदपट्टे यांची मागणी : सर्वसाधारण सभेत विकास कामांवर चर्चा

पंढरपूर,ता.४(प्रतिनिधी)-

**पंढरपूर नगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत मंदिर परिसरातील प्रस्तावित कॉरिडॉरसह शहरातील अनेक महत्त्वपूर्ण विकास कामांवर चर्चा झाल्याचे दिसून आले.**

शहरातील विविध ठेकेदार तसेच पुरवठादार यांची नगरपालिकेकडे ४१ कोटी रुपयांची बिले थकीत असल्याची बाब स्पष्ट झाल्याने पुढील विकास कामांसाठी निधीची उपलब्धता लक्षात घेत नियोजन करावे लागणार आहे. नगरसेवकांना आपल्या प्रभागातील विकास कामे करताना मर्यादा येणार आहेत आणि यातूनच सर्वसाधारण सभेत विकास कामे करताना जी कामे अत्यावश्यक आहेत आणि तातडीने करणे गरजेचे आहे अशा कामांना प्राधान्य दिले जावे, अशी मागणी तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे नगरसेवक संजय बंदपट्टे यांनी सभागृहात केल्याचे दिसून आले.पंढरपूर नगरपालिकेकडून आपले आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी काय उपाययोजना केल्या जाणार आहेत असा प्रश्न देखील नगरसेवक संजय बंदपट्टे यांनी उपस्थित केला. पंढरपूर नगरपालिकेकडून शहरात येणाऱ्या वाहनांना आकारल्या जाणाऱ्या पार्किंगची निविदा रद्द करण्यात आली आहे.त्यामुळे अधिकृत रित्या पार्किंगची वसुली बंद आहे. परंतु शहराच्या अनेक भागात बोगस पावत्या देऊन तसेच बेकायदा वसुली सुरू असल्याचा आरोप नगरसेवक बंदपट्टे यांनी केला. जर अशा पद्धतीने काही खाजगी व्यक्ती परस्पर वसुली करत असतील तर पंढरपूर नगरपालिकेने भाविकांना कुठलाही त्रास न होता पार्किंग फी कशा पद्धतीने आकारली जाईल यासाठी उपाययोजना करून निविदा प्रक्रिया राबवावी. पंढरपूर नगर पालिकेच्या मालकीच्या शहरात अनेक मोक्याच्या ठिकाणी जागा आहेत. करारभंग केलेल्या अथवा करार संपलेल्या अशा जागा ताब्यात घेऊन त्या ठिकाणी शॉपिंग सेंटर उभारले जावेत त्यामुळे नगरपालिकेचे उत्पन्न वाढेल यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी नगरसेवक संजय बंदपट्टे यांनी केली.



पंढरपूर पालिकेच्या सर्वसाधरण सभेत बोलताना नगरसेवक संजय बंदपट्टे, यावेळी उपस्थित इतर नगरसेवक.

दरम्यान,या सभेत पंढरपूर शहराचा मोठा भाग चंद्रभागा नदीच्या निळ्या पूर रेषेत समाविष्ट करण्यात आल्याने त्या ठिकाणच्या रहिवाशांना नगर पालिकेकडून बांधकाम परवाने मिळण्यात मोठी अडचण येत आहे. तरी राज्य शासनाकडे याबाबत त्वरित पाठपुरावा केला जावा, अशी मागणीही नगरसेवक बंदपट्टे यांनी केली आहे.

> इतिहासात युद्धे ही नेहमीच आर्थिक धक्के देणारी ठरली आहेत. पहिल्या महायुद्धाने एकोणिसाव्या शतकातील मुक्त व्यापार व्यवस्थेला तडा दिला, तर दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक आर्थिक व राजकीय व्यवस्थेचे पूर्ण पुनर्रचना करावी लागली. परंतु सध्याचा इराण आणि अमेरिका–इस्राईल यांच्यातील संघर्ष यापेक्षाही अधिक गुंतागुंतीचा असून तो जागतिक व्यवस्थेला धक्का देत आहे.काही अंदाजानुसार हा संघर्ष दीर्घकाळ चालला, तर जागतिक सकल उत्पादनात काही टक्क्यांनी घट होऊ शकते. ही गोष्ट आकड्यांपुरती मर्यादित नाही; त्याचा अर्थ मंद आर्थिक वाढ, वाढती बेरोजगारी आणि घटणारी जीवनमानाची पातळी असा होतो. १९७० च्या दशकातील तेल संकट किंवा १९२९ च्या महामंदीची तुलना येथे आठवते.

**● रविवार विशेष**

# बिकट वळणावर जग...



कौटिल्याने अर्थस्य मूलं कर्म असे लिहिताना संपत्ती ही मानवी प्रयत्नांची मूळ प्रेरणा असल्याचे सांगितले होते. साम्राज्ये उदयास आली आणि नष्टही झाली, वसाहती युग गेले, आधुनिक राष्ट्र–राज्यांची निर्मिती झाली;तरीही हा विचार काळाच्या कसोटीवर टिकून राहिला. परंतु आजचा काळ या तत्त्वज्ञानाचा उलटा अर्थ दाखवताना दिसतो. व्यापार, ऊर्जा आणि परस्पर सहकार्य यांच्या आधारे निर्माण झालेली आर्थिक शक्ती आज त्याच राजकीय प्रवृत्तींमुळे दडपली जात आहे, ज्या प्रवृत्ती कधीकाळी या आर्थिक शक्तींवरच अवलंबून होत्या.

इराण, इस्रायल आणि अमेरिकेचा सहभाग असलेल्या आखाती प्रदेशातील नव्या संघर्षाने जागतिक आर्थिक व्यवस्थेचीच कसोटी लावली आहे. या संघर्षाचे रणांगण जरी मध्यपूर्वेत असले, तरी त्याचे परिणाम संपूर्ण जगावर जाणवत आहेत. आजच्या परस्परावलंबी अर्थव्यवस्थेत भूगोल अजूनही महत्त्वाचा ठरतो, विशेषतः जेव्हा तो समुद्री मार्गांच्या अरुंद दुव्यांमध्ये संकुचित होतो. होर्मुझची सामुद्रधुनी हा त्यातील सर्वात महत्त्वाचा दुवा आहे.जगातील एकूण तेल वापराच्या जवळपास पाचव्या भागाचा पुरवठा या मार्गातून होतो.या मार्गात अडथळा निर्माण होताच बाजारपेठा, उद्योग आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात अस्थिरतेची लाट पसरली आहे.तेलवाहू जहाजांनी मार्ग काढताना संकोच दाखवला आणि विमा कंपन्यांनी जोखीम टाळण्याचा प्रयत्न केला की त्याचे परिणाम केवळ तेहरान किंवा तेल अवीवपुरते मर्यादित राहत नाहीत; मुंबई, बर्लिन आणि शांघायपर्यंत त्याचे पडसाद उमटतात.

इतिहासात युद्धे ही नेहमीच आर्थिक धक्के देणारी ठरली आहेत.पहिल्या महायुद्धाने एकोणिसाव्या शतकातील मुक्त व्यापार व्यवस्थेला तडा दिला,तर दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक आर्थिक व राजकीय व्यवस्थेचे पूर्ण पुनर्रचना करावी लागली.परंतु सध्याचा संघर्ष यापेक्षाही अधिक गुंतागुंतीच्या व्यवस्थेला धक्का देत आहे. आजच्या जगात पुरवठा साखळ्या अनेक खंडांमध्ये पसरलेल्या आहेत, वित्तीय बाजारपेठा क्षणोक्षणी प्रतिक्रिया देतात आणि ऊर्जा पुरवठा हा आधुनिक जीवनाच्या जवळपास प्रत्येक क्षेत्राचा पाया आहे. या संकटाचा सर्वाधिक स्पष्ट परिणाम ऊर्जा बाजारपेठांमध्ये दिसून आला आहे. आधीच अस्थिर असलेल्या तेलाच्या किमतींमध्ये अचानक वाढ झाली आहे. संघर्ष अधिक तीव्र झाला किंवा होर्मुझ सामुद्रधुनी प्रत्यक्षात बंद झाली,तर किमती आणखी वाढू शकतात,असा इशारा तज्ज्ञ देत आहेत. द्रवीकृत नैसर्गिक वायू म्हणजेच एलएनजी या महत्त्वाच्या ऊर्जा स्त्रोतावरही या संघर्षाचा परिणाम झाला आहे. कतार आणि संयुक्त अरब अमिरातीसारख्या प्रमुख पुरवठादारांना कामकाजातील अडचणींचा सामना करावा लागत असून त्यामुळे युरोप आणि आशियात किमती वाढल्या आहेत. महामारीनंतर महागाई नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या केंद्रीय बँकांसाठी ही परिस्थिती पुन्हा चिंतेची ठरू लागली आहे. परंतु ऊर्जा हा केवळ सुरुवातीचा भाग आहे. आधुनिक अर्थव्यवस्था ही परस्पर गुंतलेल्या जाळ्यासारखी आहे; एका ठिकाणी निर्माण झालेला अडथळा संपूर्ण व्यवस्थेत पसरतो. विमानवाहतूक क्षेत्र त्याचे उदाहरण आहे. आखाती प्रदेशातील काही भागांतील हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे विमान कंपन्यांना हजारो उड्डाणे वळवावी किंवा रद्द करावी लागली आहेत. त्यामुळे खर्च वाढला असून वाहतूक व्यवस्थेत अडथळे निर्माण झाले आहेत. समुद्री वाहतुकीवरही परिणाम झाला आहे. काही मार्ग धोकादायक ठरल्याने जहाजे आफ्रिकेच्या दक्षिणेकडील केप ऑफ गुड होप मार्गे वळसा घेत आहेत. त्यामुळे माल पोहोचण्यास अनेक आठवडे जास्त लागत आहेत आणि वाहतूक खर्च वाढत आहे.परिणामी अन्नधान्य,वस्त्रउद्योग आणि बांधकाम साहित्य यांसारख्या दैनंदिन वस्तूंच्या किमती वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

विकसनशील देशांसाठी या परिस्थितीचे परिणाम अधिक गंभीर आहेत.आशिया आणि आफ्रिकेतील अनेक देश ऊर्जा आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहेत.तेलाच्या किमती वाढल्या की त्यांचे आयात बिल वाढते, चलनावर दबाव येतो आणि अर्थसंकल्पीय तूट वाढते. आधीच ताणलेल्या सामाजिक कल्याण योजनांवर मर्यादा येतात.भूक निर्मूलन, शिक्षणाचा विस्तार यांसारख्या जागतिक विकासाच्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टांना त्यामुळे आणखी विलंब होतो.

आखाती देशही या संकटापासून पूर्णपणे सुरक्षित नाहीत. त्यांच्या प्रचंड तेलसंपत्ती असूनही अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तूंसाठी ते मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून आहेत. पाण्याच्या निर्मितीसाठी असलेल्या विलवणीकरण प्रकल्पांमध्ये अडथळे निर्माण झाले किंवा पुरवठा साखळी विस्कळीत झाली तर पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत गरजांवरही परिणाम होऊ शकतो.अनेक दशकांच्या प्रयत्नांतून उभ्या राहिलेल्या त्यांच्या आर्थिक विविधीकरणालाही या संघर्षामुळे कसोटीचा सामना करावा लागत आहे.जगातील औद्योगिक केंद्रांनाही या परिस्थितीचा फटका बसू शकतो. युक्रेनवरील रशियाच्या आक्रमणानंतर निर्माण झालेल्या ऊर्जा संकटातून सावरत असलेल्या युरोपसमोर दुसऱ्या संकटाची शक्यता उभी राहिली आहे. रसायन, पोलाद आणि उत्पादन क्षेत्रासारख्या उद्योगांना स्थिर व स्वस्त ऊर्जा आवश्यक असते. ऊर्जा पुरवठ्यात अडथळे निर्माण झाल्यास या उद्योगांना उत्पादन कमी करावे लागेल किंवा काही ठिकाणी कामकाज बंद करावे लागेल. आशियातील मोठ्या अर्थव्यवस्थांनाही अशाच आव्हानांचा सामना करावा लागू शकतो. मध्यपूर्वेतील तेलाचा सर्वात मोठा आयातदार असलेला चीन आधीच मंदावलेल्या आर्थिक वाढीच्या पार्श्वभूमीवर पुरवठ्याच्या अनिश्चिततेचा सामना करीत आहे. जपानलाही त्याच्या बहुसंख्य तेल आयातीसाठी आखाती प्रदेशावर अवलंबून राहावे लागते; त्यामुळे त्याला तुटवडा, वाढत्या किमती आणि आर्थिक अस्थिरतेची भीती वाटू लागली आहे.

वित्तीय बाजारपेठांनीही या अनिश्चिततेला तत्काळ प्रतिसाद दिला आहे. अस्थिरता वाढली आहे, समभाग बाजारात चढउतार दिसू लागले आहेत आणि गुंतवणूकदार सुरक्षित पर्यायांकडे वळत आहेत. केंद्रीय बँकांसमोर कठीण प्रश्न उभा राहिला आहे. महागाई रोखण्यासाठी व्याजदर वाढवले तर आर्थिक वाढ मंदावण्याचा धोका आहे; तर धोरण शिथिल ठेवले तर किमती आणखी वाढू शकतात. महामारीनंतर संतुलन राखण्याचा जो प्रयत्न केला जात होता, तो आता अधिक कठीण होत आहे.

काही अंदाजानुसार हा संघर्ष दीर्घकाळ चालला, तर जागतिक सकल उत्पादनात काही टक्क्यांनी घट होऊ शकते. ही गोष्ट आकड्यांपुरती मर्यादित नाही; त्याचा अर्थ मंद आर्थिक वाढ, वाढती बेरोजगारी आणि घटणारी जीवनमानाची पातळी असा होतो. १९७० च्या दशकातील तेल संकट किंवा १९२९ च्या महामंदीची तुलना येथे आठवते. अशा प्रसंगी नेतृत्वाचे महत्त्व मोठे असते. दुसऱ्या महायुद्धानंतर फ्रँकलिन रूझवेल्ट आणि त्यांच्या समकालीन नेत्यांनी ब्रेटन वुड्स संस्थांपासून बहुपक्षीय सहकार्याच्या नव्या चौकटीपर्यंत एक नवी जागतिक व्यवस्था उभी केली. आज मात्र जागतिक राजकीय परिस्थिती तितकी सहकार्यशील दिसत नाही. संयुक्त राष्ट्रांसारख्या संस्था प्रभावी भूमिका बजावण्यात अडचणीत आहेत, तर प्रमुख शक्ती परस्परविरोधी हितसंबंधांमुळे वेगवेगळे मार्ग स्वीकारत आहेत.

या संकटाच्या प्रवासावर काही व्यक्तींच्या निर्णयांचाही परिणाम झाला आहे.अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची आखाती प्रदेशाबाबतची धोरणे आक्रमक आणि अनपेक्षित मानली जातात;त्यामुळे तणाव वाढण्यास हातभार लागल्याची चर्चा होते.दुसरीकडे व्लादिमीर पुतिन यांचे युक्रेनवरील आक्रमण हे दीर्घकाळ चालणाऱ्या संघर्षाचे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या आर्थिक संकटाचे उदाहरण म्हणून पाहिले जाते. स्पष्ट निर्गमन धोरण नसल्याने अशा संघर्षांची किंमत वाढत जाते. जीडीपी किंवा महागाईसारख्या संकल्पनांच्या मागे प्रत्यक्ष मानवी जीवन असते.आखाती देशांतील स्थलांतरित कामगारांना आर्थिक मंदीचा फटका बसू शकतो. भारतासारख्या देशांसाठी महत्त्वाचा असलेला परदेशी चलनाचा प्रवाह धोक्यात येऊ शकतो. अन्नधान्याच्या किमती वाढल्याने अनेक भागांतील अन्नसुरक्षा धोक्यात येण्याची शक्यता आहे. या संपूर्ण परिस्थितीत भारताची भूमिका विशेष लक्षवेधी ठरते.मध्यपूर्वेतील तेलावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असल्यामुळे भारताला किमतींच्या धक्क्याचा धोका आहे. परंतु गेल्या काही वर्षांत भारताने विविध देशांकडून तेल आयात करण्याची धोरणात्मक पावले उचलली आहेत.त्यामुळे काही प्रमाणात स्थैर्य मिळते; तरीही जागतिक प्रवाहांपासून पूर्णपणे दूर राहणे शक्य नाही. महागाईचा दबाव, चलनातील चढउतार आणि परदेशी चलनप्रवाहातील अनिश्चितता ही आव्हाने कायम आहेत.

जागतिकीकरणाने जगाला अनेक लाभ दिले, पण त्याचबरोबर नव्या असुरक्षितताही निर्माण केल्या.होर्मुझ सामुद्रधुनीसारख्या महत्त्वाच्या दुव्यावर अडथळा निर्माण झाला की त्याचे परिणाम संपूर्ण व्यवस्थेत पसरतात. व्यापार मार्ग कायम खुले राहतील, ही आर्थिक नियोजनातील मूलभूत गृहितके आता अधिकच अस्थिर वाटू लागली आहेत. मग पुढचा मार्ग कोणता? सर्वात तातडीची गरज म्हणजे संघर्ष कमी करणे.तात्पुरता युद्धविराम जरी झाला तरी ऊर्जा बाजारपेठांना काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो आणि विश्वास पुन्हा निर्माण होऊ शकतो. त्यापलीकडे काही संरचनात्मक बदल आवश्यक आहेत. ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण,नवीकरणीय ऊर्जेत गुंतवणूक आणि पर्यायी व्यापार मार्गांचा विकास यामुळे अशा असुरक्षित दुव्यांवरील अवलंबित्व कमी होऊ शकते.त्याचबरोबर जागतिक संस्थांमध्येही बदल आवश्यक आहेत, जेणेकरून बहुध्रुवीय जगाच्या वास्तवाला ते अधिक प्रभावीपणे प्रतिसाद देऊ शकतील.राजनैतिक संवादाची पुनर्स्थापना करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.सध्याच्या संकटात विश्वासार्ह संवादयंत्रणांचा अभाव स्पष्टपणे जाणवतो. संवाद कठीण असला तरी दीर्घकालीन शांततेचा तोच टिकाऊ मार्ग आहे.भारतीय चिंतनात 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकल्पना संपूर्ण जगाला एका कुटुंबासारखे मानते. परंतु कुटुंब चालण्यासाठी विश्वास आणि सहकार्य आवश्यक असते.ते नसेल तर परस्परावलंबन हे बळ न ठरता उलट असुरक्षिततेचे कारण बनते. आजचा धोका केवळ आर्थिक मंदीचा नाही; तर अधिक खोलवरच्या विस्कळीततेचा आहे. जग जर प्रतिस्पर्धी गटांमध्ये विभागले गेले, पुरवठा साखळ्या तुटल्या आणि परस्पर विश्वास कमी झाला, तर प्रत्येक अर्थाने ते अधिक गरीब होईल. या पार्श्वभूमीवर आखाती संकट हे केवळ इशारा नाही; तर जागतिक आर्थिक व्यवस्थेचा पाया पुन्हा तपासण्याची संधीही आहे.

**–प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर**

# बस्तर नक्षलमुक्त कसे झाले?

**● मुलाखत**

भारतीय नकाशावर एकेकाळी 'रेड कॉरिडॉर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दंडकारण्यातील परिस्थिती आज पूर्णतः बदलली आहे. ३१ मार्च २०२६ ही तारीख भारताच्या अंतर्गत सुरक्षेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिली जाईल, कारण याच दिवशी आम्ही नक्षलवादाच्या समूळ उच्चाटनाचे आमचे ध्येय साध्य केले. जिथे कधी सुरुंगांचे स्फोट आणि माओवाद्यांच्या दहशतीमुळे जनजीवन विस्कळीत व्हायचे, तिथे आज शांतता आणि विकासाचे नवे पर्व सुरू झाले आहे. हा बदल एका रात्रीत घडलेला नाही,तर त्यामागे सुरक्षा दलांचे अतुलनीय शौर्य, अचूक रणनीती आणि स्थानिक जनतेचा वाढता विश्वास या त्रिसूत्रीचे पाठबळ आहे.

**निर्णायक प्रहार**

नक्षलवादाचा खात्मा हे केवळ पोलीस दलाचे यश नसून तो शासनाचा एक दृढ संकल्प होता. आमच्या ऑपरेशनल रणनीतीचा सर्वात मोठा आधारस्तंभ म्हणजे विविध दलांमधील अभूतपूर्व समन्वय. डीआरजी, एसटीएफ, बस्तर फायटर्स, कोब्रा यांसारख्या विशेष दलांसह सीआरपीएफ, बीएसएफ, आयटीबीपी आणि एसएसबी या केंद्रीय दलांनी खांद्याला खांदा लावून काम केले. पूर्वी नक्षलवादी आंतरराज्यीय सीमांचा फायदा घेत असत;एका राज्यात ऑपरेशन सुरू झाले की ते दुसऱ्या राज्यात पळून जात.मात्र,केंद्रीय गृह मंत्रालयाने सर्व नक्षल प्रभावित राज्यांमध्ये असा समन्वय प्रस्थापित केला की नक्षलवाद्यांना लपण्यासाठी कोणतीही जागा शिल्लक राहिली नाही.



**सर्वात मोठा 'टर्निंग पॉईंट'**

या संघर्षातील सर्वात मोठा 'टर्निंग पॉईंट'मे २०२५ मध्ये आला. अबूझमाडच्या दुर्गम जंगलात झालेल्या एका भीषण चकमकीत सीपीआय (माओवादी) संघटनेचा सरचिटणीस बसवराजू याचा मृतदेह जप्त करण्यात आला. संघटनेचा सर्वोच्च नेता मारला गेल्यामुळे नक्षलवाद्यांचे नेतृत्व पूर्णपणे विस्कळीत झाले.त्यानंतर कोरागुट्टा हिल्समध्ये सलग २१ दिवस चाललेल्या ऐतिहासिक ऑपरेशनने नक्षलवाद्यांची शस्त्रास्त्र निर्मितीची फॅक्टरी आणि त्यांचे शेवटचे सुरक्षित आश्रयस्थान उद्ध्वस्त केले. या मोहिमांमुळे नक्षलवाद्यांचे कंबरडे मोडले आणि उरलेले केडर मोठ्या संख्येने शरणागती पत्करून मुख्य प्रवाहात सामील होऊ लागले.

**'बस्तर फायटर्स': मातीतील सुपुत्र**

बस्तरचा ४२ हजार चौरस किलोमीटरचा भूभाग केरळ राज्यापेक्षाही मोठा आहे. घनदाट जंगले, डोंगरदऱ्या आणि नद्यांनी व्यापलेल्या या दुर्गम भागात बाहेरील दलांना काम करणे सुरुवातीला अत्यंत आव्हानात्मक होते. यावर उपाय म्हणून आम्ही 'डीआरजी' (डिस्ट्रिक्ट रिझर्व्ह गार्ड) आणि 'बस्तर फायटर्स' या दलांची उभारणी केली. यात १०० टक्के स्थानिक तरुणांची भरती करण्यात आली. या जवानांना इथल्या भौगोलिक परिस्थितीची खडान् खडा माहिती आहे, त्यांना स्थानिक गोंडी, हल्बी आणि भतरी बोलीभाषा अवगत आहेत. आपल्याच भागाच्या शांततेसाठी आणि विकासासाठी जेव्हा स्थानिक तरुण बंदूक हातात घेऊन उभे ठाकले, तेव्हा नक्षलवाद्यांचे 'लोकल नेटवर्क' उद्ध्वस्त झाले. आमची महिला कमांडो पथकेही यात मागे नव्हती; त्यांच्यामुळे ग्रामीण महिलांमध्ये सुरक्षेची भावना निर्माण झाली आणि नक्षलवाद्यांचा खोटा प्रचार थांबला.

**दहशत ते विश्वासाचा प्रवास**

नक्षलवादाचा उगम जरी जल, जंगल आणि जमिनीच्या मुद्द्यावरून झाला असला,तरी कालांतराने ही संघटना केवळ हिंसा आणि दहशतीच्या जोरावर टिकून होती. निष्पाप आदिवासींची हत्या करणे, रस्ते आणि वीज पुरवठा खंडित करणे आणि मुलांची सक्तीने भरती करणे ही त्यांची कार्यपद्धती होती. आम्ही केवळ बंदुकीने उत्तर दिले नाही, तर विकासाच्या माध्यमातून लोकांची मने जिंकली. 'बस्तर ऑलिम्पिक्स' आणि 'बस्तर पंडुम' यांसारख्या मोठ्या उपक्रमांतून आम्ही स्थानिक जनतेशी थेट नाते जोडले. या क्रीडा आणि सांस्कृतिक महोत्सवांमुळे पोलीस आणि जनता यांच्यातील भिंत कोसळली. 'नियद नेल्लानार' (तुमचा चांगला गाव) या योजनेअंतर्गत आम्ही अतिदुर्गम भागात पोलीस कॅम्प उभारले. हे कॅम्प केवळ सुरक्षेसाठी नव्हते, तर ते विकासाचे केंद्र बनले. कॅम्पसोबतच रस्ते, शाळा, रुग्णालये आणि रेशनची दुकाने पोहोचली.जेव्हा जनतेला प्रशासनाचा आधार जाणवू लागला,तेव्हा त्यांनी स्वतःहून नक्षलवादाला नाकारले. पूर्वी नक्षलवाद्यांकडून पोलिसांवर होणारे खोटे आरोप आता पूर्णपणे थांबले आहेत, कारण गावकरी स्वतःआता पोलिसांचे मित्र बनले आहेत.जेव्हा जनतेला प्रशासनाचा आधार जाणवू लागला, तेव्हा त्यांनी स्वतःहून नक्षलवादाला नाकारले. पूर्वीचा काळ संसाधनांच्या कमतरतेचा होता. आज आपल्याकडे आधुनिक शस्त्रास्त्रे, दळणवळणाची साधने आणि जखमी जवानांना तत्काळ बाहेर काढण्यासाठी हेलिकॉप्टर्सची सुविधा आहे. तंत्रज्ञान आणि मानवी सामर्थ्याच्या जोरावर आम्ही हे युद्ध जिंकले आहे.

आता आमचे लक्ष केवळ सुरक्षेवर नाही, तर शाश्वत विकासावर आहे. येथील तरुणांना आता मायनर फॉरेस्ट प्रोड्यूस (लघु वनोपज),इको–टुरिझम आणि होम–स्टेच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत.नक्षलवाद आता इतिहासाचा भाग झाला असून, बस्तर आता प्रगती आणि शांततेचा नवा अध्याय लिहित आहे.

**– सुंदरराज पट्टिलिंगम,**
पोलीस महानिरीक्षक, बस्तर परिक्षेत्र

**● लक्षवेधी**

# प्रश्न पितृत्व रजेचा

नुकत्याच एका महत्त्वपूर्ण निकालपत्रात देशाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या दोन सदस्यीय खंडपीठाने दत्तक मातांच्या मातृत्व लाभांवर मर्यादा आणणारी तरतूद रद्द केली आहे.पालनपोषण ही एक सामायिक जबाबदारी आहे आणि ती केवळ मातांना सोपवलेल्या पारंपारिक भूमिकांपुरती मर्यादित ठेवता येणार नाही,'असे मत न्यायालयाने व्यक्त केले आहे.सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला पितृत्व रजेला सामाजिक सुरक्षा लाभ म्हणून मान्यता देणारा कायदा करण्याचे आवाहन केले असून, पितृत्व रजेचा समावेश सामाजिक सुरक्षा लाभांमध्ये करणारी तरतूद आणण्याचे निर्देश दिले आहेत.अशा रजेचा कालावधी माता–पिता आणि बालक या दोघांच्याही गरजांनुसार निश्चित केला जावा, यावर सर्वोच्च न्यायालयाने विशेष भर दिला आहे.

आधुनिक संशोधन असे सांगते की, बालपणाच्या सुरुवातीच्या वर्षांत वडिलांची सक्रिय अनुपस्थिती ही केवळ एक कौटुंबिक उणीव नसून, बालकाच्या भावनिक संतुलनासाठी, सामाजिक शिस्तीसाठी आणि व्यावहारिक विकासासाठी एक संरचनात्मक जोखीम निर्माण करते. पितृत्व रजेचा विचार प्रामुख्याने दोन समांतर आयामांमध्ये विकसित होतो. पहिला प्रश्न म्हणजे, पितृत्व रजा खरोखर आवश्यक आहे का? हे समजून घेणे आवश्यक आहे की,अर्भकाच्या जन्मानंतरचे सुरुवातीचे महिने केवळ मुलासाठीच नव्हे, तर संपूर्ण कुटुंबासाठी अत्यंत संवेदनशील असतात, जिथे निरंतर देखभाल आणि भावनिक आधाराची गरज असते. मातृत्वानंतर पित्याची भूमिका केवळ अर्भकापुरती मर्यादित राहत नाही, तर ती एका जीवनसाथीच्या रूपातही तितकीच महत्त्वाची ठरते. प्रसूतीनंतरच्या काळात जेव्हा माता शारीरिक आणि मानसिक




पुनर्प्राप्तीच्या प्रक्रियेत असते,तेव्हा पित्याचा सहयोग तिला आवश्यक भावनिक बळ प्रदान करतो. या काळात पिता केवळ एक सहायक नसून,एक सक्रिय सहभागी म्हणून समोर येतो,जो काळजी आणि जबाबदाऱ्यांच्या सामायिक पालनाचा आधार बनतो. २०१० मध्ये 'जर्नल ऑफ द अमेरिकन मेडिकल असोसिएशन'मध्ये प्रसिद्ध झालेले संशोधन सांगते की, प्रसूतीनंतरच्या काळात माता आणि पित्याच्या मानसिक आरोग्यामध्ये खोलवर संबंध असतो आणि पित्याचा सक्रिय सहभाग मातेमधील नैराश्याची (डिप्रेशन) शक्यता कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. त्याचप्रमाणे, २०१६ मध्ये 'पीडियाट्रिक्स'मध्ये प्रकाशित झालेला अभ्यास सांगतो की, या सुरुवातीच्या टप्प्यात पित्याची उपस्थिती केवळ कुटुंबाचा भावनिक समतोल सुदृढ करत नाही, तर संगोपनाची प्रक्रिया देखील अधिक प्रभावी बनवते.दुसरा प्रश्न असा की, पितृत्व रजा पुरुषत्वाच्या पारंपारिक आणि ताठर संकल्पनेशी सुसंगत ठरू शकते का? कारण सामाजिक आणि सांस्कृतिक संरचनांनी दीर्घकाळापासून पुरुषाची भूमिका केवळ आर्थिक जबाबदाऱ्यांपुरती मर्यादित ठेवली आहे. स्वीडनमध्ये पितृत्व रजेवर करण्यात आलेल्या अभ्यासातून असे स्पष्ट होते की, सुरुवातीच्या टप्प्यात अनेक वडिलांनी या रजेला त्यांच्या करिअरसाठी अडथळा मानले होते,परंतु काळाच्या ओघात त्यांच्या विचारसरणीत बदल झाला.

स्वीडनमध्ये पितृत्व रजेबाबत झालेल्या अभ्यासातून हे समोर आले आहे की, सुरुवातीच्या वर्षांत वडिलांद्वारे रजा घेण्याचे प्रमाण अत्यंत मर्यादित होते आणि त्याला सामाजिकदृष्ट्या असामान्य मानले जात होते. परंतु धोरणात्मक प्रोत्साहन आणि बदलत्या सामाजिक जाणिवांमुळे ही धारणा हळूहळू बदलली आणि पितृत्व रजा हा एक सामान्य सामाजिक व्यवहार म्हणून प्रस्थापित झाला. गेल्या काही दशकांमध्ये ती कठोर सामाजिक आणि सांस्कृतिक संरचना त्या सर्व देशांमध्ये हळूहळू बदलू लागली आहे, जिथे पितृत्व रजेची तरतूद करण्यात आली आहे. परिणामी, 'डायपर डॅड' (म्हणजेच बालकाच्या दैनंदिन देखभालीत सक्रियपणे सहभागी असणारा पिता)ही संकल्पना वेगाने विकसित होत आहे. हा केवळ वर्तणुकीतील बदल नसून, त्या सहजतेचे प्रतीक आहे जे पारंपरिक पुरुषत्वाच्या कठोर धारणांना छेद देत एका संतुलित आणि भागीदारीवर आधारित सामाजिक संरचनेकडे संकेत देते.

**– डॉ. ऋतू सारस्वत**
समाजशास्त्र अभ्यासक

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**रविवार,ता.५.४.२०२६,**विक्रमसंवत२०८२,शिवशक ३५२, शालिवहन शके १९४८,पराभव नाम संवत्सरे, उत्तरायणे, वसंत ऋतो,चैत्र मासे, शुष्ण पक्षे, तृतीया तिथी, १२.०० नंतर चतुर्थी तिथी, विशाखा नक्षत्र, २४.०८ नंतर अनुराधा नक्षत्र, तुला रास, १७.२८ नंतर वृश्चिक रास, वज्रयोग, १४.४४ नंतर सिद्धीयोग, विष्ठीकरण, १२.०० नंतर बव करण २४.०० पर्यंत, दिनमान १२.१४, सुर्योदय ६.२९, सुर्यास्त १८.४३ (कोल्हापूरचे) राहूकाळ सायं ४.३० ते ६, संकष्टी चतुर्थी कोल्हापूर चंद्रोदय रात्री ९.४३, धुळदेव यात्रा आळते, भद्रा १२.०० पर्यंत, मृत्यू २४.०८ नंतर घबाड २४.०८ नंतर.

**ज्यो:केशव पेटकर महाराज–९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष–**आजचा दिवस लाभदायक असून,तुम्हाला तुमच्या दीर्घ आजारापासून सुटका मिळण्याची शक्यता आहे. आर्थिकदृष्ट्या फायद्यात राहाल.

**वृषभ–** आजचा दिवस कुठल्या धार्मिक स्थळाला समर्पित करणे आपली मानसिक शांती कायम ठेवण्याचे सर्वश्रेष्ठ साधन असू शकते.सरकारी कामात वडिलधाऱ्यांचा सल्ला घ्या.

**मिथून–**कामाच्या ठिकाणी वरिष्ठांचे दडपण आणि घरातील कलह तुमच्यावरील तणाव वाढवू शकतो. त्यामुळे कामावर लक्ष विचलित होईल.

**कर्क–** आजच्या दिवशी तुम्हाला आर्थिक हानी होण्याची शक्यता आहे.घरच्या आघाडीवर अडचण संभवते त्यामुळे तुम्ही काय बोलता ते नीट विचार करून बोला.

**सिंह–**दिवस उत्तम आहे. आजच्या दिवशी स्वतः साठी वेळ काढा आणि आपल्या कमतरता आणि गुण याचे आत्म चिंतन करा.नातेवाईकांच्या येण्याने आनंदी वातावरण राहील.

**कन्या–** मित्रांचा आधार लाभेल आणि ते तुम्हाला आनंदी ठेवतील. आजचा दिवस अत्यंत महान आहे, कारण तुमच्या कामाकडे लक्ष जाईल,ते तुम्हास हवे असेल.

**तुळ–**आज प्रवास करणार असाल तर तुमच्या सामानाची विशेष काळजी घ्यावी.आज तुम्हाला अनेक नवीन आर्थिक योजना सादर केल्या जातील.

**वृश्चिक–**कामानिमित्त खाजगी कार्यक्रमांना जाण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे.योगासने आणि ध्यानधारणा यामुळे मानसिकदृष्ट्या तुम्ही सक्षम राहाल.

**धनु–** नवे तंत्रज्ञान शिकणे हे आपले कौशल्य वाढविण्यास त्याचा फायदा होईल.परिस्थिती अधिक वाईट बनण्याच्या आधी मतभेद दूर करण्यासाठी संवाद साधा.

**मकर–** जीवन आनंदाने जगण्याची आपल्या अपेक्षा आकांक्षा तपासून पाहा. योगसाधनेची मदत घ्या.तुम्हाला आपल्या भाऊ–बहिणीच्या मदतीने धन लाभ होण्याची शक्यता आहे.

**कुंभ–** आजच्या दिवशी घरातील इलेक्ट्रॉनिक वस्तू खराब होण्याच्या कारणाने धन खर्च होऊ शकते. कामानिमित्त प्रवास घडेल.कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांची मदत मिळेल.

**मीन–** तुमचे व्यक्तित्व लोकांपेक्षा थोडे वेगळे आहे तुम्ही एकटे वेळ घालवणे पसंत करतात.आज तुम्ही सर्व चिंतेला विसरून आपली रचनात्मकतेला बाहेर काढू शकता.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् ॲन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३–ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३–ए, महासत्ता चौक, इचलकरंजी–४१६११५. , दूरध्वनी क्रं.–०२३०–२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय– मुंबई –दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे – दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड –दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर– २२४११९., सांगली – दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर – दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज – दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी– दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप–पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

## कसबा ठाणेत वृद्धाचा मृत्यू

**कोल्हापूर, ता.४ (प्रतिनिधी)– कसबा ठाणे, ता. पन्हाळा येथे तणनाशक प्राशन केल्याने अत्यवस्थ बनलेले विलास पांडुरंग कुंभार (वय ६३) यांचा उपचारादरम्यान शुक्रवारी (दि. ३) मध्यरात्री सीपीआरमध्ये मृत्यू झाला. त्यांनी गुरुवारी (दि. २) सकाळी नऊच्या सुमारास राहत्या घरी तणनाशक प्राशन केले होते.**

हा प्रकार लक्षात येताच नातेवाइकांनी त्यांना सीपीआरमध्ये दाखल केले होते. याची नोंद सीपीआर पोलिस चौकीत झाली.

## सातर्डे येथे जखमी वृद्धाचा मृत्यू

**कोल्हापूर, ता.४ (प्रतिनिधी)– पन्हाळा तालुक्यातील सातार्डे येथे वाहनाच्या धडकेत जखमी झालेले आनंदा बाबू नाईक (वय ७०, रा. सातार्डे) यांचा उपचारादरम्यान शुक्रवारी (दि. ३) मध्यरात्री सीपीआरमध्ये मृत्यू झाला.**

शुक्रवारी सकाळी अकराच्या सुमारास अपघात झाला होता. याची नोंद सीपीआर पोलिस चौकीत झाली.

## दुकानात कामगारास मारहाण

**कोल्हापूर ता.४ (प्रतिनिधी)– गांधीनगर येथे एका कापड दुकानात काम करणारे कामगार तानाजी बाजीराव काशिद (वय ४७, रा. पोर्ले तर्फ ठाणे, ता. पन्हाळा) यांना मारहाण झाली. हा प्रकार शुक्रवारी (दि. ३) रात्री उशिरा घडला.**

डोक्याला दुखापत झाल्याने काशिद यांना सीपीआरमध्ये दाखल करण्यात आले. याची नोंद सीपीआर पोलिस चौकीत झाली.

# मतदार यादी पुन: निरीक्षण साठी शिवसेनेचे स्वतंत्र बीएलओ

### रवींद्र माने यांची माहिती

**इचलकरंजी,ता.४– मतदार यादी पुन: निरीक्षण अभियानातून हातकणंगले लोकसभा लोकसभा मतदारसंघातील एकही नागरिक वंचित राहणार नाही. त्यांच्या मतदानाचा पवित्र हक्क अबाधित राहिला पाहिजे.यासाठी शिवसेनेच्या वतीनेप्रत्येक गावातील प्रभागातील बुथवर बीएलओ नेमण्यात येणार आहेत. अशी माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख रवींद्र माने यांनी दिली.**



**शिवसेनेच्या कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना रविंद्र माने व्यासपीठावर माजी आम. सुजित मिणचेकर, पुंडलिक जाधव व इतर मान्यवर**

या संदर्भात इचलकरंजी येथील मातोश्री मुख्यालयात झालेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत ते मार्गदर्शन करताना बोलत होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी माजी आम . गोकुळचे संचालक सुजित मिणचेकर होते. बैठकीसाठी हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील शिवसेनेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

रवींद्र माने म्हणाले, निवडणूक आयोगाकडून सध्या मतदार यादीची पडताळणी सुरू आहे. प्रत्येक बूथनिहाय शिवसेनेचा स्वतंत्र बीएलओ नेमून आवश्यक माहिती निवडणूक आयोगाच्या प्रतिनिधींना देणे आवश्यक आहे. अन्यथा काही मतदार मतदानापासून वंचित राहतील आणि त्यांचा कायमचा घटनेने दिलेला अधिकार हिरावून घेतला जाईल. यासाठी शिवसैनिकांनी पुढाकार घ्यावा असे स्पष्ट आदेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेले आहेत.

माजी आमदार डॉ. सुजित मिणचेकर म्हणाले, अभियान प्रक्रियेत एकही नागरिक सुटणार नाही. याची खबरदारी घेण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवर भर देण्यात यावा तसेच आपल्या सर्वांच्या नेतृत्वाखाली हे अभियान अधिक प्रभावीपणे राबवले जाईल.

बैठकीला शिवसेना जेष्ठ नेते पुंडलिकभाऊ जाधव, महिला आघाडी जिल्हाप्रमुख वैशालीताई डोंगरे, उपजिल्हाप्रमुख विजयसिंह स्वामी, हातकणंगले तालुकाप्रमुख अजित सुतार, कोल्हापुर युवासेना जिल्हाप्रमुख निशिकांत पाटील रुकडी जिल्हा परिषद सदस्य अतिश शिंगे, शिवसेना पदाधिकारी शिवसैनिक उपस्थित होते.

# विधान भवन परिसरात बसवेश्वरांचा पुतळा उभारण्याची मागणी

**मिरज,ता.४ (प्रतिनिधी)– महाराष्ट्र विधान भवन परिसरात जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांचा भव्य पुतळा उभारण्यात यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते विवेक जिरनाळे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महाराष्ट्र विधान परिषदेचे आमदार इद्रिस नायकवडी यांना निवेदन दिले.**



**विधानभवनात म.बसवेश्वर महाराज यांचा पुतळा उभारण्यात यावा या मागणीचे निवेदन लिंगायत समाजाच्यावतीने देण्यात आले.**

या मागणीची दखल घेत आमदार इद्रिस नायकवडी यांनी तात्काळ सकारात्मक प्रतिसाद देत विधानसभा अध्यक्ष व विधान परिषद सभापती यांना शिफारस करण्याचे पत्र दिले.

तसेच सांगली विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुधीर दादा गाडगीळ यांनीही या मागणीस पाठिंबा दर्शवत शिफारस पत्र सादर केले.

यावेळी लिंगायत समाजाचे नेते शिवरुद्र अण्णा कुंभार, भाजपचे नेते दीपक बाबा शिंदे, प्रकाश मामा ढंग, बाबासाहेब आळतेकर, अनिताताई हारगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते ईश्वर जनवाडे, युवा आघाडीचे संदीप कबाडे तसेच गुडुराव वसवडे सर उपस्थित होते.

लिंगायत समाजाच्या वतीने ही मागणी करण्यात आली असून, बसवेश्वरांच्या विचारांचा प्रसार आणि त्यांच्या कार्याची आठवण कायम ठेवण्यासाठी विधान भवन परिसरात पुतळा उभारणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# दुचाकी चोरट्याला अटक : ८ लाखाच्या १६ दुचाकी जप्त

**निपाणी,ता.४( प्रतिनिधी)– निपाणी ग्रामीण पोलीसांना ८ लाख रुपये किमतीच्या १६ मोटरसायकली जप्त करण्यात यश आले आहे. याप्रकरणी नागेश तानाजी केंगारे (वय २६, रा. माणकापूर, ता. निपाणी) यास ताब्यात घेण्यात आले आहे.**



दि.३० मार्चला दुपारी व कोडणी गावाच्या हद्दीतील कोडणी–बुदीहाळ मार्गावरून दुचाकी चोरीस गेल्याची तक्रार कोडणी येथील अजित श्रीधर कौलवकर यांनी ग्रामीण पोलीस ठाण्यात दिली होती. त्यानुसार निपाणी ग्रामीण पोलीस स्टेशन यांच्या सहकायनि एक विशेष पथक तयार करण्यात आले होते. सदर पथकाने शनिवारी निपाणी ग्रामीण पोलीस स्टेशनच्या कोडणी गावाच्या हद्दीतील कोडणी–गायकनवाडी रस्त्यावर वाहनांची तपासणी केली. यावेळी आरोपी नागेश तानाजी केंगारे, (वयः २६, रा. माणकापुर), हा चिकोडीहून माणकापुराकडे एका नोंदणी नसलेल्या हिरो कंपनीच्या स्प्लेंडर प्लस मोटारसायकलवरून प्रवास करत होता, तेव्हा त्याने पोलीसांना पाहिले आणि पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने सदर मोटारसायकल चोरली असल्याचे कबूल केले. आरोपीच्या ताब्यातून विविध कंपन्यांच्या एकूण १६ मोटारसायकली, ज्यांची किंमत रु.८ लाख आहे. या माहितीच्या आधारे कारवाई करून सदर मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा प्रभारी पदासाठी चुरस वाढली

- ✻ मॅटच्या निर्णयामुळे स्पर्धा तीव्र
- ✻ चार आठवड्यांत अंतिम निर्णय अपेक्षित
- ✻ इच्छुकांकडून हालचालींना वेग

**कोल्हापूर,ता.४(प्रतिनिधी)– स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा (एलसीबी) प्रभारी अधिकारीपदाच्या निवडीवरून पोलिस दलात चुरस वाढली असून, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या (मॅट) निर्णयामुळे या प्रक्रियेत नवा पेच निर्माण झाला आहे. पोलिस निरीक्षक रवींद्र कळमकर यांनी केलेल्या तक्रारीनंतर दिलेल्या निर्णयामुळे सध्याचे अधिकारी अधांतरी राहिले असून, इच्छुकांमध्ये स्पर्धा अधिक तीव्र झाली आहे.**

कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वी झालेल्या बदलीविरोधात निरीक्षक कळमकर यांनी मॅटकडे धाव घेतली होती. जवळपास तीन महिन्यांनंतर या तक्रारीवर निकाल देताना मॅटने पोलिस अधीक्षकांना पाच निरीक्षकांची नावे विशेष पोलिस महानिरीक्षकांकडे पाठविण्याचे निर्देश दिले. या पाच नावांमधून एकाची निवड करून एलसीबी प्रभारीपदासाठी अंतिम नियुक्ती करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या निर्णयामुळे आधीच चर्चेत असलेल्या नावांबरोबरच इतर इच्छुक अधिकाऱ्यांचीही स्पर्धेत भर पडली आहे. अंतिम निर्णयासाठी चार आठवड्यांची मुदत देण्यात आल्याने इच्छुकांकडून प्रयत्नांना वेग आला आहे.

दरम्यान, एलसीबीमधून राजारामपुरी पोलिस ठाण्यात बदली झालेले निरीक्षक कळमकर हे काही दिवस वैद्यकीय रजेवर होते. त्यानंतर त्यांची नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली असून, ते शुक्रवारी तेथे रुजू झाले. यामुळे त्यांच्या पुढील नियुक्तीबाबतही चर्चा रंगली आहे.

**संभाव्य नावांवर चर्चा**

एलसीबी प्रभारीपदासाठी निरीक्षक रवींद्र कळमकर आणि सुशांत चव्हाण यांच्यासह आणखी तीन अधिकाऱ्यांची नावे पोलिस अधीक्षकांकडून सुचविली जाणार आहेत. या पार्श्वभूमीवर करवीरचे किशोर शिंदे, शाहूपुरीचे संतोष डोके, आयजी कार्यालयातील सतीश शिंदे आणि गडहिंग्लजचे अजय सिंदकर यांच्या नावांची चर्चा सुरू आहे. अंतिम यादीत कोणाला स्थान मिळते आणि शेवटी बाजी कोण मारतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# निवृत्त सैनिक सागर पाटील यांचा ग्रामपंचायतीच्यावतीने सत्कार

**तारदाळ,ता.४ (वार्ताहर) – तारदाळ चे सुपूत्र सागर बाळगोंड पाटील यांनी सतरा वर्षे भारतीय सैन्य दलात देशसेवा बजावत नुकतेच ते निवृत्त झाले यानिमित्त तारदाळ ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला.**

यावेळी पंचगंगा साखर कारखान्याचे चेअरमन पी. एम. पाटील, पंचायत समिती सदस्या प्रियंका खोबरे , सरपंच पल्लवी पोवार यांच्या हस्ते सागर पाटील यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक रणजीत पोवार यांनी केले. सागर पाटील यांनी जम्मू काश्मीर अरुणाचल प्रदेश पानागड, अहमदाबाद , बंगाल यासह अनेक सिमारेषेवर महत्त्वपूर्ण सेवा बजावली आहे.



**सेवा निवृत्तीबद्दल सैनिक सागर पाटील यांचा सत्कार करताना पी.एम.पाटील, प्रियंका खोबरे, पल्लवी पाटील व इतर मान्यवर**

यावेळी सागर पाटील यांनी सैन्य दलातील अनुभव सांगितले. शनिवारी सायंकाळी गावातून त्यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली.

सदर सत्कार प्रसंगी संचालक प्रकाश खोबरे, भिमराव बन्ने , यशवंत वाणी, यासिन मुजावर , अंजना शिंदे , सुर्यकांत जाधव , प्रविण पाटिल , चंद्रकांत तांबवे , नितिन खोचरे , मृत्युंजय पाटिल ,सुरज कोळी , मालुबाई चौगुले , लक्ष्मी चौगुले , विमल पोवार , वसंत चौगुले , रमेश नर्मदे , मलगोंड पाटील, गणपती खोत यांच्यासह अनेक गावातील लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिलेकडे शरीरसुखाची मागणी करणाऱ्या दोघाविरुद्ध गुन्हा दाखल

**मुरगूड ता.४(प्रतिनिधी) – ट्रेडिंगचे शेअर मार्केट मध्ये गुंतवलेले २५ लाख रुपये देण्याच्या कारणावरुन एका महिलेस अश्लील भाषेत बोलून तिच्याकडे शरीरसुखाची मागणी केल्याच्या तक्रारीनुसार बाचणी (ता.कागल) येथील संदीप ज्ञानदेव पाटील आणि अजित दादू पाटील यांच्या विरुद्ध मुरगूड पोलीसांत गुन्हा दाखल झाला आहे.**

कागल तालुक्यातील दोन मित्र ट्रेडिंगचे काम करीत होते. त्या कामामधून राहूल पाटील आणि बाचणी (ता.कागल) येथील संदीप ज्ञानदेव पाटीलयांची ओळख झाली होती. या ओळखीतून संदीप पाटील यांनी राहूल पाटील यांना शेअर मार्केट मध्ये गुंतवण्यासाठी २५ लाख रुपये दिले आहेत.त्यातील काही रक्कम त्याने परत केली आहे व बाकीची शिल्लक रक्कम परत करावयाची आहे. संदीप पाटील यांने तो भेटत नसल्यामुळे तेव्हापासून संदीप पाटील हा नेहमी त्याच्या पत्नीस फोनवर व समक्ष भेटून शिल्लक रक्कमेबाबत विचारणा करत होता.

संदीप ज्ञानदेव पाटील व अजित दादू पाटील या दोघांनी त्याची पत्नी घरी एकटी असताना तुझा नवरा आम्हाला भेटत नाही,तरी तु दोन दिवस आमचेकडे मुक्कामाला चल असे म्हणत अश्लील भाषेत शिवीगाळ केली.व तुझ्या नवऱ्याला बघून घेतो अशी धमकी दिली.तशी फिर्याद पीडित महिलेने मुरगूड पोलिसात दिली. आहे .याबाबत संदीप पाटील व अजित पाटील या दोघां विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

## आरळहटीच्या उरूसास बुधवारपासून प्रारंभ

**अथणी,ता.४– कर्नाटक महाराष्ट्राच्या सीमेवर असणाऱ्या आरळहटी येथील पीर राजे बक्षार उरूस ता. ८ ते १० एप्रिल अखेर भरविण्यात येत आहे अशी माहिती यात्रा कमिटीच्या वतीने देण्यात आली आहे.**

बुधवारी ८रोजी नैवेद्य व गंध चढवणे ,रात्री आर्केस्ट्रा ललकार कोल्हापूर यांचा कार्यक्रम, तर ९ रोजी लता लंका पाचेगावकर यांचा लोकनाट्य तमाशा.तर १० रोजी मनोरंजनाचे कार्यक्रम त्यानंतर सायंकाळी विविध,शर्यतींचे आयोजन करण्यात आले आहे.यामध्ये बैलगाडी,घोडा गाडी शर्यतींचा समावेश आहे.


**महावितरण** — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## वीज बंद निवेदन

म.रा.वि.वितरण कंपनीच्या मंडल कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या ग्राहकांना सुचित करण्यात येते अतिशय तातडीच्या दुरुस्तीच्या व देखभालीच्या कामामुळे दिनांक **०६.०४.२०२६** रोजी खालील भागातील व आसपास परिसरातील वीज बंद राहणार आहे. तरी ग्राहकांनी सहकार्य करावे. वीज पुरवठा कामाच्या वेळेनुसार दिलेल्या वेळेपूर्वी किंवा नंतर पूर्ववत होऊ शकतो.

| | |
|---|---|
| १ | **३३ केव्ही कानुर वाहिनी (कालावधी: स. ११.३० ते दु. १३.३०) बाधीत क्षेत्र:** कानुर, कुरणी, पुंद्रा, बिजूर |
| २ | **३३ केव्ही हलकर्णी (चंदगड) वाहिनी (कालावधी: स. ०८.३० ते दु. १५.३०) बाधीत क्षेत्र:** पार्ले, हेरे, पाटणे, मोन्तानवाडी, झेंडेवाडी, अडकुर, अमरोळी, कुमरी, सातवणे, बोंजूर्डी, शिरगाव, बेळेभाट, हलकर्णी, शिवनगे, गौलवाडी, कार्वे |
| ३ | **३३ केव्ही हलकर्णी एमआयडीसी वाहिनी (कालावधी: दु. १४.३० ते सायं. १८.३०) बाधीत क्षेत्र:** हलकर्णी एमआयडीसी, मुरुकुटेवाडी, यशवंतनगर, वैताकवाडी, माडवळे, जंगमहट्टी, सुपे, ताडशीहाळ, किट्टवडे |
| ४ | **३३ केव्ही आय–को वाहिनी (कालावधी: स. १०.०० ते सायं. १७.००) बाधीत क्षेत्र:** ३३ केव्ही आय–को वाहिनीवरील सर्व ग्राहक |
| ५ | **३३ केव्ही ओल्ड लक्ष्मी वाहिनी (कालावधी: स. ०९.०० ते ते दु.१६.००) बाधीत क्षेत्र:** ३३ केव्ही ओल्ड लक्ष्मी वाहिनीवरील सर्व ग्राहक |
| ६ | **३३ केव्ही आवाडे मळा वाहिनी (कालावधी: स. ०९.०० ते दु.१६.००) बाधीत क्षेत्र:** लिंबू चौक, पुजारी मळा, कागवाडे मळा, तांबे मळा, जुना चंदूर रोड, जय किसान चौक, लायकर मळा, लक्ष्मी व्यकटेश नगर, लंगोटे मळा, दातार मळा, महादेव नगर, गुरुकन्नान नगर, नाईक मळा, कुडचे मळा, हिरलगे मळा |
| ७ | **३३ केव्ही तिळवणी इंडस्ट्रीयल वाहिनी (कालावधी: स. ०९.०० ते दु.१६.००) बाधीत क्षेत्र:** ३३ केव्ही तिळवणी इंडस्ट्रीयल वाहिणीवरून पुरवठा होणारा सर्व भाग. |
| ८ | **३३ केव्ही चंदूर वाहिनी (कालावधी: स. ०९.०० ते दु.१६.००) बाधीत क्षेत्र:** चंदूर, रुई अंतर्गत येणारा काही भाग, कोरोची अंतर्गत येणारा काही भाग, शहापूर अंतर्गत येणारा काही भाग |
| ९ | **३३ केव्ही श्रेणिक वाहिनी (कालावधी: स. ०९.०० ते दु.१६.००) बाधीत क्षेत्र:** हेर्ले, हालोंडी, मौजे वडगाव, माणगांव, रुकडी, चोकाक, अतिग्रे, माले, मुडशिंगी, कुंभोज, बाहुबली, नेज, हिंगणगांव |
| १० | **३३ केव्ही हातकणंगले वाहिनी (कालावधी: स. ०९.०० ते दु.१६.००) बाधीत क्षेत्र:** हातकणंगले, आळते, तमदलगे, मजले, निमशिरगांव, लक्ष्मीवाडी, बिरदेववाडी |
| ११ | **३३ केव्ही गंगोत्री वाहिनी (कालावधी: स. १०.०० ते सायं. १७.००) बाधीत क्षेत्र:** खंजीरे इंडस्ट्रीयल इस्टेटचा काही भाग, कोरोची नाका परिसर |
| १२ | **३३ केव्ही शिरढोण वाहिनी (कालावधी: स. १०.०० ते सायं. १७.००) बाधीत क्षेत्र:** शिरढोण, टाकवडे |
| १३ | **३३ केव्ही अब्दुल लाट वाहिनी (कालावधी: स. १०.०० ते दु. १४.००) बाधीत क्षेत्र:** अब्दुल लाट, लाटवाडी, सत्यराज टेक्सटाईल पार्क, इचलकरंजी वाटर वर्क्स |
| १४ | **३३ केव्ही बाजार भोगाव वाहिनी (कालावधी: स. ०९.०० ते सायं. १७.००) बाधीत क्षेत्र:** बाजार भोगाव, पडसाळी, पेंढाले, चव्हाणवाडी |
| १५ | **३३ केव्ही बोलोली वाहिनी (कालावधी: स. ०९.०० ते सायं. १७.००) बाधीत क्षेत्र:** सावर्डे, वेतवडे, बोलोली, मल्हारपेठ, म्हासुर्ली |
| १६ | **३३ केव्ही पडळ वाहिनी (कालावधी: स. ०९.०० ते सायं. १७.००) बाधीत क्षेत्र:** पडळ, सातार्डे, यवलुज, माजनाळ, कसबा ठाणे, महाडिकवाडी, माजगांव, खोतवाडी, म्हाळूंगे, पुशिरे, देवठाणे |
| १७ | **३३ केव्ही नागरीका वाहिनी (कालावधी: स. ०९.०० ते सायं. १७.००) बाधीत क्षेत्र:** ३३ केव्ही नागरीका वाहिनीवरील ग्राहक |
| १८ | **३३ केव्ही वारूळ वाहिनी (कालावधी: स. १०.०० ते दु. १४.००) बाधीत क्षेत्र:** करुंगळे, निनाई परळे, भेंडवडे, लवाळा, सातार्डे, आंबा, तळवडे, मानोली |
| १९ | **३३ केव्ही कोगे वाहिनी (कालावधी: स. ०९.०० ते सायं. १८.००) बाधीत क्षेत्र:** कोगे, बहिरेश्वर, महे, बीड, आरे, बीडशेड, सावरवाडी, गणेशवाडी, धोंडेवाडी, गाडेगोंडवाडी, कुडित्रे, सांगरूळ, म्हारूळ, शेळकेवाडी, वाशी, वाकरे **बालिंगा**–फुलेवाडी, पाडळी, खुपीरे दोनवडे, साबळेवाडी, शिंदेवाडी. **भामटे**–भामटे, कळम्बे, आडूर, कोपार्डे, कुडित्रे, वाकरे |
| २० | **३३ केव्ही कुरणी वाहिनी (कालावधी: स. ११.०० ते दु. १५.००) बाधीत क्षेत्र:** शेलोली, वेंगरूळ, नांदोली, कराडवाडी, तांबाळे, पाटगांव, नवले, फगरेवाडी, मेघोली, चोफाडी, कडगांव, तिरवडे, ममदापूर, शिवडाव, सुक्याचीवाडी, पडखांबे |
| २१ | **३३ केव्ही मुदाळ वाहिनी (कालावधी: स. ११.०० ते दु. १६.००) बाधीत क्षेत्र:** कुर, मुदाळ, वाघापूर, सरवडे, बोरवडे, बिद्री, उंदरवाडी, आदमापूर |
| २२ | **३३ केव्ही बालिंगा वॉटर वर्क्स वाहिनी (कालावधी: स. ०९.०० ते सायं. १८.००) बाधीत क्षेत्र:** ३३ केव्ही बालिंगा वॉटर वर्क्स ग्राहक |

**कोप/पीआरओ नं. ०२/२०२६–२७**	**अधीक्षक अभियंता (कोमं), कोल्हापूर**


# दोन वेगवेगळ्या घरफोडीच्या घटनांतून सुमारे साडेसहा लाखांचे दागिने लांबवले

### सैदापूर व आगाशिवनगरमधील प्रकार

**कराड,ता.४(प्रतिनिधी)– कराड शहरालगतच्या सैदापूर, तसेच मलकापुरातील आगाशिवनगरमधील दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये अज्ञात चोरट्यांनी सुमारे साडेसहा लाखांचा ऐवज लांबवला. याबाबत कराड शहर पोलीस ठाण्यात वेगवेगळ्या तक्रारी दाखल झाल्या आहेत.**

याबाबत संजय नांगरे(रा. सैदापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, शुक्रवार दि. ३ एप्रिल रोजी नातेवाईकांच्या घरी कार्यक्रम असल्याने ते कुटुंबासमवेत पुणे येथे गेले होते. त्यानंतर शनिवारी सकाळी दहा वाजता घरी आल्यानंतर घराचे मुख्य दरवाजाचा कडी कोयंडा तुटलेला दिसला. तेव्हा त्यांनी घरामध्ये जाऊन पाहिले असता बेडरूममधील लाकडी कपाटातील ड्रॉव्हरमध्ये असेलेले सुमारे साडेपाच लाख रूपयाचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे निदर्शनास आले. याबाबत त्यांनी कराड शहर पोलिसात फिर्याद दिली आहे.

तर पूजा तेजस ढेब, रा. आगाशिवनगर (मलकापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, मुलाला गोटे येथे आयुर्वेदिक औषध आणण्यासाठी मुलगा व पतीसोबत गेल्या होत्या. पूजा यांना गोटे येथे सोडल्यानंतर त्यांचे पती कामावरती निघून गेले. त्यानंतर त्या दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास घरी गेल्या असता त्यांना घराचे मुख्य दरवाजाचा कडी कोयंडा तुटलेला दिसला. तेव्हा त्यानी घरामध्ये जावून पाहिले असता बेडरूममधील लोखंडी कपाटातील ड्रॉव्हर उघडलेला दिसला. त्यामध्ये असलेले सुमारे एक लाख रूपये किमतीचे सोन्याचे व चांदीचे दागिने अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे निदर्शनास आले.

# डॉ.आप्पासाहेब ऊर्फ सा. रे. पाटील जयसिंगपूर उदगाव बँकेच्या ठेवीचा ५०० कोटीचा टप्पा पूर्ण

**जयसिंगपूर, ता. ४(प्रतिनिधी)– शिरोळ तालुक्याचे भाग्यविधाते मा. आमदार स्व. डॉ. आप्पासाहेब ऊर्फ सा.रे. पाटीलसाहेब यानी स्थापन केलेल्या व सहकार महर्षी, उद्यान पंडित गणपतराव आप्पासाहेब पाटीलसाहेब यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या डॉ. आप्पासाहेब ऊर्फ सा.रे.पाटील जयसिंगपूर उदगाव सहकारी बँक लि. जयसिंगपूर(मल्टीस्टेट) बँकेने नुकत्याच संपलेल्या ३१ मार्च २०२६ अखेरच्या आर्थिक वर्षात लक्षणीय प्रगती नोंदवली आहे. बँकेने ३१ मार्च २०२६ अखेर बँकेने सभासद, ठेवीदार, हितचिंतक यांच्या विश्वासाच्या जोरावर एकुण रु.५१,६७४.८६ लाख ठेवी संकलित केल्या आहेत व रु.२७,९७१.१७ लाखाची कर्ज वाटप केली आहेत.**

बँकेचे वसूल भागभांडवल रु.१३७५.५५ लाख झाले आहे. बँकेच्या एकूण निधीची रक्कम ३०८१.५८ लाख इतकी झाली आहे. बँकेचा ढोबळ एन.पी.ए ४.१३% टक्के असून निव्वळ एन.पी.ए ०.३४% इतका आहे. रिझर्व बँक ऑफ इंडिया यांच्या सुचनाचे तंतोतंत पालन करीत बँकेने सन २०२५–२०२६ मध्ये उत्तम कामकाज केलेले आहे.

बँकेस रु.२३०.२८ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. बँकेच्या ठेवी व कर्जे व्यवसायात सुमारे १२ टक्क्याची वाढ झाली असून एकूण व्यवसाय रु ८०० कोटीपर्यंत पोहोचला आहे.

बँकेच्या या यशस्वी वाटचालीत बँकेचे सभासद ,ग्राहक ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक यांचा मोलाचा वाटा आहे अशी माहिती बँकेचे चेअरमन सुरेश पाटील यानी दिली याप्रसंगी बँकेचे बोर्ड ऑफ मॅनेजमेंट चेअरमन महेंद्र बागे, व्हा चेअरमन आप्पासो नरुटे, सर्व संचालक, तज्ञ संचालक, बँकेचे व्यवस्थापकीय संचालक ी राकेश दर्जे, चीफ जनरल मॅनेजर विनायक कदम, असि. जनरल मॅनेजर मिलिंद जगदाळे व सर्व अधिकारी उपस्थित होते.


## इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी.

### जाहीर प्रकटन

इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक दिनांक २६ सप्टेंबर, २०१२ मधील निर्देशानुसार प्रत्येक महिन्याचे पहिल्या सोमवारी महानगरपालिका स्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी नागरिकांनी वरील नमूद शासन परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांनुसार त्यांचे प्रलंबित तक्रारीचे निवारणासाठी महानगरपालिका स्तरीय लोकशाही दिनी उपस्थित रहावे.

सही/–
**(अशोक कुंभार)**
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका

# समीर रिझवी मुंबई इंडियन्सला पडला भारी

नवी दिल्ली,ता.४–

**समीर रिझवीच्या ९० धावांच्या वादळी खेळीच्या बळावर दिल्ली कॅपिटल्सने मुंबई इंडियन्सला पराभवाचा धक्का दिला आहे. दिल्लीने मुंबईचा ६ विकेट्सने पराभव केला आहे. हार्दिक पंड्याच्या अनुपस्थितीत सूर्यकुमार यादवने संघाचे नेतृत्त्व केले. सूर्याने पुढे येत अर्धशतकी खेळा केली होती, पण संघ मोठी धावसंख्या उभारण्यात अपयशी ठरल्याने संघाला पराभवाचा धक्का बसला. समीर रिझवीने ५१ चेंडूत ७ चौकार व ७ षटकारांसह ९० धावांची खेळी केली आणि मुंबई इंडियन्सला चांगलाच भारी पडला.**

मुंबई इंडियन्सचा संघ प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ६ बाद १६२ धावा करण्यात यशस्वी ठरला. तर दिल्ली कॅपिटल्सच्या संघाने समीर रिझवीच्या खेळीच्या बळावर १८.१ षटकांत ४ बाद १६४ धावा करत सामना आपल्या नावे केला आहे.

दिल्लीच्या स्लो खेळपट्टीवर धावा करणे सोपे नव्हते, त्यात गोलंदाजांनी अचूक गोलंदाजी करत मुंबईच्या फलंदाजांना धावा करण्याची फारशी संधी दिली नाही. दिल्ली कॅपिटल्सचा यंदाच्या मोसमातील हा सलग दुसरा विजय आहे. या विजयासह दिल्लीचा संघ आयपीएल २०२६च्या गुणतालिकेत पहिल्या स्थानी पोहोचला आहे.

मुंबईने दिलेल्या १६३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीची सुरूवात खूप खराब झाली. केएल राहुल १ धाव तर नितीश राणा शून्यावर बाद झाले. पण समीर रिझवी व पथुम निसांका यांनी संघाचा डाव सावरला. निसांका ३० चेंडूत ६ चौकार व एका षटकारासह ४४ धावा करत बाद झाला. यानंतर समीर रिझवीने एकट्याने संघाला विजयापर्यंत नेले. तर डेव्हिड मिलर एका टोकाकडून मैदानावर कायम राहत त्याला चांगली साथ दिली. रिझवी ९० धावा करत बाद झाला.

## दिल्लीचा शानदार विजय; अक्षर पटेलचा संघ गुणतालिकेत पहिल्या स्थानी

मुंबईकडून मिचेल सँटनर, दीपक चहर व कार्बिन बॉश यांनी १-१ विकेट्स घेतल्या. तर बुमराहने आपल्या रॉकेट थ्रोवर नितीश राणाला धावबाद केले होते.

दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकत मुंबई इंडियन्सला फलंदाजीसाठी पाचारण केले. रायन रिकल्टन व तिलक वर्मा तिसऱ्या षटकात बाद झाल्यानंतर रोहित शर्मा व कुलदीप यादव यांनी संघाचा डाव सावरला.

रोहित शर्मा व सूर्याने अर्धशतकी भागीदारी साकारली. रोहित शर्मा २६ चेंडूत ५ चौकार व एका षटाकारासह ३५ धावा करत बाद झाला. तर सूर्याने ३६ चेंडूत ३ चौकार व २ षटकारांसह अर्धशतकासह ५१ धावा करत बाद झाला. यानंतर नमन धीर, मिचेल सँटनर व कार्बिन बॉश यांनी संघाला कसेबसे १६२ धावांपर्यंत नेले. दिल्ली कॅपिटल्सकडून मुकेश कुमारने २ विकेट्स घेतल्या. तर लुंगी एनगिडी, अक्षर पटेल, विपराज निगम व टी नटराजन यांनी प्रत्येकी १-१ विकेट्स घेतल्या.


### त्याने आम्हाला सामन्यात परत येऊ दिले नाही

सामन्यानंतर कर्णधार सूर्यकुमार यादव म्हणाला, ''मला वाटते खेळपट्टी ठीकठाक होती. खेळपट्टी थोडी संथ असेल अशी अपेक्षा होती, पण फलंदाजीच्या दृष्टीने आम्ही सुमारे १५-२० धावा कमी पडलो. तरीही मी गोलंदाजांचे श्रेय कमी करणार नाही आणि त्यांच्या फलंदाजांनी दुसऱ्या डावात खूप चांगली फलंदाजी केली.

समीर रिझवीबद्दल सूर्या म्हणाला, ७ धावांवर २ विकेट्स गेल्यानंतर ज्या पद्धतीने त्याने मैदानावर येऊन फलंदाजी केली, त्याचे खूप कौतुक आहे. त्याने आम्हाला सामन्यात परत येऊ दिले नाही. आम्ही गोलंदाजीत आमच्या रणनिती राबवण्याचा पूर्ण प्रयत्न केला, पण आम्हाला पुनरागमन करता आले नाही.

मला वाटते खेळपट्टी जवळजवळ तशीच राहिली, फारसा बदल झाला नाही. पण त्यांनी ज्या पद्धतीने फलंदाजी केली, ती खूपच उत्कृष्ट होती. त्यांनी परिस्थिती ओळखत जुळवून घेत दुसऱ्या डावात सुंदर फलंदाजी केली. हे मान्य करावे लागेल की, जो स्कोअर चांगला वाटत होता तोही अपुरा ठरला. पहिल्यांदा फलंदाजी करताना स्कोअरचा फार विचार करत नाही, फक्त खेळत राहायचे असते आणि परिस्थिती समजून घ्यायची असते. आम्हाला वाटले १८०-१८५ हा चांगला स्कोअर असेल, पण आम्ही १५-२० धावा कमी पडलो.





## पॅट कमिन्स पाठीच्या स्कॅनसाठी ऑस्ट्रेलियाला परतला

नवी दिल्ली,ता.४–

**सनरायझर्स हैदराबादचा नियमित कर्णधार, पॅट कमिन्स, आयपीएल २०२६ च्या मध्यातच संघ शिबिर सोडून आपल्या पाठीच्या अंतिम स्कॅनसाठी मायदेशी ऑस्ट्रेलियाला परतला आहे. हा स्कॅन पूर्वनियोजित होता आणि तो क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या देखरेखीखाली केला जाणार आहे. जर त्याचे अहवाल सकारात्मक आले, तर तो १७ एप्रिल रोजी संघात पुन्हा सामील होऊ शकतो.**

कमिन्सने आधीच सांगितले आहे की, सर्व काही ठीक झाल्यास, तो आयपीएलच्या दुसऱ्या टप्प्यात आणि प्लेऑफमध्ये खेळेल. तो हंगामाच्या सुरुवातीला संघात सामील झाला होता आणि नेटमध्ये नियमितपणे गोलंदाजी करत होता, पण सुरुवातीचे सामने खेळू शकला नाही. त्याच्या अनुपस्थितीत, इशान किशन संघाचे नेतृत्व करत आहे आणि पुढेही करत राहील.

कमिन्स गेल्या वर्षी जुलैपासून पाठीच्या दुखण्याने त्रस्त आहे. डिसेंबरमध्ये खेळल्या गेलेल्या ॲशेस मालिकेतील तिसरा कसोटी सामना वगळता, तो फारसा स्पर्धात्मक क्रिकेट खेळलेला नाही. टी-२० विश्वचषकासाठी पुनरागमन करण्याची त्याला आशा होती. पण दुखापतीतून सावरण्यात आलेल्या एका किरकोळ गुंतागुंतीमुळे तो संघाबाहेर गेला. त्याच्या अनुपस्थितीत, हैदराबाद संघ आशान मलिंगा आणि डेव्हिड पेन या परदेशी वेगवान गोलंदाजांना संधी देत आहे. संघाचा पुढील सामना हैदराबादमध्ये लखनऊ सुपर जायंट्सविरुद्ध होणार आहे.





# रोमांचक सामन्यात राजस्थानचा विजय

## तुषार देशपांडेने राजस्थानला मिळवून दिला थरारक विजय

अहमदाबाद,ता.४–

**राजस्थान रॉयल्सने गुजरात टायटन्सविरूद्ध सामन्यात २०व्या षटकातील अखेरच्या चेंडूवर दणदणीत विजय मिळवला. मराठमोळ्या तुषार देशपांडेने उत्कृष्ट २०वे षटक टाकत राजस्थानला ६ धावांनी रोमांचक विजय मिळवून दिला. राजस्थानने दिलेल्या २११ धावांच्या लक्ष्यांचा पाठलाग करताना गुजरात टायटन्सचा संघ २० षटकांत २०४ धावा करू शकला. तुषार देशपांडेच्या अखेरच्या षटकापूर्वी रवी बिश्नोईचे ४ षटकांत ४ विकेट्स या सामन्याचा टर्निंग पॉईंट ठरले.**



अखेरच्या षटकात गुजरातला विजयासाठी ११ धावांची गरज होती. राजस्थानने अखेरचे षटक टाकण्याची जबाबदारी तुषार देशपांडेला गोलंदाजीची संधी दिली. तर फलंदाजीसाठी राशीद खान व कगिसो रबाडा मैदानावर होते. तुषार देशपांडेने पहिला चेंडू वाईट टाकला. यासह ६ चेंडूत ९ धावांची गरज होती. पहिल्या तिन्ही चेंडूवर सिंगल्स काढण्यात आल्या. त्यानंतर चौथा चेंडू डॉट बॉल राहिला. त्यानंतर तुषारच्या पाचव्या चेंडूवर मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात रशीद खान झेलबाद झाला. रशीद बाद झाल्यानंतर अशोक शर्मा फलंदाजीला आला आणि अखेरचा चेंडू डॉट बॉल राहिल्याने राजस्थानने ६ धावांनी सामना जिंकला.

राजस्थानने दिलेल्या २११ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चांगली सुरूवात झाली. साई सुदर्शन व कुमार कुशाग्र यांनी ७८ धावांची भागीदारी रचली. कुमारने १४ चेंडूत ३ चौकारांसह १८ धावांची खेळी केली. साई सुदर्शनने ४४ चेंडूत ९ चौकार व ३ षटकारांसह ७३ धावांची खेळी केली. तर जोस बटलरने १४ चेंडूत ५ चौकार २६ धावा केल्या. त्यानंतर रवी बिश्नोईने इम्पॅक्ट प्लेअर म्हणून येत गुजरातला धक्के दिले.

राजस्थान रॉयल्सने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. राजस्थानला वैभव सूर्यवंशी व यशस्वी जैस्वाल यांनी संघाला दणक्यात सुरूवात करून दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी ७० धावांची भागीदारी रचली. वैभव १८ चेंडूत ५ चौकार व एका षटकारासह ३१ धावा करत बाद झाला. यशस्वी जैस्वालने ३६ चेंडूत ६ चौकार व ३ षटकारासह ५५ धावा केल्या. ध्रुव जुरेलने ४२ चेंडूत ५ चौकार व ५ षटकारांसह ७५ धावा केल्या. तर शिमरॉन हेटमायरने १८ धावांचे योगदान दिले, यासह राजस्थानने २१० धावांचा आकडा गाठला. गुजरातकडून कगिसो रबाडाने सर्वाधिक २ विकेट्स घेतल्या. तर सिराज, अशोक शर्मा, प्रसिध्द कृष्णा आणि रशीद खान यांनी १-१ विकेट्स घेतल्या.




## न्यूझीलंडने एकदिवसीय मालिका जिंकली

### दक्षिण आफ्रिकेला केले पराभूत

वेलिंग्टन, ता.४ –

**न्यूझीलंडच्या महिला क्रिकेट संघाने तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात दक्षिण आफ्रिकेला ६६ धावांनी हरवून मालिका जिंकली. वेलिंग्टनमधील बेसिन रिझर्व्ह येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात न्यूझीलंडने उत्कृष्ट कामगिरी केली.**

प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडची सुरुवात खराब झाली आणि त्यांनी अवघ्या तीन धावांत तीन गडी गमावले. तुमी सेखुखुनेने सुझी बेट्स आणि अमेलिया केर यांना बाद करून सुरुवातीलाच धक्का दिला, तर आयंडा हुबीने जॉर्जिया प्लायमरला बाद केले.

त्यानंतर मॅडी ग्रीन आणि ब्रुक हॅलिडे यांनी चौथ्या विकेटसाठी २११ धावांची मोठी भागीदारी करून डाव सावरला. मॅडी ग्रीनने नाबाद १४१ धावा केल्या, तर ब्रुक हॅलिडेचे शतक ९८ धावांवर हुकले. न्यूझीलंडने आपल्या निर्धारित ५० षटकांत सात गडी गमावून ३०६ धावा केल्या.

लक्ष्याचा पाठलाग करताना, दक्षिण आफ्रिकेने चांगली सुरुवात केली, त्यांच्या सलामीवीरांनी ६८ धावा जोडल्या. त्यानंतर कर्णधार लॉरा वॉल्व्हार्ड आणि ॲनरी डर्कसेन यांनी ७७ धावांची भागीदारी करून संघाला मजबूत स्थितीत आणले. मात्र, वॉल्व्हार्ड बाद झाल्यानंतर संघाची लय बिघडली आणि धावसंख्या १४५/१ वरून १५४/४ अशी झाली. यानंतर, नियमित अंतराने विकेट पडत गेल्याने दक्षिण आफ्रिकेचा डाव पूर्णपणे कोसळला. रोझमेरी मेयरने उत्कृष्ट गोलंदाजी करत ५ बळी घेतले आणि संपूर्ण संघ ४६.१ षटकांत २४० धावांवर सर्वबाद झाला.

## कबनुरात हनुमान जन्मोत्सव यात्रेनिमित्त विविध स्पर्धा उत्साहात

कबनूर,ता.४ (वार्ताहर) –

**येथील श्री हनुमान यात्रेनिमित्त घेण्यात आलेल्या सायकल शर्यतीत बाळू हिरेमठ (चंदूर) यांनी प्रथम क्रमांक पटकावला.बाळू स्वामी (चंदूर) यांनी द्वितीय विनोद लोंढे (धरणगुत्ती) यांनी तृतीय क्रमांक पटकावला.**

पळणे लहान गट- मुली विजेत्या अनुक्रमे आरोही सातपुते, माहेश्वरी वाघमारे, अवनी वर्धन. पळणे मोठा गट मुली विजेत्या अनुक्रमे अर्पिता पवार, अमृता हेळवी,नंदिनी बडवे.

पळणे खुला गट - शर्यतीतील विजेते अनुक्रमे चैतन्य सपनर, अनिकेत देशमुख, गणेश मिसाळ, अनुप कांबळे. पळणे लहान गट- मुले विजेते अनुक्रमे ओम कमते, प्रेम कमते, प्रतीक कांबळे,

काठीने अथवा हाताने टायर पळवणे- शर्यतीतील विजेते अनुक्रमे प्रेम कमते,कमलेश कमते, शंकर सुळकर सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.



**कबनूर-येथील श्री हनुमान यात्रेनिमित्त घेण्यात आलेल्या हाताने टायर पळवणे शर्यतीतील क्षण (छाया-पल्लवी फोटो,कबनूर)**

## चेन्नईसमोर पराभवाची हॅट्रिक टाळण्याचे आव्हान

### आरसीबी सलग दुसऱ्या विजयासाठी तयार

चेन्नई,ता.४–

**चेन्नई सुपर किंग्स आयपीएल स्पर्धेतील दुसरी सर्वात यशस्वी टीम आहे.चेन्नईने मुंबई इंडियन्सनंतर ५ वेळा आयपीएल ट्रॉफी जिंकण्याची कामगिरी केली आहे. मात्र चेन्नई १९ व्या मोसमात ( २०२६) दिग्गज अनुभवी खेळाडू महेंद्रसिंह धोनी याच्याशिवाय बेहाल असल्याचे चित्र आहे.**



चेन्नईला ऋतुराज गायकवाड याच्या नेतृत्वात दोन्ही सामन्यांमध्ये पराभूत व्हावे लागले आहे. तर गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने या पर्वात विजयी सुरुवात केली आहे. रविवारी ५ एप्रिलला आरसीबी विरुद्ध सीएसके यांच्यात सामना होणार आहे. चेन्नईचा हा तिसरा तर आरसीबीचा दुसरा सामना असणार आहे. चेन्नईसमोर या सामन्यात पराभवाची हॅट्रिक टाळण्याचे आव्हान असणार आहे. तर आरसीबी सलग दुसरा सामना जिंकण्यासाठी मैदानात उतरणार आहे. त्यामुळे रविवारी होणाऱ्या सामन्यात कोण विजेता ठरतो याकडे क्रिकेट चाहत्यांचे लक्ष असणार आहे. आरसीबी-चेन्नई सामन्याची वेळ आणि इतर माहिती जाणून घ

आरसीबी विरुद्ध सीएसके सामना एमए चिदंबरम स्टेडियममध्ये खेळवण्यात येणार आहे.आरसीबी विरुद्ध सीएसके सामन्याला संध्याकाळी साडे सात वाजता सुरुवात होणार आहे. तर ७ वाजता टॉस होईल.

बंगळुरु विरुद्ध चेन्नई यांच्यात आतापर्यंत एकूण ३५ वेळा आमनासामना झाला आहे. चेन्नईने ३५ पैकी सर्वात जास्त सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे. चेन्नईने बंगळुरुला २१ सामन्यांत विजय मिळवला आहे. तर बंगळुरुने चेन्नईवर १३ वेळा मात केली आहे. तर उभयसंघातील एका सामन्याचा निकाल लागला नाही.

## श्रेयस अय्यरला २४ लाख रुपयांचा दंड

चेन्नई,ता.४–

**आयपीएल २०२६ च्या सातव्या सामन्यात, पंजाब किंग्सने (पीबीकेएस) चेन्नई सुपर किंग्सचा (सीएसके) ५ गडी राखून पराभव केला. कर्णधार श्रेयस अय्यरने शानदार फलंदाजी करत अर्धशतक झळकावले. प्रियांश आर्यानेही ३९ धावांची धडाकेबाज खेळी केली.**



या हंगामात पंजाबचा हा सलग दुसरा विजय होता. पण पंजाब किंग्सला या विजयाचा पुरेपूर आनंद साजरा करता आला नाही. षटकांचा वेग कमी ठेवल्याबद्दल पंजाब किंग्सचा कर्णधार श्रेयस अय्यरला २४ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. अय्यरसोबतच संपूर्ण संघालाही दंड ठोठावण्यात आला आहे.

चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध षटकांचा वेग कमी ठेवल्याबद्दल पंजाब किंग्सचा कर्णधार श्रेयस अय्यरला २४ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. षटकांचा वेग कमी ठेवल्याबद्दल अय्यरला दंड ठोठावण्याची या हंगामात ही दुसरी वेळ आहे. संपूर्ण संघालाही दंड ठोठावण्यात आला आहे. प्रत्येक क्रिकेटपटूकडून ६ लाख किंवा सामना शुल्काच्या २५% रक्कम कापली जाणार आहे.